PRGI NO-MAHMAR/2023/86554


समतावादी

# मुक्त संवाद

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

एप्रिल २०२६ वर्ष तिसरे : अंक ८



# THE STUDY ROOM

## LEARN | GROW | SUCCEED

SHARDA SHIKSHAN SEVA SAMITI'S

(SHASHIKANT PAWAR EDUCATIONAL CENTRE)

The Jewel, Ground Floor, Beside Pancharatna Building, Opera House, Mumbai - 400 004.

022 35406840 / 022 35406881 +91 91 360 565 27

shardastudyroom_charniroad www.shardastudyroom.com

**Helping Students Focus, One Seat at a Time.**











**Scan QR Code**

And get 1 day

**FREE ENTRY** on enrollment

### The Study Room Facilities

- Free WiFi
- Natural White Lighting
- Private Desks
- Plug Points
- Silence Zone
- Fully Air Conditioned

**Flexible and Affordable Plans**

Choose from hourly, daily, weekly, or monthly.

**प्रकाशक, संपादक**
डॉ. विवेक कोरडे

**कार्यकारी संपादक**
शेखर देशमुख

**सल्लागार संपादक मंडळ**
सुलक्षणा महाजन, डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे, राजेंद्र साठे, सुजय शास्त्री, सायली परांजपे

**संपादकीय साहाय्य**
सुमेधा कुवळेकर

**व्यवस्थापन सल्लागार**
विकास नाईक

**शीर्षनाम आरेखन**
विजय नार्वेकर

**मुखपृष्ठ**
इटालियन शिल्पकार रिकार्डो गत्ती याच्या वास्तववादी शिल्पाचे समिपचित्र.

**अंकातील छायाचित्रे**
इंटरनेटवरून साभार

**अंक मांडणी, सजावट**
वैभव केसरकर (८५५१८५०४६२)


**व्यवस्थापक**
चंद्रकांत माळगवे (९६१९८२३६७२)

**विनामूल्य वितरणासाठी**
'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले.
संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly Publication owned by Vivek Dattatrey Korde Printed at Jagruti Printers,Trimurti 91, Gharpure Path, Giragaon Mumbai 400004 and Published at Room No. 46, First Floor, SakharamBalaji Pawar Marg, Currey Road Naka, Delisle Road, Mumbai 400013
Editor : Vivek Dattatrey Korde
E mail Id- smsp.mumbai@gmail.com

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग





- ✶ सवाल माणुसकीचा आहे... माणुसकीसाठी आहे! – संपादकीय २
- ✶ जय भीम, हूल जोहार! – श्रीरंजन आवटे ४
- ✶ रावणाचे आधारकार्डच हनुमानाच्या हाती आले! – राजा पटवर्धन ८
- ✶ दुर्दैव, द्रोणाचार्य अजूनही जिवंत आहेत – डॉ. विवेक कोरडे १४
- ✶ फाटलेल्या नात्याचा फापटपसारा – डॉ. मोहन द्रविड १८
- ✶ 'डोनट'मधले 'इव्हज ड्रॉपर्स'! – रवि आमले २३
- ✶ इराणयुद्ध : साम्राज्यवादाची अर्थव्यवस्था उलगडताना... – हितेश पोतदार २७
- ✶ उत्तुंग क्रीडा यशाचे चिनी पाऊल–ठसे – गजानन जोशी ३२
- ✶ मूरची अंतर्दृष्टी... चांगुलपणाचे दर्शन घडवणारी! – प्रा. श्रीनिवास हेमाडे ३७
- ✶ सांख्य तत्त्वज्ञान : पारलौकिकितेकडून इहलोकाकडे – जगदीश काबरे ४२
- ✶ मौसम–ए–दिल्ली – आशय गुणे ४७
- ✶ शिळा 'मिकेलांजले' मुक्त केली... – डॉ. आनंद जोशी ५२
- ✶ विस्मयकारी विरामचिन्हे! – अरुण नेरुरकर ५८
- ✶ घरंदाज लयकारीचा आर्त नजराणा – गणेश मनोहर कुलकर्णी ६३
- ✶ कोलाहलाच्या तुकड्यांचा कोलाज – डॉ. नेहा सावंत ६७
- ✶ एका योजनेचं इतिवृत्त – मूळ कथा : नलिनाक्ष भट्टाचार्य ; अनुवाद : सुमती जोशी ७३
- ✶ आयुर्वेदिक औषध : औषध की अन्नद्रव्य? – डॉ. श्रीराम सावरीकर ७७

# सवाल माणुसकीचा आहे...
# माणुसकीसाठी आहे!

**संपादकीय**



**युद्धाला चटावलेला नेतन्याहू नावाचा देशप्रमुख कांगावा करतो, महासत्तेच्या सिंहासनावर बसलेला ट्रम्प नावाचा दुसरा नखशिखांत चारित्र्यहिन देशप्रमुख त्याला साथ देतो आणि 'अणवस्त्र सज्ज' इराणची भूमी युद्धबंबाळ होत चालल्याची दृश्ये अवघे जग विस्फारित डोळ्यांनी पाहात राहते. लाइव्ह व्हिडिओ गेमच जणू.**

अमेरिका-इस्रायल हे दोन देश मुख्यतः इराणच्या तेलसंपन्नतेवर डल्ला मारण्यासाठी युद्धाचा खेळ रचतात. इराण सर्व ताकद एकवटून जगाच्या आर्थिक नाड्या आवळू पाहतो. तेव्हा अमेरिका इस्रायलच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात इराणच्या फक्त इमारती जमीनदोस्त होत नाहीत. देश-प्रदेशांत दगडमातीचे डोंगर उभे राहात नाहीत. तर त्या डोंगराखाली माणुसकी गाडली जात राहते. अवघे जग आपल्या बापाची जागीर असल्याच्या अहंकारात अमेरिका मुलींच्या शाळेवरच क्षेपणास्त्र हल्ला करते. एका क्षणात

१६० हून अधिक कोवळे जीव काळेठिक्कर पडतात. सोशल मीडियासाठी नवे रिल तयार होते. मृत शाळकरी मुलींच्या दफनासाठी ओळीने खणलेल्या कबरी पाहून जग क्षणभर थबकते. पण क्षणभरच.

जगानेच ताळतंत्र सोडलेय म्हटल्यावर आपल्याकडे काय वेगळी स्थिती असणार होती. धर्माची धुंदी चढलेल्यांनी काही वर्षांपूर्वी ट्रम्पसाठी होमहवन रचले, आता तोच बालिशपणा नेतन्याहूंसाठी सुरु आहे. वास्तव हे आहे, की मुस्लीम राष्ट्रे, ख्रिश्चन राष्ट्रे, बौद्धधर्मीय राष्ट्रे आणि तोंडदेखली धर्मनिरपेक्ष राहिलेली राष्ट्रे... सगळ्यांचे पाय एकमेकांत अडकलेत. तरीही विध्वंसाचा खेळ मांडण्याची आणि या खेळाला मूक वा जाहीर साथ देण्याची खुमखुमी कमी होताना दिसत नाही.

एकीकडे वारसा-विकास आणि दुसरीकडे विध्वंस असे प्रगतीचे अत्याधुनिक मॉडेल बहुतेक सगळेच देश अवलंबताना दिसताहेत. हाही एक भयकारी योगायोगच म्हणायचा. एआयने तर टोकाच्या प्रगतीच्या आणि टोकाच्या विध्वंसाच्या कितीतरी शक्यता जगासमोर ठेवल्या आहेत. आधुनिकता आणि आत्मनाश यांचे नाते आहे काय, पूर्वापार?

पण, हा प्रश्न आजचा थोडाच आहे?

*खुदा ए बरतर, तेरी ज़मीं पर*
*ज़मीं की ख़ातिर, ये जंग क्यूँ है?*
*हर एक फ़तह-ओ-ज़फ़र के दामन पे*
*ख़ून-ए-इन्साँ का रंग क्यूँ है ?*

**https://scan.page/z1BFXk**

असा प्रश्न कवी-गीतकार साहिर लुधियानवीने विचारला होताच की. आज तो पुन्हा एकदा सोशल मीडियाच्या माध्यमातून संवेदनशीलता शिल्लक असलेल्यांच्या मनावर येऊन आदळतोय.

नोबेल पुरस्कार प्राप्त गायक-गीतकार, संगीतकार बॉब डिलननेही,

*Yes, and how many deaths will it take 'till he knows*
*That too many people have died?*
*The answer, my friend, is blowin' in the wind*
*The answer is blowin' in the wind*

**https://scan.page/iF8wo3**

असे आर्त आर्जव, विनाशक मनोवृत्तीच्या जगाला काही मूलभूत प्रश्न विचारून केले होतेच की.

आता साहिर या जगात नाही. ते बरेच म्हणायचे. बॉब डिलन मात्र अजून हयात आहे... कदाचित साहिरने अनुभवला नसेल, इतका विध्वंस तो आपल्या हयातीत अनुभवतोय... दोघांच्याही प्रश्नांची उत्तरे देण्याइतपत सवड युद्धधुंद जगाला तेव्हाही नव्हती, आताही दिसत नाहीये.

तरीही, शुद्ध हरपलेल्या या जगात भिन्न कलांच्या माध्यमातून त्यांच्यासारख्या असंख्यांनी विचारलेले प्रश्नच माणसाची विवेकबुद्धी टिकून राहण्याची हमी देत राहणार आहेत...

याच आशेवर साहिरचे गाणे पुन्हा जीव एकवटून ऐकले जावे, बॉब डिलनची माणुसकीची जाणीव करून देणारी आर्त लयकारी पुन्हा जाणीवपूर्वक कानात साठवली जावी आणि मुक्त संवाद २०२५च्या दिवाळी विशेषांकासाठी चित्रकार-कवी-लेखक-समीक्षक मंगेश नारायणराव काळे यांनी चित्रकृतींच्या माध्यमातून विध्वंसाचे टिपलेले रुप पुन्हा एकदा नव्याने समजून घेतले जावे. जेणेकरून माणूसपणाचा अंश वाढत राहावा.

**मुक्त संवाद २०२५ दिवाळी विशेषांक व मंगेश नारायणराव काळे यांचा लेख वाचण्यासाठी पुढील लिंकवर क्लिक करा.**
**https://heyzine.com/flip-book/ae342da899.html**


**- कार्यकारी संपादक**

# जय भीम, हूल जोहार!



श्रीरंजन आवटे

मर्म संविधानाचे



*आग्रह गांधीजींचा... सहमती प. नेहरुंची... समावेश डॉ. आंबेडकरांचा...*



*जयपाल सिंग मुंडा*

**काँग्रेसवर टीका करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर काँग्रेसचे मौलिक योगदान मान्य करतात आणि बाबासाहेबांविषयी अढी असणारे काँग्रेसजन त्यांना मसुदा समितीचे अध्यक्ष करतात, सोबतच आदिवासींच्या जटिल प्रश्नांची जाण करून देणाऱ्या जयपाल सिंग मुंडा यांचा संविधान सभेत समावेश करतात, हे लोकशाहीचे सौंदर्य आहे. इतकेच नव्हे, गांधी–नेहरु–आंबेडकर–मुंडा यांच्यात वैचारिक पातळीवर मतभेद असले, तरी संविधानासाठी आणि देशाच्या भवितव्यासाठी ते सारे एकत्र आले होते, या मतभेदांसह असलेल्या एकतेतूनच देशाला सृजनशील संविधान हाती लागले, असेच इतिहास सांगतो...**

भारताच्या संविधान निर्मितीमध्ये सामान्य लोकांनी सक्रिय सहभाग घेतला होता. संविधानसभेत असलेल्या मोजक्या १५ स्त्रियांचीही लक्षणीय कामगिरी होती. तरीही संविधानसभेत सर्व वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नेतृत्वाची आवश्यकता होती. विशेषतः दलित आणि आदिवासी वर्गाचे प्रतिनिधित्व असणे आवश्यक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२० च्या दशकापासून वंचित समूहांचे प्रश्न आग्रहाने मांडत होते. बाबासाहेबांचे काम हे ढोबळमानाने दोन पातळ्यांवर सुरू होते. एक प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन, त्यांच्यात मिसळून, रस्त्यावरची लढाई करणे. दुसरे म्हणजे, त्यासाठी धोरण आखणे, कायदे निर्मिती करणे. काळाराम मंदिर सत्याग्रह असो वा महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, बाबासाहेबांनी मानवी हक्कांची नवी परिभाषाच घडवली. मनुस्मृतीचे दहन हा तर मैलाचा दगड. सर्वसामान्य लोकांनी चुकूनही विषमतेची विषवल्ली असलेल्या मनुस्मृतीच्या वाटेने जाता कामा नये, यासाठी हा ग्रंथच बाबासाहेबांनी जाळला. मनुस्मृती हे एक प्रकारे कर्मठ, पुराणमतवादी संविधान होते. ते बाबासाहेबांनी जाळले आणि त्यांनीच भारताच्या संविधान निर्मितीमध्ये भरीव योगदान दिले. विषमतेला नकार, समतेला होकार, असे बाबासाहेबांच्या मांडणीचे मूलभूत सूत्र होते. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ब्रिटिशांसोबत वाटाघाटी करत बाबासाहेब धोरण निर्मितीमध्ये थेट सहभागी होते. अगदी १९४२ ते १९४६ या काळात बाबासाहेब मजूर मंत्री होते आणि त्यानंतर स्वतंत्र भारतासाठीच्या संविधानसभेतही होते. हे कसे घडले?

संविधान सभेत प्रवेश करण्याची डॉ. आंबेडकरांची इच्छा होती मात्र 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' या त्यांच्या पक्षाला १९४६ च्या निवडणुकांमध्ये अपयश आले. मुंबई व मध्य प्रांतात हार झाल्याने बाबासाहेबांचा संविधान सभेत पोहोचण्याचा रस्ता कठीण झाला. यावेळी मदतीला आले, जोगेंद्र मंडल. ते मुस्लिम लीगचे असले, तरी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे हितचिंतक होते. शिवाय पूर्व बंगाल प्रांतात मुस्लिम लीग आणि शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची युती होती. त्यामुळे जोगेंद्र मंडलांच्या सहाय्याने बाबासाहेबांचा संविधान सभेत प्रवेश झाला.

**गांधीजींचा द्रष्टा हस्तक्षेप**

डिसेंबर १९४६ मध्ये संविधानसभेचे कामकाज सुरू झाले. १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित नेहरुंनी संविधानाच्या उद्देशिकेचा ठराव मांडला. या ठरावावरील बाबासाहेबांचे भाषण गाजले. संविधान सभेतील बाबासाहेबांचा सहभाग लक्षवेधक होता. वेगवेगळ्या समित्या आणि उपसमित्यांवर त्यांचे काम सुरु झाले. तिथेही काही मौलिक बदल बाबासाहेब सुचवत. त्यातून बाबासाहेबांचे मोल सर्वांच्या लक्षात आले होते. भारताची फाळणी होणार, हे निश्चित झाले, तेव्हा मात्र मोठा पेच निर्माण झाला, कारण बाबासाहेब संविधान सभेतून आले, तो पूर्व बंगाल पाकिस्तानकडे जाणार होता. त्यामुळे बाबासाहेबांचे संविधान सभेतले सदस्यत्व धोक्यात आले.

त्याच वेळी बॅरिस्टर जयकर यांच्या राजीनाम्यामुळे मुंबई प्रांतात एक जागा रिकामी झाली होती. बाबासाहेबांना तिथून निवडून आणण्याचे काँग्रेसने ठरवले, कारण बाबासाहेब संविधान सभेत असावेत, यासाठी दस्तुरखुद्द महात्मा गांधी आग्रही होते. पुणे करारापासून गांधी-आंबेडकर संबंधात, ताण असला तरी गांधीजींनी आंबेडकरांचे महत्त्व जाणले होते. म्हणून बाबासाहेबांना निवडून आणण्याच्या संदर्भात राजेंद्र प्रसादांनी बी.जी.खेर यांना पत्र लिहिले. बाबासाहेब सातत्याने काँग्रेसवर टीका करत होते. 'व्हॉट गांधी अँड काँग्रेस हॅव डन टू द अनटचेबल्स' हे बाबासाहेबांचे पुस्तक १९४५ सालीच प्रकाशित झाले होते. त्यामुळे काँग्रेसवरच्या टीकेमुळे स्वाभाविकपणे बाबासाहेबांना विरोध केला जात होता. गांधीजी आणि राजेंद्र प्रसादांमुळे खेर यांनी बाबासाहेबांकरता शर्थीचे प्रयत्न केले आणि त्यानुसार ऑगस्ट १९४७ ला मुंबई प्रांतातून बाबासाहेबांना काँग्रेसने निवडून आणले. बाबासाहेब संविधान सभेत पुन्हा आले. काँग्रेसचे पूर्ण वर्चस्व असलेल्या संविधान सभेत मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेबांची निवड केली गेली. मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्यावर बाबासाहेबांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला होता, हे त्यांचे तेव्हाचे भाषण वाचून लक्षात येते.

एवढेच नव्हे तर, १९४७ मध्ये अंतरीम सरकारच्या कॅबिनेटमध्ये बाबासाहेबांचा समावेश करावा, असे गांधीजींनी सुचवले, तेव्हा आंबेडकर काँग्रेसचे सदस्य नाहीत, तसेच ते सतत काँग्रेसवर टीका करतात, असे नेहरुंचे म्हणणे होते. त्यावर गांधीजी म्हणाले, ''स्वातंत्र्य देशाला मिळाले, फक्त काँग्रेसला नाही.'' ('गांधीज आउटस्टॅंडिंग लीडरशीप', लेखकः पास्कल एलन नाजरेथ, पृ. ५४). इतकी व्यापक दृष्टी असलेले नेते भारताला लाभलेले होते. गांधीजींच्या म्हणण्याचा आदर राखून



*देशाचे संविधान मूर्त रुपात आकारास आणताना केवळ सिम्बॉलिझमचा खेळ खेळला गेला नाही. तर डॉ. आंबेडकर आणि जयपाल सिंग मुंडा यासारख्या शोषित-वंचितांचे प्रातिनिधित्व करणाऱ्या विद्वानांनी सर्वसामान्यांच्या हक्क आणि अधिकारांसाठी भरीव योगदानही नोंदवले...*

नेहरुंनी बाबासाहेबांना आमंत्रण दिले आणि बाबासाहेबांनी ते स्वीकारले. बाबासाहेब कायदामंत्री झाले.

**लोकशाहीचे सौंदर्य उजळले...**

संविधान सभेमध्ये आणि अंतरीम सरकारमध्ये बाबासाहेबांनी भरीव कामगिरी केली. संविधान सभेतील २५ नोव्हेंबर १९४९ रोजीच्या शेवटच्या भाषणात बाबासाहेब म्हणतात, ''या सगळ्या कल्लोळाच्या काळात काँग्रेसच्या शिस्तीमुळे संविधान सभेत मसुदा समितीचे काम सुरळीत पार पडू शकले. संविधानाची निर्मिती प्रक्रिया निर्विघ्न पार पाडण्याचे संपूर्ण श्रेय काँग्रेसचे आहे.'' काँग्रेसवर टीका करणारे बाबासाहेब काँग्रेसचे मौलिक योगदान मान्य करतात आणि बाबासाहेबांविषयी अढी असणारे काँग्रेसजन त्यांना मसुदा समितीचे अध्यक्ष करतात, हे लोकशाहीचे सौंदर्य आहे. त्याचप्रमाणे गांधी-नेहरु-आंबेडकर यांच्यात काही बाबतीत मतभेद असले, तरी संविधानासाठी आणि देशाच्या भवितव्यासाठी ते एकत्र आले होते, असेच इतिहास सांगतो. या मतभेदांसह असलेल्या एकतेतूनच देशाला सृजनशील संविधान हाती लागले.

**मुंडा यांचे विद्रोही अभिवादन**

संविधान सभेतले आणखी एक महत्त्वाचे नेते होते, जयपाल सिंग मुंडा. संविधान सभेमध्ये मुंडा आले, ते बिहार प्रांतामधून (आताचे झारखंड). ते स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडून आले होते. संविधान सभेत पोहोचण्यापूर्वीचा त्यांचा प्रवासही प्रेरणादायी आहे. रांचीपासून साधारण तीस किलोमीटर दूर असलेल्या खुंटी-टकरा या छोट्याशा गावात १९०३ साली मुंडा जमातीमध्ये त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण करुन उच्च शिक्षणासाठी ऑक्सफर्डमधल्या सेंट जॉन्स कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. या काळात वेगवेगळ्या क्षेत्रांत त्यांनी गती प्राप्त केली. येथे असतानाच त्यांनी हॉकी खेळात प्रावीण्य मिळवले. पुढे त्यांची निवड भारतीय नागरी सेवा (ICS) अधिकारी म्हणून झाली. १९२८ साली ॲमस्टरडॅम येथे ऑलिम्पिक सामने होते. भारतीय हॉकी टीमचे कर्णधारपद स्वीकारावे, अशी विनंती त्यांना करण्यात आली. तेव्हा मुंडा हे भारतीय नागरी सेवेत प्रोबेशनवर होते, त्यामुळे त्यांना रजा देता येणार नाही, असे सांगण्यात आले. मुंडा यांनी कशाचाही विचार न करता नोकरीवर लाथ मारली आणि हॉकी टीमचे कर्णधारपद स्वीकारले. त्यावर्षी भारतीय हॉकी टीमने ऑलिम्पिकमधले पहिले सुवर्णपदक प्राप्त केले. ऑलिम्पिकमधले देशाने मिळवलेले हे पहिले सुवर्णपदक!

या ऑलिम्पिक सामन्यांनंतरही नागरी सेवेत रुजू होण्याचा पर्याय ब्रिटिशांनी त्यांच्यासमोर ठेवला होता. मुंडा यांनी तो पर्याय नाकारला आणि आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. १९३८ साली 'आदिवासी महासभा' स्थापन झाली होती. १९३९ साली या महासभेच्या अध्यक्षस्थानी त्यांची निवड झाली. येथून त्यांच्या नेतृत्वात आदिवासींचे मूलभूत प्रश्न तीव्रतेने मांडायला सुरुवात झाली.

स्वतः आदिवासी असल्याने अनेक वेळा त्यांनी भेदभावाचा सामना केला होता. आदिवासींचे कसे शोषण केले जाते, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते, अनुभवले होते. त्यांनी ब्रिटिशांना आणि काँग्रेसला आदिवासी प्रश्न समजावून सांगितला. आदिवासींमधील लोकप्रियता वाढल्याने त्यांना 'मरांग गोमके' (सर्वोच्च नेता) असे म्हटले जाऊ लागले.

संविधान सभेत त्यांचा प्रवेश झाला, तेव्हा मूलभूत हक्कांबाबत असलेली सल्लागार समिती तसेच अल्प-संख्यांकांकरता आणि आदिवासींकरता असलेल्या समितीमध्ये त्यांचा समावेश झाला. मुंडा यांनी केलेली मांडणी ही तेव्हाच्या संविधान सभेत सर्वांना चक्रावून टाकणारी होती. सिंधू संस्कृतीचे आपण वंशज असून हजारो वर्षांपासून सर्वाधिक अन्याय आदिवासींवर झाला आहे, हे सांगतानाच ते म्हणाले, आदिवासींना लोकशाही प्रक्रिया शिकवण्याचा तुम्ही लोक प्रयत्न करत आहात; मात्र सर्वाधिक लोकशाही प्रक्रियेनुसार जगणारे लोक आदिवासी जमातीमधील आहेत. आदिवासींना

लोकशाही शिकवण्याऐवजी तुम्ही आदिवासींकडून लोकशाही मूल्ये शिकली पाहिजेत, असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. संविधान सभेतील अनेकांसाठी मुंडा यांच्या मांडणीने सांस्कृतिक धक्का बसला, मात्र वादविवादात आदिवासींबाबतचे मूलभूत प्रश्न मुंडा मांडू शकले, हे विशेष. अश्विनी कुमार पंकज यांनी संपादित केलेले 'आदिवासीडम' (२०१७) या पुस्तकात जयपाल सिंग मुंडा यांचे निवडक लेख आणि भाषणे वाचायला मिळतात. त्यातून मुंडा यांची मांडणी समजायला मदत होते.

जयपाल सिंग मुंडा यांनी स्वातंत्र्योत्तर काळातही महत्त्वाची भूमिका बजावली. मुख्य म्हणजे, जल, जंगल आणि जमिनीसोबतचे आपले पूर्वीपासूनचे नाते सांगत जयपाल सिंग आयुष्यभर आदिवासींचे प्रश्न मांडत राहिले. जसिंता केरकेट्टा नावाची कवयित्री म्हणते,

''वे हमारे सभ्य होने के इंतजार में है
और हम उनके मनुष्य होने के!''

जयपाल सिंग मुंडा यांचा प्रयत्न इतरांना माणूसपणाच्या वाटेवर आणण्याचा होता. त्यांच्यामुळे संविधान सभेत 'हूल जोहार'च्या (विद्रोही अभिवादन) घोषणेचा नाद निनादत राहिला.

बाबासाहेब आंबेडकर आणि जयपालसिंग मुंडा या दोघांचे काम वंचित समूहांसाठी असले तरी त्यांच्यात काही वेळा मतभेदही झाले. उदाहरणार्थ, 'आदिवासी' हा शब्द संविधानात वापरावा, असा मुंडा यांचा आग्रह होता; मात्र बाबासाहेबांनी त्याला विरोध केला आणि 'अनुसूचित जमाती' असाच उल्लेख संविधानातील तरतुदींमध्ये केला गेला होता.

दुसऱ्या एका मुद्द्यावर या दोघांमध्ये सहमती झाली. तो मुद्दा होता, हडियाचा. आदिवासी समुदायामध्ये 'हडिया' हे तांदळापासून तयार केलेले मद्य पिणे हा त्यांच्या लोकजीवनाचा स्वाभाविक भाग होता आणि आहे. या मद्यावर बंदी घालता कामा नये, असा मुंडा यांचा आग्रह होता. या मुद्द्याला बाबासाहेबांनी पाठिंबा दिला आणि अशा प्रकारच्या मद्यावरील बंदीचा मुद्दा हा 'राज्यसंस्थेसाठीच्या निर्देशक तत्त्वां'मध्ये केला गेला. तसेच संविधानातील पाचव्या आणि सहाव्या अनुसूचीच्या अनुषंगाने मुंडा सातत्याने मांडणी करत होते. दोन्ही अनुसूची या जमातींबाबत (आदिवासी) आणि अनुसूचित क्षेत्रांच्या प्रशासनाविषयी आहेत. मुंडा आदिवासींच्या हक्कांविषयी प्रतिपादन करत होते, त्यामुळेच संविधानातील अनुच्छेद ३३० नुसार आदिवासींना राजकीय आरक्षण देण्यात आले, तेव्हा मुंडा यांनी बाबासाहेबांचे अभिनंदन केले.

बाबासाहेब आंबेडकर आणि जयपालसिंग मुंडा या दोघांचे काम केवळ दलित-आदिवासींपुरते मर्यादित नव्हते, तर ते एकूणात मानवी हक्कांसाठी, प्रतिष्ठेसाठी आणि समान संधींसाठी होते. त्यामुळेच 'जय भीम' आणि 'हूल जोहार' या दोन्ही घोषणा समूह विशिष्ट घोषणा नाहीत, तर त्या सामाजिक न्यायाच्या आणि रचनात्मक विद्रोहाच्या रस्त्याची आठवण करुन देणाऱ्या आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे.

**श्रीरंजन आवटे कवी, लेखक आहेत. ते सध्या बँकॉक येथील सुआन सुनंधा राजभाट विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापकपदी (राज्यशास्त्र) कार्यरत आहेत. राही श्रु. ग. यांच्यासोबत त्यांनी लिहिलेले 'आपलं आयकार्ड' हे संविधानाधारित पुस्तक वाचकप्रिय ठरले आहे.**

**संपर्क** : poetshriranjan@gmail.com

## आमचे पाठीराखे

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका

**कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ.आनंद जोशी-सुमती जोशी, आशिष पाटकर, डॉ.दिलीप खताळ, डॉ.प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, गणेश मनोहर कुलकर्णी, डॉ.अजित जगताप, डॉ.रेखा शेळके, प्रशांत पवार, डॉ.मंदार काळे, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, अविनाश हावळ, प्रभाकर कुंभार, चंद्रकांत पाटणकर, सुधीर साठे, वासुदेव (काका) खानोलकर, नेहा आसगावकर.**


# रावणाचे आधारकार्डच हनुमानाच्या हाती आले!



राजा पटवर्धन

पुनर्शोध रामायणाचा





दुष्काळात तेरावा महिना यावा, तसा एक पर्वतासारखा भलामोठा राक्षस समोरुन धावत येताना वानर सैन्याने पाहिला. वानर सैन्याची घाबरगुंडी उडाली. ते सैरावैरा पळू लागले. तो महाराक्षस वाली पुत्र अंगदाच्या दिशेने धावला. अंगदाला वाटले, हाच तो रावण. अंगदाने एका ठोशात त्याला जमिनीवर आडवा पाडला. रक्त ओकून राक्षस मेला. पण, मेलेला राक्षस रावण नाही, हे वानर सैन्याला नंतर उमजले...

आपल्याकडे शिव आणि विष्णु सहस्त्रनामाच्या महाभारत आधारित पोथ्याच आहेत. तशीच देवीची ललितासहस्र नामावलीही आहे. भारतातील देवांची समाजातील लोकप्रियता आजमावण्यासाठी एक आधार आहे, तो म्हणजे, त्या-त्या देवांची देऊळ संख्या मोजणे. देशात सुमारे साडेसहा लक्ष गावे आहेत. खरे म्हणजे, एक सामाजिक अभ्यास म्हणून लहान मोठ्या सर्व देवळांचीच एकूण संख्या उपलब्ध व्हायला हवी. अदमासपंचे (अंदाजे) हिशेब केला जातो. काही संशोधकांनी हा हिशेब केलेला आहे. गंमत अशी की ब्रह्मदेवापासून नागडो (नग्न) वेताळा (गोवा) पर्यंत देवळे आहेत. रावण, बकासूर दुर्योधन, महिषासूर अशा राक्षस प्रवृत्तीचीही भारतात देवळे आहेत. गणपती, राम, कृष्ण यांची देवळे तर सर्वज्ञात आहेत. किश्किंधेचे राजे वानर बंधू वाली (रामाने याचा वध केला असूनही) आणि सुग्रीव यांची मंदिरे आहेत. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत (उत्तर-दक्षिण) व ओडिशापासून द्वारकेपर्यंत (पूर्व-पश्चिम) हनुमानाची मंदिरे आहेत. (भारतात सर्वाधिक मंदिरे हनुमानाची नंतर क्रमांक गणपतीचा, त्यानंतर श्रीकृष्णाचा, चौथा क्रमांक मर्यादा पुरुषोत्तम रामाचा.)

हनुमान राजा कधीच नव्हता. तो सुग्रीवाचा मंत्री होता आणि रामाचा सेवक होता. दुर्गम ईशान्य भारतात सुद्धा सिक्किम, मणिपूर, नागालँड, अरुणाचलसह सर्व ठिकाणी मारुती मंदिरे आहेत. एक गमतीचा भाग असा, की आजच्या अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यात पाथर्डी तालुक्यातील नंदूरनिंब गावात मारुती किंवा हनुमानाचे नावही अशुभ मानतात. निंबा या नावाचा राक्षस या गावाचा रक्षणकर्ता होता. तो रामभक्त होता, हे हनुमानाला माहिती नव्हते. दंडकारण्यात सीतेचा शोध घेत असता त्याचा दैत्य निंबाशी मोठा संघर्ष झाला होता. दोघेही भान हरपून पडले. आजही स्थानिक लोक हनुमानाला देव मानीत नाहीत. या आख्यायिकेप्रमाणे रामाने मध्यस्थी करुन ही लढाई थांबवली. या गावातील लोक हनुमानाऐवजी निंब राक्षसाची पूजा करतील व हनुमानाचे मंदिर बांधणार नाहीत. आजही म्हणे रामाची ही आज्ञा लोक पाळतात. या गावात निंब राक्षसाचे वा दैत्याचे मंदिर आहे.

**सम्राट अकबर, तुलसीदास आणि वानरसेना**

एक मजेशीर आख्यायिका आहे. ती आहे, आजच्या उत्तर प्रदेशमधील. त्यावेळी दिल्लीत मुघलांचे राज्य होते. बादशहा होता, अकबर. (इ.स.१५५६-१६०५) अवधी बोली भाषेत रामचरित मानस लिहिणारे सरयू नदी किनाऱ्याजवळचे तथाकथित उच्च ब्राह्मणकुलीन गोस्वामी संत तुलसीदास (१५३२-१६२३) रजपूर गावात राहात होते. (मिश्रा, त्रिपाठी, तिवारी, शुक्ला, पाठक चतुर्वेदी, पांडे इ.विशिष्ठ ब्राह्मणांची एक जात.) या संत तुलसीदासांना काही जण वाल्मिकी ऋषींचा अवतार (पुनर्जन्म) मानतात. त्यांचा 'रामचरित मानस' हा ग्रंथ सर्वतोमुखी झाला. त्याचे पठण-गायन होऊ लागले. हे गोस्वामी तुलसीदास दक्षिणेकडे तीर्थयात्रेला जाण्यासाठी एकदा आग्रा येथे आले. ही बातमी शहरात हा हा म्हणता पसरली. अकबर बादशहाला कुणकुण लागली.

इतके लोक का आणि कुणासाठी अशी गर्दी करीत आहेत? असा प्रश्न अकबर बादशहाने बिरबलाला विचारला. बिरबल म्हणाला, ''इतरांचे सोडा, मीही तुलसीदासांचे दर्शन घेऊनच दरबारात आलो आहे.'' ''पण, बिरबला! हा तुलसीदास कोण आहे?'' बिरबलाने त्याची ख्याती बादशहाला कथन केली. मग त्याला दरबारात आणण्याची अकबराने व्यवस्था केली. निरोप ऐकताच तुलसीदासाने ''मी काही कुणी राजा नाही, माझे काही काम बादशहाकडे नाही. मला काहीच मागायचे नाही. मी बादशहाकडे कशाला जाऊ?'' असे म्हणून बादशहाचे आमंत्रण नाकारले. बादशहाला हा उपमर्द, अपमान सहन झाला नाही. त्याने तुलसीदासाला गुन्हेगार ठरवून फत्तेपूर तुरुंगात कैद करून ठेवले. तुलसीदासाने हनुमानाचे स्मरण केले. हनुमान भक्तीने ओथंबलेल्या अवस्थेत जे छंदोबद्ध काव्य उत्स्फूर्तपणे त्यांच्या मुखातून बाहेर पडले, ते स्तोत्र म्हणजे सुप्रसिद्ध ''हनुमान चालिसा''. (महाराष्ट्रात चालिसा पठणावरून फुकाचा राजकीय वाद रंगला होता.) यातील पहिले दोन दोहे हे विषयप्रवेशाचे, अखेरचा दोहा समाप्तीचा. मधल्या ४० चौपाई (चार ओळींचे) हे मूळ काव्य. मारुती आपल्याला संकटातून म्हणजे तुरुंगातून मुक्त करील, अशी गोस्वामी संतकवी तुलसीदास यांची खात्री होती. दररोज एक प्रमाणे चाळीस चौपाई लिहून झाल्यावर त्यांना आनंद झाला. हनुमानाचे सर्व जीवन चरित्र सांगून झाले. त्यांचे डोळे भरून आले होते. अश्रूपात थांबत नव्हता. एवढ्यात अघटित घडले. अक्षरश: हजारो वानर फत्तेपूर तुरुंगाबाहेर जमा झाले. जणू अकबरालाच ते शोधत होते. अकबराला खबर लागली. ''बिरबला! हे लाखो वानर का जमलेत? कुठून आलेत?'' ''महाराज तुलसीदासानी तुमच्या कैदेत राहून एक काव्य रचना केली आहे.''

गोस्वामी संत तुलसीदास स्वरचित काव्य गात आहेत. हे वानर आता प्रक्षुब्ध होतील, असा एकूण रंग आहे. तुम्ही ज्यांची वानरे



*हनुमान हे एकनिष्ठेचे, निर्धाराचे आणि शक्तीचे प्रतीक. शतकानुशतके या प्रतिकाने भारतीय जनमानसाला आधार दिला. गोस्वामी तुलसीदास आणि सम्राट अकबराशी जोडलेली आख्यायिकादेखील त्याचेच दर्शन घडवते...*

म्हणून संभावना केलीत, ते रामदूत होऊनच आले आहेत. असे प्रजेला वाटते. त्यांना आजचा रावण कोण आणि तो कुठे राहतो आहे हे समजले असावे. ''महाराज सावध व्हा!! त्वरा करा.'' पण काय आश्चर्य, अकबराने आदेश देण्यापूर्वीच वानरांनी तुलसीदासाला मुक्त केले... (१५८५) संत तुलसीदासाला हनुमानाचे दर्शन झाले... तर अशी ही आख्यायिका. रामभक्त तुलसीदासाने संकटमोचन हनुमानाला आलिंगन दिले, त्याचे चरण स्पर्शिले, अशी लोकांची श्रद्धा. अशा या तुलसीदासांची हनुमान चालिसा वाचल्यावर पटते, रामदासांच्या (१६०८-१६८०) ''भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती'' या महाराष्ट्रातील लोकप्रिय स्तोत्रावर हनुमान चालिसाचा प्रभाव स्पष्ट दिसतो

**वानरसेना सैरावैरा जाहली...**

आता सीतेच्या शोधार्थ निघालेल्या सुग्रीवाच्या दक्षिण मोहीमेच्या टीम हनुमानाकडे पुन्हा वळूया. दक्षिणेचा समुद्रतीर गाठायचा होता. प्रचंड घनदाट अरण्याचा आणि पर्वतरांगाचा दऱ्याखोऱ्यांनी भरलेल्या विंध्यपर्वतात या वानर सैन्याची भटकंती सुरू होती. सुग्रीवाच्या एक महिन्याच्या मुदतीची अखेर झाली होती. गदेचे प्रहार डोक्यावर होत आहेत, असे भास वानरांना होऊ लागले होते. चालून चालून थकलेले वानर भूक आणि तहानेने व्याकूळ झाले होते. अचानक त्यांच्या नकळत एका रखरखीत निष्पर्ण जागेत ते पोहोचले. जागा अशी की, हिरवे पानही कुठे दिसत नव्हते. घोटभर पाणीही नजरेस पडत नव्हते. आता वानर काय सुकी लाकडे खाणार, की सुके गवत? पण, हा सगळा प्रभाव एका ऋषीच्या शापाचा होता. झाले असे की, कंडू ऋषींचा पुत्र या वनात फिरत असता हरवला किंवा कुणीतरी खाऊन टाकला होता. मग काय, कंडू ऋषींनी शाप दिला. वनराईचे रखरखीत वाळवंट झाले. दुष्काळात तेरावा महिना यावा, तसा एक पर्वतासारखा भलामोठा राक्षस समोरुन धावत येताना वानर सैन्याने पाहिला. वानर सैन्याची घाबरगुंडी उडाली. ते सैरावैरा पळू लागले. तो महाराक्षस वाली पुत्र अंगदाच्या दिशेने धावला. अंगदाला वाटले, हाच तो रावण. अंगदाने एका ठोशात त्याला जमिनीवर आडवा पाडला. रक्त ओकून राक्षस मेला!

पण, मेलेला राक्षस रावण नाही, हे वानर सैन्याला नंतर उमजले. पुढे पुढे चालणे तर भागच होते. काही पक्षी समोरून उडत जाताना दिसले. सैन्याला हायसे वाटले. त्यांचा हुरुप वाढला. अन्य कुणीतरी सजीव दृष्टीस पडला. पाठोपाठ काही वन्य पशुही जाताना दिसले. सरपटणारे प्राणीही दिसले. काही पक्षी ओले पंख, फडफडवीत जात होते. हनुमानाची खात्री पटली. हे संकेत शुभ वर्तमानाचे आहेत. वानरांचा समूह चक्क एका गुहेच्या द्वारापाशीच आला होता. ते गुहेत शिरले. एका प्रकाशमान गुहेत आपण आलो आहोत, याचे वानरांना आश्चर्य वाटले. वानर प्रमुखांनी एकमेकांचे हात पकडून साखळी बनवली. पुढे पुढे जाऊ लागले तर एक सरोवर दिसले. पुढे सुवर्णाने मढवलेला रत्नजडित महाल दिसला. राजवाडाच जणू.

वानर साखळी पुढे पुढे सरकत होती, इतक्यात एक कृष्णमृगचर्म धारण करून वल्कले नेसलेली तपस्विनी स्त्री दिसली. सुस्वरुप तपस्विनी वृद्ध दिसत होती. सर्वप्रथम हनुमंताने तिला हात जोडले, ''हे देवते! तू कोण आहेस, या गुहेत तू का राहातेस? हे एक रत्नजडित निवासस्थान कुणाचे? हे तपस्विनी! आम्ही वानर मंडळी हिंडत फिरत अचानक या अंधारलेल्या गुहेत शिरलो आहोत. आम्ही तहानलेले, भुकेले आहोत. हे सर्व अद्‌भुत दृश्य पाहून भांबावलो आहोत. ही सगळी संपन्नता खास प्रकाशाने उजळून कशी निघाली आहे? आकाश दर्शनही होत नसताना जलाशयात फुललेली कमळे, फळाफुलांनी बहरलेले वृक्ष, कुणाचे तप:सामर्थ्य आहे हे? कृपा करुन आम्हाला सांग.'' त्यावर ती धर्मचारिणी तपस्वी म्हणाली, ''हे वानरश्रेष्ठा! माया विशारद मय नावाचा असूर हा सर्व दानवांचा जणू विश्वकर्मा (शिल्पकार-कारागीर) आहे. त्याने हे सुवर्णमय भवन निर्माण केले आहे. ब्रह्मदेवाच्या कृपेने तपश्चर्येचे फळ म्हणून शुक्राचार्याकडून ही शिल्पविद्या मयासुराला प्राप्त झाली. (मय असूर) हा मंदोदरीचा पिता, रावणाचा सासरा, तो या सर्वसंपन्न महालात पत्नी हेमा

अप्सरेबरोबर इथे राहात होता. इंद्राला हे सहन न झाल्याने (हेमा ही स्वर्गातली अप्सरा. तिचे अपहरण?) वज्रबळाने त्याने मयाला पराभूत केले. हाकलून लावले. खुद्द ब्रह्मदेवाने ही वास्तू वनासह हेमा अप्सरेला दिली. हेमाने मला दिली. मी अप्सरा हेमाची जिवश्च सखी. माझे नाव स्वयंप्रभा. हेमाच्या वरदानाने मी येथे राहून वनाचेही रक्षण करते.'' असे त्या तपस्विनीने सांगितले. मग म्हणाली, ''हे श्रेष्ठा तुम्ही या वनात कोणत्या हेतूने शिरला आहात? त्याआधी तुम्हाला पाणी देते. भरपूर फळे खा. नंतर तुमचा हेतू सांगा.'' फलाहारानंतर सर्व वानर वीरांनी विश्रांती घेतली. ''आता तुमची इच्छा असेल तर तुमचा वृत्तांत ऐकवा.''

हनुमानाने अयोध्येपासूनचा सर्व वृत्तांत स्वयंप्रभेला ऐकवला. आम्हा सर्व वानरांना एकत्र राहून दक्षिण दिशेला रावणाने सीतेला कुठे ठेवले आहे, ते शोधकार्य करायचे आहे. अजून आम्हाला काहीच साध्य झालेले नाही. आम्ही चिंतित असून तुझ्या उपकाराचे ओझे आम्हावर आहे, हे उपकार कसे फेडू? तू आमचे प्राण वाचवले आहेस. स्वयंप्रभा म्हणाली, ''मी प्रसन्न आहे. माझे कोणतेही उपकार तुमच्यावर नाहीत तर ते, फेडण्याचा प्रश्नच कुठे आला? मी येथे सुखात आहे.'' ''हे साध्वी, आम्ही तुला शरण आहोत. राजा सुग्रीवाची एका महिन्यात परत येण्याची वेळही संपली आहे. आता आम्हाला गुहेबाहेर जाण्याचा मार्ग दाखव. आम्हाला सुग्रीवाचे भय आहे. कार्य तर अजून संपलेले नाही.''

''हे हनुमंता, या गुहेत शिरलेला कुणीही बाहेर पडू शकत नाही. मी तप:सामर्थ्याने इथे राहाते. तुम्ही सर्वांनी आपापले डोळे घट्ट मिटून घ्या. उघड्या डोळ्यांनी कुणालाच बाहेर पडता येणार नाही. हा विंध्यपर्वतच आहे. याला प्रस्रवण म्हणतात. समोर पुढे लांब दिसतो, तोच दक्षिण सागर. तुमचे काम झाले आहे.'' तपस्विनीच्या जादू-कृपेने सर्वजण खरेच गुहेबाहेर आले. क्षणार्धात तिने गुहेच्या दिशेने तोंड वळवले आणि ती दृष्टीआड झाली. गर्जना करणाऱ्या सागराचे दर्शन घडले, तरी एका महिन्याची मुदत गुहेत शिरतानाच संपलेली होती. विंध्यगिरी जवळच्या एका पर्वतावर सर्व वानर पुन्हा एकत्र जमले. खलबते सुरू झाली. बलिष्ठ अंगद दक्षिण दिशा चमूचा प्रमुख या नात्याने म्हणाला, ''तुम्ही सर्व जाणकार निपुण आहात. अंगीकारलेल्या कार्यात आपण अजूनही चाचपडतच आहोत. एक प्रकारे हे प्राणसंकटच आहे. मला खरेच वाटते की आपण प्राणांतिक उपोषण करुन यातून सुटका करुन घ्यावी. आपण नकारघंटा वाजवत सुग्रीवासमोर गेलो, तर आपला वध निश्‍चित आहे. मी रामाच्या कृपेने युवराज झालो आहे. सुग्रीवाने हे ठरवलेले नव्हते. सर्वजणांना आता बोलणे भाग पडले. आपण सीतेचा शोध घेतला नाही, तर सुग्रीव सहन करणार नाही हे खरेच. रामाचाही रोष आपण ओढवून घेऊ. सुग्रीव आपल्याला जिवंत ठेवणार नाही, यावर सर्वांचे एकमत झाले. तार वानराने तर वेगळेच तारे तोडले.''

निघालेल्या अंगदाला हनुमंताचा सबुरीचा सल्ला, ''आपण स्वयंप्रभेच्या गुहेत पुन्हा जाऊन लपून राहूया. मग देवांसह आपण सर्वांपासून सुखरुप लपून राहू शकतो. कदाचित स्वयंप्रभाही आपल्याला समजून घेईल. तार वानराने काही तरी अंगदासह कट रचला आहे, अशी शंका हनुमानाला आली. अंगद हा तार वानराला पुढे करुन पक्ष फोडायला निघाला आहे (खोके घ्या, पदे घ्या?) हे हनुमानाला जाणवले.'' ''हे अंगदा, तारापुत्रा तू वाली इतकाच पराक्रमी आहेस. भावी काळात तुलाच किश्किंधेचे राज्य चालवायचे आहे. तसे सर्व गुण तुझ्याजवळ आहेत. एक लक्षात घे, सर्व वानर मूलत: चंचल वृत्तीचे असतात. गुहेत लपून भित्र्यासारखे कुटुंबापासून दूर राहणे त्यांना मुळीच जमणारे नाही. जांबवन, नील, सुहोत्र यांच्या स्वभावातच ते नाही. मी सुग्रीवाचा शब्द अखेरचा मानतो. आम्हाला सुग्रीवापासून तू दूर करू शकणार नाहीस. दुर्बळाने बलवानाशी वैर करु नये, हेच योग्य. जी गुहा तुम्हाला सुरक्षित वाटते, ती एका बाणात लक्ष्मण भेदून टाकील. गुहा उजाड मोकळी करील. गुहेचे अभेद्य वाटणारे पाषाण लक्ष्मण फोडून टाकील. लक्ष्मणाच्या हातून तुम्ही मृत्यूलाच कवटाळू पाहत आहात. कंटाळलेले भुकेलेले हे वानर तुझी आज्ञा पाळतील हा तुझा भ्रम आहे. सर्वांची एकजूट टिकवून सुग्रीवासमोर गेलात तर किश्किंधेचे राज्य तुलाच मिळणार आहे. सुग्रीव क्षमाशील आहे. तुझ्या मातेचाही तो आदर करतो. सुग्रीवाला स्वत:चा पुत्र नाही. तूच सुग्रीवाचा वारस आहेस, तू मी आणि जांबुवंत यांची साथ सोडू नकोस.''

''हे हनुमंता! तू सांगितलेले सुग्रीवाचे सर्वगुण मी ऐकले, मला ते पटत नाहीत. वडील भावाची पत्नी ही मातेसमान असून सुग्रीव तिला पत्नी म्हणून स्वीकारतो हे धर्मसंमत आहे, असे मी मानत नाही. याने वाली गुहेत युद्ध करीत असता गुहेचे तोंड बंद केले, हे कृत्य धर्मशील नाही. रामाकडून वालीवधाचे कार्य आधी करवून घेऊन विलासात दंग झाला, रामाचे कार्य विसरला हे कृतघ्नपणाचेच लक्षण नाही का? अधर्माच्या भीतीने नव्हे, लक्ष्मणाच्या भीतीने ही शोधमोहीम त्याने हाती घेतली आहे. माझा सुग्रीवावर अजिबात विश्वास नाही. मनात ही मळमळ होतीच

आज ती मी उघड बोलून दाखवतोय. किश्किंधेत परत गेलो, तर मी जिवंत राहीन, असे मला अजिबात वाटत नाही. सुग्रीव कृतघ्न आहे. शठ, क्रूर आणि निर्दय आहे. माझा वध नाही, झाला तर मी बंदी नक्की बनवला जाईन. म्हणूनच उपोषण करून मरण पत्करणे मी पसंत करीन. सर्वांना माझा नमस्कार सांगा. मी इथेच मरण पत्करणार आहे.'' अंगदाने उपस्थित वानरांना नमस्कार केला. आमरण उपोषणासाठी आसनस्थ झाला. (यालाच प्रायोपवेशन म्हणतात. प्रथम अन्न, नंतर पाणीही न पिता प्राण जाणे. पाहा– वा.रा. किश्किंधा सर्ग ५५/११)

**जटायूबंधू संपातीने सावरले...**

लांब दूरुवर समोर समुद्र दिसत होता. अपयशी ठरलेल्या सर्व वानर सैन्याने मोठमोठे आवाज काढून सर्व परिसर दणाणून सोडला. सर्व वानर रडू लागले. सर्व वक्त्यांनी सुग्रीवाची निंदा केली, वालीची स्तुती केली. अंगदाला पाठिंबा म्हणून तेही प्राणांतिक उपोषणाला बसले. दशरथाच्या मृत्यूपासून दंडकारण्यातील सर्व घटनांचा क्रमवार उल्लेख होत होता. अपयशी वानर मोठमोठ्याने ओरडून रडत होते. हा आवाज एवढा मोठा होता, की दऱ्याखोऱ्यात प्रतिध्वनी उमटू लागले. पर्वत डोंगरावर हे नाट्य घडत असताना जवळच असलेल्या जटायूचा थोरला बंधू ग्रुध (गिधाड) संपातीने हा कलकलाट ऐकला. तो खूश झाला कारण त्याच्या भोजनाची चांगलीच सोय होणार होती. तो स्वत:शीच म्हणाला, ''ही पूर्वपुण्याई आहे. जसजसा एकेक वानर मरेल, मी त्यावर ताव मारून माझी भूक भागवीन. संपातीचे हे स्वगत अंगादाला स्पष्टपणे ऐकू गेले.'' ''हनुमाना! ग्रुधरुपी महायमच इथे हजर झालेला आहे. मला याक्षणी रावणाशी लढणाऱ्या जटायूचे स्मरण होत आहे. पक्षीसुद्धा राम कार्यात प्राणार्पण करतात. आपण वानरांनीही तेच पवित्र कार्य आरंभले आहे. त्यांच्या बोलण्यात जटायू... जटायू असा वारंवार उल्लेख होत होता. रामाचा वनवास, वालीचा वध, कैकेयीचे कारस्थान राम जटायूची भेट इ. शब्द संपाती लक्षपूर्वक ऐकत होता. तो म्हणाला, ''किती वर्षांनंतर मी जटायूचे नाव ऐकतोय. माझा धाकटा बंधू जिवंत नाही?'' संपातीने विनंती केली, ''हे वानरांनो! मला या ऊंच जागेवरून खाली आणा. जनस्थानातील जटायू रावण युद्धाची संपूर्ण कथा मला ऐकवा. माझे अतिभव्य पंख मी जटायूचे प्राण वाचवण्यासाठी आच्छादन म्हणून वापरले होते. सूर्याच्या प्रखर तेजाने माझे पंख भाजले. मला खाली उतरवा.'' बलशाली वालीपुत्र अंगदाने जटायूबंधू संपाती गिधाडाला खाली आणले.

देहाने प्रचंड असलेला हा वृद्ध पक्षी आपल्याकडे भक्ष्य म्हणून तर पाहत नाही? अशी शंका वानरांच्या मनात आली होती. ते सावधही होते. अंगदाने संपातीला आजपर्यंतची रामकथा ऐकवली. आपल्या प्रायोपवेशनाचेही कारण सांगितले. ''हे वानरवीरांनो! मी आणि जटायू दोघांनी इंद्र–वृत्रासुराचे युद्ध पाहिलेले आहे. स्वत:ला इतका पराक्रमी समजणाऱ्या इंद्राला आम्ही जिंकून त्याची खोड जिरवली. आम्हाला सूर्यावर चढाई करायची होती. स्वर्गातून सूर्याकडे आम्ही झेपावलो. सूर्यतेजाने जटायूला अधिक त्रास झाला. त्याचा वेग मंदावला. आमचा निभाव लागला नाही, मी पंख सावलीने जटायूला वाचवायचा प्रयत्न करीत होतो, पण मीही होरपळलो. तेव्हा मी या पर्वतावर पडलो. जटायूचे काय झाले मला काहीच कळू शकले नाही, माझी आणि जटायूची ताटातूट झाली. मला त्याला जलांजली दिली पाहिजे.'' अंगदाने याच क्षणी संपातीला विनंती केली.

''तो नीच रावण कुठे राहातो ते ठिकाण किती दूर आहे? त्याचा ठावठिकाणा आम्हाला सांग.''

''मी, देवासुर युद्धाचा आणि समुद्रमंथनाचा प्रत्यक्षदर्शी पक्षी आहे. आज मला बळ नसले, मृत्यूची चाहूल कळत असली, तरी मी शब्दाने प्रभू रामाची सेवा करू शकेन. दुरात्मा रावण एका रुपसंपन्न अलंकृत युवतीला आकाश मार्गे पळवून नेताना मी प्रत्यक्ष पाहिले होते. ती युवती, ''हे रामा! लक्ष्मणा!'' अशा हाका मारीत होती. ती विजेसारखी चमकत होती. तिची कांती कोवळ्या सूर्य किरणांसारखी होती.''

ती सीताच होती, हे मला आत्ता उमजले. हा नीच बलाढ्य राक्षस इथून शंभर योजने दूर, समुद्राने वेढलेल्या विश्वकर्माने स्वहस्ते निर्माण केलेल्या लंका नावाच्या एका समृद्ध बेटावर राहतो. त्याचा महाल सुवर्ण रत्नजडित आहे. तो विश्रव ऋषींचा पुत्र आणि कुबेराचा बंधु आहे. या लंका नगरीत भव्यदारे असलेल्या मोठ्या इमारती आणि महाल आहेत. माझ्या ज्ञानदृष्टीने मी हे स्पष्ट पाहत आहे. एका वन वाटिकेत सीता शोकमग्न असलेली मी या क्षणी पाहत आहे. तिच्या भोवती रावणाच्या अंत:पुरातील राक्षसींचा पहारा आहे. मी हे पाहू शकतो, कारण आम्ही गरूड कुळातील गिधाडे आहोत. त्यामुळेच आम्हाला इतके दूरचेही स्पष्ट दिसते.

**रावणाचा अतापता लागला**

संपातीने जणू (आधारकार्डासहित अचूक लोकेशनसह) अंगदाच्या हाती संपूर्ण पत्ताच दिला. ''बंधू जटायूच्या वधाचा मी अंशत: सूड घेणार अशी माझी भावना आहे. मी आता तुमच्या मदतीने या अथांग सागर किनारी येऊन जटायूला जलांजली देऊ इच्छितो.'' वानरांनी संपातीला उचलून सागर किनारी आणून ठेवले. जलांजली देऊन झाल्यावर वानरांनी त्याला त्या उंच पर्वत टेकडीवर पुन्हा नेऊन ठेवले.

सर्व वानर हर्षोत्फुल्ल झाले होते. जांबुवंताने संपातीला आणखी काही उरलेले नेमके प्रश्न विचारले. खात्री करून घेतली. संपाती पुत्र सुपार्श्व याने रावण सीतेला पळवून नेत असता आकाशात कसे अडवले होते, रावणाने याचना करुन आपली कशी सुटका करून घेतली. जे घडले ते योग्य असा सिद्धांनीही अभिप्राय दिला. जांबुवंताने सर्व तपशील जाणून खात्री करुन घेतली. नाहीतर आकाश मार्गी रावण-सीता हे दोघे संपातीचे भोजन झाले असते. संपातीने आपण गेली आठ हजार वर्षे येथे कसे राहत आहोत, ऋषी निशाकरने मी रामाला कसा मदतनीस होणार आहे, असा विस्मयजनक तपशील भविष्य रुपाने सांगितला. जांबुवंतही आता सत्यतेबद्दल निश्चिंत झाला. जटायू आणि संपाती यांनाही हनुमानाप्रमाणे इच्छानुरूप देह धारण करता येत होते, हे समजले. निशाकर ऋषींनीच रावणाने सीतेला पळवून नेल्यावर कुठे नेऊन ठेवले आहे, हे वानरांना तू सांग. असे संपातीला सांगितले होते. ही कथाही जांबुवंताने तपशिलासह ऐकली. निशाकर ऋषी स्वर्गवासी झाले त्याला शंभर वर्षे झाली. हा संवाद सुरु असतानाच संपाती ग्रुधाला नवे पंख फुटलेले जांबुवंतासह वानरांनीही पाहिले. पुढे संवाद शक्य नव्हता, कारण वानर आश्चर्यचकीत होतात न होतात तोच, संपाती आकाशात उंच उडून गेला. वानरही आता उत्साहाने भरून गेले. प्रायोपवेशन सुरू ठेवण्याचे कारणच उरले नाही. आता लंकेत उड्डाण कोण करणार, हाच नि एवढाच प्रश्न उरला होता...

**राजा पटवर्धन हे विज्ञान, समाज, अर्थशास्त्र आणि संस्कृतीचे अभ्यासक आहेत. कोकणातील विकास प्रकल्पांवर यांनी सातत्यपूर्ण लेखन केले आहे. यांचे 'पुनर्शोध महाभारताचा' हे पुस्तक प्रकाशित आहे.**

**संपर्क :** ९८२००७१९७५

## अक्षर प्रकाशनाचं नवं पुस्तक...

**य.दि. एकस्मरण** वासंती फडके




**किंमत रु.५००/-**

**फडके सरांनी एकहाती जे प्रचंड लेखन संपादकाचे काम केलेले आहे आणि प्रकृतीचा नसता बाऊ न करता जे काही मोठे प्रकल्प हाती घेतलेले आहेत, ते पाहून आळशी लोकांची छातीच दडपावी! महाराष्ट्रातील ताज्या सत्तांतरानंतर तत्त्वनिष्ठा म्हणून राज्यसाहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदाचा स्वत:हून राजीनामा देण्याचा त्यांचा बाणेदारपणा आपल्याला स्तिमित करतो. उज्ज्वल इतिहासाची नुसती स्तुतिस्तोत्रं पोकळपणे गात फडके सर बसत नाहीत, तर आज एकूणच आपला संपूर्ण समाज वैचारिक पातळीवर मृतप्राय होत चालला असताना आणि धन सत्ता लोभी राजकारण यांची विवेकशून्यता, अमानुषता विचारवंतांना देखील बधिर करत असताना. हा देश घडवलेल्या महामानवांचे स्मरण नव्या पिढीला प्रमाणचरित्र लेखनाद्वारे करून देण्याचे मोलाचे काम फडके सर निष्ठापूर्वक करीत राहिले आहेत. पुस्तक वाचल्यावर वाचकांना याचा प्रत्यय येईलच.**

अक्षर प्रकाशन ऑर्चिड रोड मॉल, रॉयल पाम, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई-६५ फोन : ९३२२३९१७२० email : aksharprakashan@gmail.com

# दुर्दैव, द्रोणाचार्य अजूनही जिवंत आहेत



डॉ. विवेक कोरडे

**विरोधी बाकावरून**



*प्रातिनिधिक छायाचित्र*

**शिक्षण हक्क कायद्याखाली प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंडाची भावना अधोरेखित करून, ''तुम्ही या ठिकाणी योग्य नाही आहात'' अशा प्रकारची भावना शालेय वर्गामध्ये निर्माण केली जाते, असे माननीय न्यायालयाने म्हटले. इथे आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, असं वातावरण निर्माण करण्याला पालक, शिक्षक आणि व्यवस्थापन हे सारेच घटक जबाबदार आहेत...**

ब्रिटिश शासनाने १८६२ मध्ये भारतीय शिक्षण व्यवस्थेचा विचार करण्यासाठी हंटर आयोगाची नेमणूक केली. प्राथमिक शिक्षण व्यवहारिक असावे, शैक्षणिकदृष्टच्या मागास विभागांमध्ये शिक्षण विभागांची स्थापना व्हावी, मुलींसाठी सुलभ अभ्यासक्रम आणि मोफत शिक्षणाची तरतूद व्हावी, अनुदान सहाय्य, विद्यार्थी व शिक्षक यांच्या संख्येच्या प्रमाणात आवश्यकतेनुसार दिले जावे, इत्यादी बाबत विचार करण्यासाठी हंटर आयोग स्थापन करण्यात आला होता. महात्मा फुले यांनी हंटर आयोगासमोर साक्ष दिली. त्या साक्षीत त्यांनी, प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे, जेणेकरून गरीब व बहुजन समाजांतील मुलांना शिक्षण घेता येईल, खेड्यापाड्यांत शाळांची संख्या वाढवली जावी, कारण ग्रामीण भागात शिक्षणाचा अभाव आहे, केवळ उच्चवर्णीयांचे शिक्षण नसावे, तर शूद्र आणि अस्पृश्य महिलांच्या शिक्षणावर सरकारी खर्च व्हावा, शिक्षणात व्यावसायिक (Vocational) विषयांचा समावेश असावा, प्राथमिक शिक्षणासाठी सरकारकडून पुरेसा निधी मिळावा, इत्यादी महत्त्वाच्या मागण्या केल्या होत्या.

स्त्रिया आणि बहुजनांची दुरवस्था शिक्षणाच्या अभावामुळे, त्यांना शिक्षण नाकारण्यात आल्यामुळे झाली आहे, म्हणूनच बहुजनांना शिक्षण खुले व्हायला हवे, असे महात्मा फुले यांचे ठाम प्रतिपादन होते. तोपर्यंत या देशाची थोर (?) संस्कृती स्त्रिया आणि बहुजनांना शिक्षण नाकारून तथाकथित वरिष्ठ वर्णाचे हितसंबंध जोपासण्याचे महान कर्तव्य निभावत होती. ब्रिटिश शासनकाळात कायदेशीर दृष्ट्या बहुजनांना शिक्षण खुले झाले, परंतु शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्याला अजून बराच अवकाश होता.

**शिक्षणहक्काचा घोष**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अगदी प्रारंभापासूनच शिक्षणाच्या विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर देण्यास सुरुवात झाली. पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९६८मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले होते, ज्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता सांस्कृतिक आणि आर्थिक विकास साधण्यासाठी समान शैक्षणिक संधी देण्यावर भर देण्यात आला होता. त्यात राजीव गांधी यांनी १९८६ साली भर घातली. त्यांनी जाहीर केलेल्या धोरणात मुलींसाठी शिक्षण, अनुसूचित जाती-जमाती यांच्यातील भेद दूर करण्यासाठी समान शिक्षण संधी यावर भर देण्यात आला होता.

या साऱ्याला १९६६ च्या कोठारी आयोगाच्या शिफारशींची पार्श्वभूमी होती. कोठारी आयोगाने अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या. त्यातील कॉमन स्कूल आणि कॉमन करिक्युलम म्हणजे समान दर्जाच्या शाळा आणि समान अभ्यासक्रम, जीडीपीच्या सहा टक्के शिक्षणावर खर्च आणि अनुदानित (Subsidized) उच्च शिक्षण या महत्त्वाच्या शिफारशींचा समावेश होता. परिणामी, स्त्रिया आणि बहुजनांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले. त्यांना सरकारी आणि खाजगी नोकऱ्या मिळू लागल्या आणि त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत सकारात्मक बदल घडण्यास सुरुवात झाली. अर्थातच तथाकथित उच्चवर्णीयांची शिक्षण आणि नोकऱ्यांमधील मक्तेदारी संपायला याच काळात सुरुवात झाली.

**जशी ऐपत, तसे शिक्षण**

यामुळेच असेल वा अन्य काही कारणे असतील, १९९० नंतर खाजगीकरण जागतिकीकरण आणि उदारीकरण या नावाखाली आधी उच्च आणि व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण करण्यास सुरुवात झाली नंतर या खाजगीकरणाच्या धोरणाने प्राथमिक शिक्षणातही प्रवेश केला. या खाजगी शाळांमधील बहुसंख्य शाळा या इंग्रजी माध्यमाच्या होत्या. आपली राजकीय गुलामी संपली असली तरी मानसिक गुलामी संपली नसल्याने उच्च आणि मध्यवर्गीय पालकांनी आपल्या मुलांना या इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांमध्ये पाठविण्यास सुरुवात केली. समान अभ्यासक्रम आणि समान शाळा या कोठारी आयोगाच्या राष्ट्रीय एकात्मतेला आवश्यक असणाऱ्या शिफारसीला धुडकावून लावण्यात आले. ज्या वर्गाला जी फी परवडते त्यांना तशी शाळा, हे नवे अघोषित शैक्षणिक धोरण झाले. यामुळे मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळांना दुय्यम दर्जाचे ठरविण्यात आले.

इथे एक गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे आहे ती म्हणजे, या शाळांचा दर्जा दुय्यम असेल वा दुय्यम झाला असेल, परंतु वस्तुस्थिती ही होती, आधी या शाळांना दुय्यम दर्जाचे ठरविण्यात आले आणि मग त्या शाळा दुय्यम दर्जाच्या झाल्या. आतातर फी परवडत नसतानाही कनिष्ठ मध्यमवर्गीय पालक आपल्या मुलांना अट्टाहासाने इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांमध्ये दाखल करत आहेत. परंतु, शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे व 'जसा दाम तसे शिक्षण' असा समज समाजात निर्माण केला गेल्यामुळे शिक्षण क्षेत्रात कमालीची विषमता सरकारी धोरणाने निर्माण झाली आहे.

यूपीए सरकारने २००९ मध्ये शिक्षण हक्क कायदा करून ६ ते १४ या वयोगटातील बालकांना शिक्षण मोफत आणि




*शिक्षक हक्क कायद्यांतर्गत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांवर जाचक अटी लादून ते शिक्षणापासून वंचित तरी राहतील किंवा नाइलाजास्तव खासगी शिक्षण व्यवस्थेला बळी तरी पडतील, अशीच व्यवस्था महाराष्ट्रात शासनस्तरावर झालेली दिसतेय...*

सक्तीचे केले. या वयोगटातील मुलांच्या शिक्षणाचा अधिकार मूलभूत अधिकार जाहीर केला. या कायद्यात अनेक त्रुटी असल्या तरी शिक्षण क्षेत्रातील उदारमतवादी आणि शिक्षण क्षेत्रातील व्यापारीकरणाविरोधात लढणाऱ्या संघटना आणि कार्यकर्त्यांना त्यांच्या मागण्यांसाठी या कायद्याने मोठा कायदेशीर आधार मिळवून दिला. या कायद्यात खाजगी शाळांनी त्यांच्या एकूण प्रवेशाच्या क्षमतेच्या पंचवीस टक्के जागा समाजातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांसाठी राखून ठेवण्याची तरतूद आहे व अशा विद्यार्थ्यांची फी सरकार भरणार असल्याचे म्हटले आहे. या तरतुदीचे अनेक संस्था संघटनांनी स्वागत केले. अर्थात, हे स्वागत करत असताना काही गोष्टी लक्षात घेतल्या गेल्या नव्हत्या. प्रथम म्हणजे, सरकार या खाजगी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखून ठेवते, याचा अर्थ सरकारी शाळा कमी दर्जाच्या आहेत, ही गोष्ट सरकार मान्य करते आणि त्याचबरोबर सरकारी शाळांचा खालावलेला दर्जा सुधारण्यासाठी सरकार काहीही करणार नाही, असेही स्पष्ट करते. २५ टक्क्यांचा प्रश्न सोडवताना उर्वरित ७५ टक्क्यांचे काय हा प्रश्नही कधी फारसा विचारात घेतला गेला नाही.

आपल्या आर्थिक क्षमतेप्रमाणे पाल्याची शाळा निवडण्याचा परिणाम असा झाला, की सहशिक्षण, अर्थात सर्व जाती-धर्मांच्या आणि विविध आर्थिक स्तरांच्या मुलांचे एकत्रित शिक्षण, ही कल्पनाच बाद होऊ लागली. विशिष्ट वर्गासाठी विशिष्ट शाळा हे तत्त्व मान्य झाले. त्यामुळे समाजातील गरीब मागासवर्गीय मुले आपल्या शाळेत नकोत, असे अनेक संस्थाचालक आणि पालकांनाही वाटू लागले व शिक्षण हक्क कायद्यातील या तरतुदीचा अंमल म्हणजे जुलमाचा रामराम बनून गेला.

**विषमतापूरक धोरण उघड**

महाराष्ट्र शासनही याच मानसिकतेचे आहे, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. जे कायद्याने गरीब आणि मागासवर्गीयांना मिळाले आहे, त्यापासून त्यांना वंचित करायचे हेच या सरकारचे धोरण झाले आहे असे दिसते, समता हे तत्त्व हे सरकार ज्या पक्षाच्या नेतृत्वाखाली आहे, त्या पक्षाच्या पितृसंस्थेला, म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला कधीही मान्य नाही. कदाचित म्हणूनच या सरकारने या कायद्याची अंमलबजावणी होऊ नये आणि झाली तरी कमी प्रमाणात व्हावी, यासाठी एक नामी उपाय शोधून काढला. शिक्षण हक्क कायद्याखाली प्रवेश मिळविताना ज्या शाळेत प्रवेश घ्यायचा आहे, ती शाळा घरापासून एक किलोमीटरच्या अंतरावर असली पाहिजे, ही पहिली आणि शाळा निवडताना किमान दहा शाळांचा पर्याय द्यावा ही दुसरी, अशा दोन अटी महाराष्ट्र शासनाने नव्या नियमाने केल्या. शिक्षण हक्क कायद्याखाली प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर या दोन अटी लादणाऱ्या शासनाने, अन्य विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी मात्र अशा अटी घातल्या नाहीत. यातूनच शासनाने, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांना शिक्षण हक्क कायद्याच्या अधिकाराखाली प्रवेश मिळवण्यापासून रोखण्यासाठीच या अटी निश्चित करण्याचे कारस्थान केले, ही गोष्ट स्पष्ट होते. म्हणूनच शासनाच्या निर्णयाचा विरोध होणे आवश्यक होते.

या नियमाविरोधात सामाजिक कार्यकर्ते आशिष फुलझेले यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आणि माननीय उच्च न्यायालयाने, शासनाने घेतलेल्या या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत शिक्षण हक्क कायद्याच्या विरोधात

जाणारा महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय रद्द करून बहुजनांना शिक्षण हक्कापासून वंचित करणारा हा नियम रद्द केला. हा निर्णय कायम राहिला असता तर या निर्णयाचा विपरीत परिणाम शहरी विद्यार्थ्यांवर तर झालाच असता, पण त्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या हक्कापासून पूर्णपणे वंचित केले असते. आशिष फुलझेले यांचे अभिनंदन.

या संदर्भात न्यायालयाने नोंदविलेल्या एका महत्त्वाच्या निरीक्षणाची दखल घ्यायलाच हवी. शिक्षण हक्क कायद्याखाली प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंडाची भावना अधोरेखित करून, मुलांच्या मनात ''तुम्ही या ठिकाणी योग्य नाही आहात'' अशा प्रकारची भावना निर्माण करणारे वातावरण वर्गामध्ये निर्माण केली जाते, असे माननीय न्यायालयाने म्हटले. इथे आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, असं वातावरण निर्माण करण्याला पालक, शिक्षक आणि व्यवस्थापन हे सारेच घटक जबाबदार आहेत. बऱ्याचदा ही गोष्ट जाणीवपूर्वक करण्यात येते. हे केले जाऊ नये म्हणून एक कडक आचारसंहिता निर्माण करणे गरजेचे आहे, कारण हा न्यूनगंड निर्माण करणारे वातावरण बदलण्याची मानसिकता बऱ्याच ठिकाणी अभावाने आढळते. समता हे भारतीय संविधानाच्या उद्देशातील महत्त्वाचे उद्देश्य आहे. त्याच्या अंमलात कोणी अडथळे निर्माण करत असेल तर ते कृत्य घटनाविरोधी मानायला हवे, अर्थात संविधान बदलण्याची गर्जना करणाऱ्यांकडून संविधानाचे पालन करण्याची अपेक्षा करणे, म्हणजे गाढवाने सुगम संगीत गावे, अशी अपेक्षा करणे होय.

**द्रोणाचार्यांची परंपरा संपावी**


महान भारतीय संस्कृतीने एका ठराविक वर्गाची चंगळ करण्यासाठी बहुजनांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कारस्थान हजारो वर्षे चालवले, त्यासाठी द्रोणाचार्यांनी गुरुदक्षिणा म्हणून एकलव्याचा अंगठा मागितला. महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या या निर्णयामागे द्रोणाचार्य परंपरा पुढे चालविण्याचा प्रयत्न होता. न्यायालयाच्या निर्णयाने आता हा प्रयत्न हाणून पाडला आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार अश्वत्थामा, राजा बळी, महर्षी व्यास, हनुमान, बिभीषण, कृपाचार्य व परशुराम हे सात चिरंजीव म्हणून वर्णन (अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च विभीषणः। कृपः परशुरामश्चैव सप्तैते चिरंजीविनः।।) केले आहेत. या सप्तचिरंजीवांमध्ये आठव्या द्रोणाचार्यांचाही समावेश असायला हवा होता. विद्येला सहाय्यभूत ठरणारे अंग हिरावून घेणारे द्रोणाचार्य जिवंत असतील वा नसतील, पण बहुजनांना ज्ञान नाकारणारी द्रोणाचार्यांची वृत्ती आजही जिवंत आहे. ही वृत्ती नष्ट व्हायला हवी. कारण जोपर्यंत द्रोणाचार्यांची वृत्ती मरत नाही, तोपर्यंत अर्जुन आणि एकलव्य एकत्र शिकूच शकणार नाहीत.

**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.**
**ई मेल :** drvivekkordeg@mail.com



# फाटलेल्या नात्याचा फापटपसारा



डॉ. मोहन द्रविड

विश्वकारण



अमेरिका आणि कॅनडा यांचं गेल्या शंभर वर्षांतलं नातं राम–लक्ष्मणासारखं होतं. कॅनडा अमेरिकेच्या मानाने खूप लहान. त्याचं सकल उत्पन्न अमेरिकेतल्या NVidia या एका कंपनीच्या बाजारी किंमतीपेक्षाही कमी आहे, असं विनोदानं म्हटलं जातं! कॅनडा वर्षानुवर्ष अमेरिकेच्या सावलीत राहात होता. आज्ञाधारकपणे. जणू अमेरिकेच्या अर्ध्या वचनात. दोघांचे संसार एक घर असावं, असे एकमेकात गुंतले होते. अगदी अमेरिकेच्या दुष्कृत्यातसुद्धा कॅनडा तिला आनंदाने साथ देत होता, कसलीही तक्रार न करता. नीतिमत्ता, मूल्यं, सद्सद्विवेकबुद्धी, वगैरेंना फाट्यावर मारून. ते संबंध आता ट्रम्पसाहेबांच्या राज्यात फाटायच्या मार्गावर आले आहेत…

दोन्ही देश म्हटलं तर वेगळे आहेत, म्हटलं तर एकसारखे आहेत. बाहेरच्या माणसाला त्यांच्यातला फरक चटकन समजणारही नाही. तुम्हाला भेटणारी व्यक्ती अमेरिकन आहे, असं तुम्हाला वाटत असताना ती सांगते, की मी कॅनेडीयन आहे. कॅनडातील प्रसिद्ध मंडळी – लेखक, नट, चित्रकार – स्वतःला 'नॉर्थ अमेरिकन' म्हणवून घेतात. त्या संज्ञेत खरं म्हटलं, तर अमेरिकन आणि कॅनेडीयन दोघेही यायला पाहिजेत. पण अस्सल अमेरिकन स्वतःला कधीही नॉर्थ अमेरिकन म्हणून घेत नाहीत. तेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला नॉर्थ अमेरिकन म्हणवून घेत असेल, तर ती व्यक्ती अमेरिकन नाही. असं खुशाल समजायला हरकत नाही.

कॅनडाचा भूगोल जर बघितला तर लक्षात येईल, तो देश बहुतांशी बर्फाळच आहे. जी काही थोडी मनुष्यवस्ती आहे, ती समुद्रकाठचा काही भाग सोडला तर अमेरिकेला अगदी बिलगूनच आहे. कॅनडाचा एक भूभाग तर अमेरिकेच्या पोटात घुसवलेल्या खंजिरासारखा आहे. कॅनडाचे चाळीस टक्के लोक या चिंचोळ्या पट्टीत – ऑंटॅरिओ या प्रांतात–राहतात. इथून एक ब्रीज पलिकडे अमेरिकेतल्या मोटरकार उद्योगधंद्याचं माहेरघर म्हणून संबोधलं गेलेलं डिट्रॉइट हे शहर आहे. कॅनडातले अनेक मोठे उद्योगधंदे याच भागात आहेत.

**फसलेल्या इतिहासाचे वर्तमान**

भौगोलिकदृष्ट्या कॅनडाचे अमेरिकेसारखे तीन भाग पडतातः पूर्व किनारा, मध्य पश्चिम आणि पश्चिम किनारा. सुरुवातीला आलेल्या युरोपीयन लोकांनी अर्थातच पूर्व किनाऱ्यावर वसाहती टाकल्या. अमेरिकेत त्या इंग्लिश होत्या, तर कॅनडात फ्रेंच. त्याशिवाय मध्य पश्चिमेत मेक्सिकन आखातीपर्यंतचा भूभाग फ्रान्सचा होता. त्याला लुईझियाना असं नाव फ्रेंच राजावरून दिलं होतं. कॅनडा व लुईझियाना मिळून व्हायचा 'नवफ्रान्स' (New France). अठराव्या शतकाच्या मध्यभागी फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यात जागतिक युद्ध झालं – बंगालमध्ये, युरोपमध्ये आणि अमेरिका खंडात. ते इंग्लंडनं जिंकलं आणि कॅनडा आपल्या ताब्यात घेतला (इ.स. १७६३).

अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध १७७६ साली चालू झाले. तेव्हा ब्रिटिशांविरुद्ध लढण्यासाठी कॅनडा आपल्याला मदत तर करेलच, पण नवीन राष्ट्रात तो विलीनही होईल अशी अमेरिकेची इच्छा होती. पण कॅनडा हा धर्माने कट्टर कॅथलिक, तर अमेरिका कट्टर प्रॉटेस्टंट! त्यामुळे अमेरिका आणि ब्रिटनच्या युद्धात कॅनडा अलिप्त राहिला. तेव्हा चिडून अमेरिकेच्या स्वातंत्र्यसैनिकांनी कॅनडावर हल्ला केला. पण ब्रिटिशांनी त्यांना झोडपून काढलं! अमेरिका आणि ब्रिटन यांचं १८१२ साली पुन्हा एकदा युद्ध झालं आणि अमेरिकेने कॅनडा घ्यायचा पुन्हा एकदा प्रयत्न केला आणि तो परत फसला. इतिहासाची एवढी उजळणी करण्याचं कारण अमेरिकेचे सध्याचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प हा इतिहास उकरून काढत आहेत.

अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर ब्रिटिशांना राजनिष्ठ राहिलेली प्रजा कॅनडात गेली. तिथला क्वेबेक हा फ्रेंच बोलणारा प्रांत टाळून ती मध्यपश्चिम भागात गेली. युरोपमधून नंतर आलेले लोक इंग्लिश कॅनडात गेले. त्यानंतर दोन्ही देशांनी पश्चिमेस पसरायला सुरुवात केली– तिथल्या इंडियन लोकांबरोबर (मूळ रहिवासी) केलेल्या करारांना पायदळी तुडवून. अर्थातच पुढे त्यांची सरसकट कत्तल केल्यानंतर ते करार पाळण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. अठराव्या शतकाच्या शेवटच्या दशकात फ्रान्समध्ये नेपोलियनचं साम्राज्य वसलं. नेपोलियनने सर्व जग जिंकायचा विडा उचलला आणि काही वर्षांतच देशाला कर्जबाजारी केलं. तेव्हा त्याने फ्रान्सच्या मेहेरबानीनेच नवीन स्वतंत्र झालेल्या अमेरिकेला लुईझियाना भाग कवडीमोलात विकला.

**दादागिरीची परंपरा**

यापुढे अनेक वर्षं कॅनडा आणि अमेरिका हे एकमेकांपासून लांबच राहिले. अधूनमधून कुरबुरी होत. अमेरिकेतील काही अतिउत्साही माणसांनी कॅनडाला 'राजामुक्त' करायचं ठरवलं आणि शस्त्रं घेऊन कॅनडात घुसले. पण ब्रिटिश सैनिकांना ते काही भावलं नाही आणि त्यांनी या मुक्तीसेनेला गचांडी मारून हाकलून लावलं. १८४०च्या दशकात पश्चिम किनाऱ्यावरील दोन देशांमधल्या सीमारेषा पक्क्या झाल्या नव्हत्या. त्यावरून समरप्रसंग येऊ घातला होता. तो पेच अमेरिकेने दादागिरीने सोडवला. ब्रिटनपासून ऑरिगन–ब्रिटिश कोलंबिया हे अंतर लक्षात घेऊन ब्रिटिशांनी फार ताणून धरलं नाही. तसाच प्रसंग त्याच वेळी अमेरिका आणि मेक्सिको यांच्यात आला. मेक्सिकोने अमेरिकेच्या दादागिरीला नमायचं नाही ठरवलं. झालेल्या युद्धात मेक्सिकोने निम्मा देश गमावला. याच काळात 'मन्रो डॉक्ट्रिन' आणि 'मॅनिफेस्ट डेस्टिनी' या दोन संज्ञा उदयास आल्या. दोघांचा अर्थ एकच! तो म्हणजे अमेरिकेची दादागिरी!




*आपण भयंकराच्या दारात उभे आहोत, याची जाणीव होऊन जनता ट्रम्प यांच्या अतिक्रमणकारी प्रवृत्तीविरोधात रस्त्यावर उतरली. स्वअस्तित्वाचे भान कॅनडीयन जनतेला तेही वेळीच येणे हे सुचिन्हच म्हणायचे...*

**सख्य आणि सबुरी**

त्यानंतर सत्तर वर्ष दोघांचे संबंध सबुरीचे आणि केवळ व्यापारी राहिले. जागतिक महायुद्धांत अमेरिका ब्रिटनच्या बाजूने उभी राहिली. त्यामुळे कॅनडाचा अमेरिकेशी संघर्ष होण्याची शक्यता नव्हती. दुसऱ्या महायुद्धात तर अमेरिका अडीच वर्षं उशिराने पडली. तोपर्यंत हजारो नात्सीविरोधी अमेरिकन तरुण कॅनडाच्या सैन्यात दाखल झाले. दोन देशांमधली सीमा आठ हजार लांबीची. ही जगातील सर्वात लांबलचक सीमा, पण तिथे गस्त घालण्यासाठी सैन्य ठेवायचीही गरज कुणाला भासली नाही. या सीमेवर अकरा जकात प्रवेशद्वारं (Custom ports) आहेत. तिथून सतत गाड्यांची वर्दळ सुरू असते. दोन्ही देशातल्या नागरिकांना आणि कायम निवासींना कमीत कमी त्रासात सीमा ओलांडता येते. उच्च शिक्षणाच्या बाबतीतही अशा रहिवाशांना खास सवलती आहेत. दोन्ही देशातल्या विमानांना माफक शुल्क भरून दुसऱ्याच्या देशावरून उडता येतं. दोन्ही देशातलं दूरध्वनीचं जाळं एकच आहे.

कॅनडाच्या निर्यातीचा ८० टक्के भाग अमेरिकेत जातो. कॅनडातून अमेरिकेत उत्तम प्रकारचं लाकूड जातं. अमेरिका हा जरी तेलसंपन्न देश असला, तरी तिला अधिक तेलाची आणि वायूची गरज लागते आणि ती कॅनडा पुरवतो. अमेरिका तिला लागणाऱ्या तेलाचा २५ टक्के भाग आयात करते. त्यातले ६० टक्के तेल कॅनडाकडून येतं. कॅनडा जे तेल तयार करतो, त्यातला ८० टक्के भाग अमेरिकेला जातो, म्हणजे दिवसाला ३० लाख बॅरल! कॅनडा-अमेरिका मध्ये नैसर्गिक वायू वाहण्यासाठी असंख्य पाइप आहेत.

जो प्रकार तेलाचा तोच प्रकार वीजेचा. अमेरिका दर वर्षी चार हजार अब्ज किलो-वॅट-आवर्स (युनिट्स) वीज वापरते. अमेरिका आणि कॅनडा यांच्यामध्ये १५०० किमी लांबीच्या ३० वीजेच्या तारा आहेत. त्यातून कॅनडाकडून अमेरिकेला दर वर्षी ६० अब्ज किलो-वॅट-आवर्स वीजपुरवठा होतो, तर अमेरिकेकडून कॅनडाला १३ अब्ज किलो-वॅट-आवर्स. दोघांमध्ये एकूण ४ अब्ज डॉलरचा वीजेचा व्यापार चालतो. कॅनडाला लागून असलेली मिनेसोटा, मिशिगन, न्यूयॉर्क यांसारखी राज्ये विजेच्या बाबतीत कॅनडावर संपूर्णपणे अवलंबून आहेत. कॅनडामध्ये देशी गाड्यांचं उत्पादन होत नसलं, तरी अमेरिकन गाड्यांचं आणि त्यातल्या भागांचं निम्मं उत्पादन कॅनडात होतं. गाड्यांची शेवटची जुळणी होईपर्यंत त्यांच्या कॅनडा-अमेरिका अशा सुमारे दहा फेऱ्या होतात. अमेरिकेच्या एअरोस्पेस इंडस्ट्रीतसुद्धा कॅनडाचा मोठा सहभाग आहे.

**विनाशातला भागीदारही**

नेटो या युरोप आणि अमेरिकेच्या संरक्षण संस्थेचा कॅनडा १९४९ सालापासून सभासद आहे. आणि अतिशय निष्ठावंत सभासद आहे. अमेरिकेने छू करायची खोटी, की कॅनडा अमेरिकेनेच नियुक्त केलेल्या चोराचा लचका तोडायला सज्ज. सुरुवातीस सामना होता, तो सोव्हिएत युनियनबरोबर. तेव्हा लढाई न करता केवळ दंड फुगवायचं काम असे. सोव्हिएत युनियन संपल्यानंतरच्या तीस वर्षांच्या काळात युगोस्लाव्हिया, इराक, अफगाणिस्तान, लिबिया या देशांचा सत्यानाश करायला कसलाही विधिनिषेध न बाळगता कॅनडा सर्वांच्या पुढे होता. अफगाणिस्तानमधील २० वर्षांच्या युद्धात त्याने एकूण ४०,००० सैनिक पाठवले. लिबियातील 'ऑपरेशन मोबाइल'मध्ये कॅनडाचं वायुदल आणि नौदल कार्यरत होतं. या क्षणी रशियाशी सामना करायला कॅनडाचे १००० सैनिक लॅटव्हिया या रशियाला लागून असलेल्या देशात सज्ज आहेत.

याचा अर्थ, अमेरिका जेव्हा इतर देशांत जाऊन त्यांच्या राष्ट्रीय संपत्तीचं अपहरण करत होती, तिथल्या लोकांची हत्या करत होती, तेव्हा कॅनडा नुसताच टाळ्या वाजवत नव्हता, तर त्या लुटमारीत सक्रिय मदत करत होता. अमेरिकेने जेव्हा व्हेनेझुएलावर आक्रमण करून त्या देशाचे अध्यक्ष मदुरो यांचं अपहरण केलं, तेव्हा पश्चिम खंडातल्याच कॅनडाला त्यात

काही गैर वाटलं नाही. उलट मदुरोच लोकशाहीची पायमल्ली करत होता, असल्या छापील सबबी तो देत राहिला.

आतासुद्धा जेव्हा अमेरिका इराणवर बाँबफेक करते, तेव्हा कॅनडाला आपल्या तथाकथित मूल्यांचा विसर पडतो. जेव्हा 'व्हावे' या चीनी कंपनीची मुख्य व्यापारी अधिकारी चीनमधून कॅनडावरून मेक्सिकोत जात होती, तेव्हा तिला अमेरिकेच्या आज्ञेवरून अटक केली आणि तीन वर्ष स्थानबद्धतेत ठेवलं. चीनवर विषारी प्रचार हल्ला करण्याच्या निमित्ताने कॅनडातले सर्व पक्ष एकमेकांवर कुरघोडी करण्यात मग्न होते. चीनच्या विद्युतगाड्यांवर जेव्हा अमेरिकेने शंभर टक्के जकात लावली, तेव्हा कॅनडाने लगोलग अमेरिकेचं अनुकरण केलं. आता जेव्हा ट्रम्पसाहेबांचा लत्ताप्रहार चालू झाला, तेव्हा कुठे कॅनडास सद्बुद्धी झाली.

दुसऱ्यांदा निवडून आल्यावर ट्रम्पनी डिसेंबर २०२४ मध्ये कॅनडा अमेरिकेत विलीन करण्याची भाषा चालू केली. कॅनडाच्या पंतप्रधानांना अमेरिकेच्या ५१व्या राज्याचे राज्यपाल असं संबोधायला सुरुवात केली. त्याचा एक परिणाम म्हणजे कॅनडात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत चांगल्या आघाडीवर असलेल्या कन्सर्व्हेटिव्ह पक्षाने (अमेरिकेतला रिपब्लिकन पक्ष) चांगलाच मार खाल्ला. त्यानंतर दोन देशांत जकात-युद्ध चालू झालं आहे. २०२६ सालच्या जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात कॅनडाचे नवीन पंतप्रधान मार्क कार्नी यांनी चीनला एक धडकभेट दिली आणि एक मोठा व्यापारी करार केला. त्याप्रमाणे कॅनडाने चीनच्या विद्युतगाड्यांवरची जकात शंभर टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर आणली आणि चीन कॅनडाचं कनोला तेल परत विकत घ्यायला सुरुवात करणार आहे.

**कॅनडाची अशीही कुतरओढ**

अर्थात कॅनडा आपल्या शब्दाला किती जागेल हा प्रश्न आहेच. याबाबतीत चीनने फार आशावादी होऊन चालणार नाही. अमेरिकेबरोबरचा वाद हा शेवटी घरगुती वाद आहे. असा एकही जागतिक प्रश्न नाही, की ज्याबद्दल दोघांमध्ये एकमत नाही. जोपर्यंत ट्रम्प आहेत आणि कॅनडाचा पाणउतारा करत आहेत, तोपर्यंत तरी चीनला दिलेला शब्द नाइलाजाने तरी का होईना, पण कॅनडाला पाळावा लागेल. कॅनडा आणि चीनमध्ये झालेल्या करारावर केलेल्या सह्यांची शाईसुद्धा वाळली नसेल तेवढ्यात चीनबरोबर केलेल्या सोयरिकीबद्दल कॅनडात मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आतापासूनच चिनी गाड्यांवर बहिष्कार टाकायची भाषा चालू केली आहे.

कॅनडाला समदुःखी युरोप आहे. ट्रम्पनी युरोपलासुद्धा त्याची जागा दाखवून दिली आहे. एवढा अपमान झाला, तरी हे देश (अधिक ऑस्ट्रेलिया) अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर कसलाही सारासार विचार न करता क्षणार्धात अमेरिकेच्या मागे उभे राहिले आहेत. (भारताच्या कॅनडाबरोबर झालेल्या वादात अमेरिका आपल्या बाजूने उभी राहील, ही भोळी आशा आपण सोडून दिली पाहिजे.) त्यात पुन्हा गेली तीन वर्ष युरोपची अर्थव्यवस्था असमाधानकारक आहे.

जर्मनी हा युरोपमधला सर्वात मजबूत देश. पण तिथेच मोठी मंदी आली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जर्मनीचे पंतप्रधान (चॅन्सलर) कॅनडाच्या पावलावर पाऊल टाकून व्यापारवृद्धीसाठी चीनच्या दौऱ्यावर गेले होते. तिथेही काही कारण नसताना त्यांनी युक्रेनचा प्रश्न काढला. चीनने तो उडवून लावला, हे जरी खरं असलं तरी युरोपलासुद्धा चीनची खोडी काढल्याशिवाय चैन पडणार नाही, हे उघड आहे. अमेरिकेला वगळून युरोप आणि कॅनडा एकत्र काम करण्याच्या उद्योगात आहेत. १६ फेब्रुवारीला कॅनडाला युरोपमधील अर्थमंत्र्यांच्या बैठकीस आमंत्रण दिले गेले. अशा बैठकीस बिगर-युरोपीयन देशाने हजर राहण्याची ही पहिली वेळ. जर्मनी आणि डेन्मार्कबरोबर कॅनडा काही प्रकल्प करायच्या विचारात आहे.

त्यानंतर मार्क कार्नी यांनी डाव्होसमध्ये एक भाषण ठोकले. 'नियमांवर आधारित व्यवस्था' ही आपली घोषणा पद्धतशीर थोतांड होती आणि इतर देशांवर हुकूमत गाजवण्यासाठी केलेला तो बनाव होता, याचा ७० वर्षांनंतर कबुलीजबाब दिला. हा पश्चात्ताप म्हणायचा की काय? नाही तर याचा अर्थ काय लावायचा? काही विश्लेषकांच्या मते, ही केवळ धूळफेक आहे. त्यांचा पहिला मुद्दा आहे की या कार्नींना पंतप्रधान कुणी आणि कोणत्या कसोटीवर केलं? असं म्हणतात की ते मोठे बँकर होते आणि बँक ऑफ इंग्लंडचा गव्हर्नर या नात्याने त्यांनी इंग्लंडला २००८-९ सालच्या मंदीतून बाहेर काढले. आता सत्य परिस्थिती अशी आहे, की त्या मंदीतून अमेरिका बाहेर पडली, युरोपीयन देशही सुखरूपपणे बाहेर पडले. फक्त इंग्लंड/ब्रिटनची परिस्थिती जैसे थे आहे. किंबहुना त्याची घसरण चालूच आहे.

एक वेळ ते महान बँकर आहेत, हे जरी मान्य केलं तरी



*एका नेत्याच्या लहरीवर जग चालू शकत नाही, हे आत्मज्ञान झाल्यानंतर कॅनडा आणि युरोपीयन युनियन मिळून सहकार्य–सौहार्दाचे सोहळे पार पडत आहेत...*

राजकारण किंवा प्रशासन याचा त्यांना अनुभव शून्य. आश्चर्य म्हणजे, विरोधी पक्षाने याविरुद्ध तोंडातून चकार शब्दही काढला नाही. अशा अननुभवी माणसाने प्रस्थापित पक्षाचे नेतृत्व करायला कुठून तरी जबरदस्त चक्रं फिरली असली पाहिजेत. कॅनडा आणि युरोप एकत्र येऊन ट्रम्पविरुद्ध आघाडी उघडण्याचा मनसुबा करत आहेत. त्याकरता कार्नीसारख्या राजकारणापासून अलिप्त अशा बँकरच्या मागून शरसंधान चालू आहे.

**भित्या कॅनडापाठी अमेरिकानामे ब्रम्हराक्षस**

कॅनडा आणि युरोप हे मांडलिक असून ते सर्व बाबतीत अमेरिकेच्या अर्ध्या वचनात आहे, या सूत्रात बदल करण्याची वेळ आली आहे. त्यांना वैयक्तिक मतं असून ती अमेरिकेपेक्षासुद्धा जहाल आहेत. ते अमेरिकेपेक्षा अधिक युद्धखोर आहेत. युक्रेनमधलं युद्ध बंद करू या, असं ट्रम्प म्हणत असताना युरोप ते वाढवायच्या मागे आहे. युद्धाच्या निमित्ताने युक्रेनकडे जाणाऱ्या पैशातून स्वार्थी राजकारण्यांना मिळणारा मलिदा त्यांना सोडवत नाही. अमेरिकेची युक्रेनला आतापर्यंत झालेली मदत १७५ अब्ज अमेरिकन डॉलर (नगद आणि शस्त्रसामुग्री) आहे, तर युरोपकडून गेलेला पैसा २०० अब्ज अमेरिकन डॉलर पर्यंत आहे. यातले निम्मे पैसे युक्रेनपर्यंत पोहोचतच नाहीत, असा जाणकारांचा अंदाज आहे.

इतके दिवस ‘आक्रमक’ चीन आणि ‘सैतानी’ रशिया यांची भीती घालून जेवढं मिळेल तेवढं स्वार्थी प्रस्थापितांनी संरक्षणाच्या नावाखाली जनतेला लुबाडून घेतलं आहे. त्यात आता ‘माथेफिरू’ ट्रम्पची भीती मिसळली गेली आहे. त्या निमित्ताने युरोप आणि कॅनडा एकत्र १०० अब्ज डॉलर शस्त्रांस्त्रांवर खर्च करण्याची योजना आखत आहेत. जर्मनी स्वतःला हिटलरच्या धर्तीवर सशस्त्र करण्याच्या विचारात आहे. कॅनडा जर्मनीला युद्धविमानांची आणि कोरियाला पाणबुड्यांची मोठी ऑर्डर देणार आहे. राष्ट्राच्या प्रगतीचा मार्ग हिंसक शस्त्रांस्त्रांमधून जातो, अशा खुळचट सिद्धांताची चलती आहे. त्याकरता हिटलरचं उदाहरण दिलं जातं. यातून देशाला भिकारी करणे यापलीकडे काही निष्पन्न होणार नाही. शस्त्रास्त्रं बनवणाऱ्या कंपन्यांची चांदी होणार हे नक्की. शेवटी कर्तुं–अकर्तुं अन्यथा कर्तुं समर्थः हे निर्विवादरीत्या केव्हाच सिद्ध झालेलं आहे.


**डॉ. मोहन द्रविड हे फिजिक्समधील पीएच.डी. असून राजकारण, विज्ञान, इतिहास या विषयांवरील त्यांचे लिखाण वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध होते. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असून ‘मुक्काम पोस्ट अमेरिका’ हे अमेरिकेचं सर्वांगीण दर्शन देणारे पुस्तक ‘रोहन प्रकाशन’ने प्रसिद्ध केले आहे.**
**संपर्क : ९८२०५ ६३१३०**



## मुखपृष्ठाविषयी :

**रिकार्डे गत्ती हा इटालियन शिल्पकार. मायकलेंजेलोचा त्याच्या कलाकृतींवरचा प्रभाव अगदी स्पष्ट दिसतो. गत्ती हा शिल्पकार माणूस, पृथ्वी आणि ब्रम्हांड या संबंधांचा संगमरवरी दगड–शिल्पातून शोध घेत असतो. संगमरवर हा त्याच्यासाठी केवळ एक दगड नव्हे, तर हजारो वर्षांच्या इतिहासाचा, विस्तारीत काळाचा हा इतिहास आहे. दगडाच्या रुपात साठलेली असीम ऊर्जा आहे. या शिल्पातला ओठांचा ओलावा गत्तीच्या सृजनशीलतेचा परमोच्च बिंदू मानला जातो...**

# ‘डोनट’मधले ‘इव्हज ड्रॉपर्स’!



रवि आमले

पाळतशाहीच्या पाऊलखुणा – ४




बर्मिंगहम येथील टपाल कार्यालयांच्या सिग्नल टॉवरची नावे! अवघ्या जगाला माहीत असलेली ही गोष्ट. ती जाहीर करण्यातून राष्ट्राचे हित धोक्यात येते, असे सांगण्यात येत असेल, तर त्यातून एकच बाब स्पष्ट होत होती, की ते या तिघांना काहीही करून अडकवण्याचे धोरण होते. त्यासाठी ‘ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्ट’मधील कलमांचा मनमानी अर्थ लावण्यात येत होता. राईचा पर्वत करण्यात येत होता. ‘गोपनीयता’, ‘राष्ट्रीय सुरक्षा’ असे शब्द फेकले, की भले–भले गप्प बसतात. नागरिकांचे दमन करण्यासाठीचे मोठे प्रभावी अस्त्र असते हे. त्याचा वापर करून या पत्रकारांच्या मुस्कटदाबीचा तो प्रयत्न होता...

**स्थ**ळ – नॉर्थ लंडनमधील मुस्वेल हिल उपनगर. तारीख – १८ फेब्रुवारी १९७७. वेळ – रात्रीची. लंडनमधला हा काळ कडाक्याच्या गारठ्याचा. पण तशा त्या थंडीतही स्कॉटलंड यार्डच्या स्पेशल ब्रँचचे पोलिस एका इमारतीबाहेर दबा धरून बसले होते. त्यांचे 'टार्गेट' होते, तीन तरुण. गेल्या सुमारे तीन–साडेतीन तासांपासून ते त्या इमारतीतील एका सदनिकेत छान 'कियान्ती' ही इटालियन वाइन पित बोलत बसले होते. ती सदनिका होती, एका माजी सैनिकाची. त्याचे नाव जॉन अ‍ॅश्ले बेरी. आता तो सामाजिक कार्यकर्ता म्हणून कार्य करीत होता. पण तो काय 'सामाजिक काम' करीत आहे, याची वेगळीच माहिती ब्रिटिश गुप्तचरांना होती. त्यामुळे, त्याच्यावर आणि त्याला भेटण्यासाठी आलेल्या त्या दोघांवर 'एमआय–फाइव्ह'चे गुप्तचरही पाळत ठेवून होते.

रात्रीचे दहा वाजून दहा मिनिटे झाली. ते दोघे जण बाहेर पडले. इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ आले. कारमध्ये बसून ते व्हिक्टोरिया स्टेशनच्या दिशेने निघणार, तोच साध्या वेशातल्या आठ पोलिसांनी त्यांना घेरले. एकाने त्यांना त्याचे ओळखपत्र दाखवले. कायद्याच्या राज्यात ही पद्धत असते. तेथे समोरच्याला 'मी कोण आहे माहीत आहे का तुला' असे विचारत नाहीत. ओळखपत्र दाखवतात. त्यांनी या दोघांचीही झडती घेतली. एकाच्या हातात ब्रीफकेस होती. ती जप्त केली. त्यांना अटक केली. आरोप होता– राष्ट्रीय गोपनीयता कायद्याचा भंग केल्याचा.

खरे तर हे दोघे कोणी हेर नव्हते, की कुठल्या परराष्ट्राचे एजंट नव्हते. मुक्त पत्रकार होते, ते. एकाचे नाव जॉन निकोलस क्रिस्पिन ऑब्री आणि दुसऱ्याचे डंकन कॅम्पबेल. जॉन बेरी याची मुलाखत घेण्यासाठी ते तेथे गेले होते. हा जॉन बेरी ब्रिटिश लष्कराच्या सिग्नल इंटेलिजन्स – सिगिन्ट – विभागात ऑपरेटर होता. काही वर्षांपूर्वी सायप्रसमध्ये पोस्टिंग होती, त्याची. त्याविषयीची काही माहिती होती, त्याच्याकडे. काही दिवसांपूर्वी ब्रिटनने सीआयएचा एक माजी एजंट फिलिप अ‍ॅगी आणि डंकन कॅम्पबेल यांचा सहकारी पत्रकार मार्क होसेनबॉल यांना अटक केली होती. त्यांना 'न्याय' मिळावा, यासाठी बेरी प्रयत्न करीत होता. त्या प्रकरणाचीही काही माहिती मिळवण्याचाही त्यांचा हेतू होता. त्यासाठीच ती मुलाखत होती. पण कॅम्पबेल सांगतात, त्याच्याकडून विशेष अशी काही माहिती मिळालीच नाही.

**सबब गोपनीयतेची**

या तिघांवर नंतर रीतसर खटला भरण्यात आला. ऑब्री, बेरी आणि कॅम्पबेल यांच्या नावाच्या आद्याक्षरांनी – 'एबीसी खटला' म्हणून तो ओळखला जातो. पण फारच भुसभुशीत पायावर उभा होता तो. त्या दोघा पत्रकारांवर 'ऑफिशियल सिक्रेट्स अ‍ॅक्ट'अन्वये आरोप ठेवण्यात आला होता, की ते 'गोपनीय माहिती अनधिकृतरीत्या स्वीकारत' होते. साक्षी–पुराव्यांतून समोर आले ते एवढेच, की ती सर्व 'गोपनीय' माहिती आधीपासूनच खुली होती. त्यात काहीही 'सिक्रेट' नव्हते. हा खटला न्यायालयात टिकणार नव्हताच. कसा टिकणार? सरकारी वकील तेथे अत्यंत गांभीर्याने 'ऑफिशियल सिक्रेट्स अ‍ॅक्ट'चा हवाला देत सांगत होते, की त्या पत्रकारांनी राष्ट्रहितास बाधक अशी माहिती जमा केली आहे. आणि ती माहिती कोणती, तर उदाहरणार्थ; लंडन आणि बर्मिंगहम येथील टपाल कार्यालयांच्या सिग्नल टॉवरची नावे! अवघ्या जगाला माहीत असलेली ही गोष्ट. ती जाहीर करण्यातून राष्ट्राचे हित धोक्यात येते, असे सांगण्यात येत असेल, तर त्यातून एकच बाब स्पष्ट होत होती, की ते या तिघांना काहीही करून अडकवण्याचे धोरण होते. त्यासाठी 'ऑफिशियल सिक्रेट्स अ‍ॅक्ट'मधील कलमांचा मनमानी अर्थ लावण्यात येत होता. राईचा पर्वत करण्यात येत होता. 'गोपनीयता', 'राष्ट्रीय सुरक्षा' असे शब्द फेकले, की भले–भले गप्प बसतात. नागरिकांचे दमन करण्यासाठीचे मोठे प्रभावी अस्त्र असते हे. त्याचा वापर करून या पत्रकारांच्या मुस्कटदाबीचा तो प्रयत्न होता. कोणत्याही निपक्ष न्यायालयात अशा प्रयत्नांच्या चिंधड्याच उडणार. तसेच झाले. किरकोळ दंड वगैरे भरून त्या तिघांचीही सुटका झाली.

**बिंग फोडण्याची शिक्षा**

आता येथे प्रश्न निर्माण होतो, की अशा प्रकारचा खटला उभा करण्याचा आटापिटा सरकारने का केला? त्याचे कारण दडले होते, डंकन कॅम्पबेल आणि अमेरिकी पत्रकार मार्क होसेनबॉल यांनी या घटनेच्या आठ महिने आधी लिहिलेल्या एका लेखात. शत्रू राष्ट्रांवर हेरगिरी करण्यासाठी उभारलेल्या संस्था, राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली आपल्याच नागरिकांवर कशाप्रकारे पाळत ठेवत असतात, याचे संकेत देणारा तो लेख. त्याने ब्रिटिश सरकारच्या मस्तकाची शीर तडकली नसती तरच नवल. त्या लेखाचा मथळा होता – 'द इव्हजड्रॉपर्स' – चोरून

ऐकणारे. या लेखातून त्यांनी पहिल्यांदा 'जीसीएचक्यू'चे स्वरूप, कार्य आणि व्याप्ती जगासमोर आणली. मोठी धक्कादायक माहिती होती, ती.

जीसीएचक्यू म्हणजे 'गव्हर्नमेन्ट कम्युनिकेशन हेडक्वार्टर'. १ नोव्हेंबर १९१९ हा तिचा स्थापना दिन. तिच्या स्थापनेशी भारताचाही बादरायण का होईना, पण संबंध जोडता येईल. भारतात व्हॉइसरॉय म्हणून राहून गेलेले, बंगालच्या फाळणीसाठी कुप्रसिद्ध असलेले लॉर्ड कर्झन हे पुढे ब्रिटनच्या 'कॅबिनेट सिक्रेट सर्व्हिस कमिटी'चे अध्यक्ष झाले. त्यांच्या समितीने 'कोड ब्रेकिंग एजन्सी' स्थापन करण्याची शिफारस केली होती. त्यातून जन्मास आले, 'गव्हर्नमेन्ट कोड अँड सायफर स्कूल'. पुढे त्याचेच नामांतर झाले, जीसीएचक्यू. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बकिंगहॅमशायरमध्ये ५८ एकराच्या 'ब्लेचली पार्क'मधून काम करायची ती. आता चेल्टनम शहरानजीकच्या १७६ एकर परिसरातील 'डोनट' आकाराच्या मुख्यालयातून ती जगभरातील इलेक्ट्रॉनिक आणि रेडिओ संदेशवहनावर नजर ठेवते. ते संदेश चोरून ऐकते.

ऐंशीच्या दशकापर्यंत हे फारसे कोणास माहीत नव्हते. अनेकांचा तर असा समज होता, की 'एमआय-फाइव्ह' आणि 'एमआय-सिक्स' (हिचे अधिकृत नाव 'सिक्रेट इंटेलिजन्स सर्व्हिसेस' - एसआयएस) याच ब्रिटनच्या सर्वांत मोठ्या हेरसंस्था आहेत. आजही तो समज कायम आहे. ही नावे चलनात असल्याने तसे वाटते खरे. पण हा समज चुकीचा आहे. जीसीएचक्यू हीच ब्रिटनची सर्वांत मोठी गुप्तचर संस्था आहे. कॅम्पबेल यांनी तो लेख लिहिला, त्या काळात जगभरात जीसीएचक्यूची सुमारे ५० मॉनिटरिंग स्टेशन्स होती. पाच हजारांहून अधिक ऑपरेटर्स त्यात काम करीत होते. जगभरातील सिग्नल वहनावर ते लक्ष ठेवत होते. अमेरिकेच्या 'नॅशनल सिक्युरिटी एजन्सी' - 'एनएसए'च्या हातात हात घालून हे काम चालत होते. ब्रिटनमध्ये एनएसएने त्यासाठी तीन गोपनीय तळ उभारले होते.

तसे हेरगिरीमध्ये गैर काही नाही. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ती आवश्यकच. संदेश 'इंटरसेप्ट' करणे ही तर त्यातील प्राथमिक महत्त्वाची बाब. पण हेरगिरी आणि पाळतखोरी यांत बारीक सीमारेषा असते. ती पुसली जाऊ नये, हेरगिरीच्या कारवाया अनिर्बंध असू नयेत, यासाठी तर तिला कायद्याचे बंधन घातले जाते. येथे ते कायदेच धाब्यावर बसवण्यात आल्याचे कॅम्पबेल यांचे म्हणणे होते. 'जीसीएचक्यू' केवळ 'शत्रूं'वर - मग ते परराष्ट्रांतील असोत वा देशातील 'आयरिश रिपब्लिकन आर्मी'सारखे दहशतवादी असोत - हेरगिरी करीत नव्हती. राष्ट्रीय सुरक्षेच्या व्यापक पडद्याखाली ती अमेरिकेच्या एनएसए प्रमाणेच व्यापारी संदेशवहनसुद्धा 'इंटरसेप्ट' करीत होती. कॅम्पबेल यांचा लेख हीच बाब लोकांसमोर ठेवत होता. जीसीएचक्यूमध्ये ज्याने प्रत्यक्ष काम केले होते, त्या जॉन बेरी याने ब्रिटनच्या 'नॅशनल कौन्सिल फॉर सिव्हिल लिबर्टिज' या संस्थेस पाठवलेल्या निवेदनात हेच म्हटले होते, की 'जीसीएचक्यू ही आपल्या तथाकथित मित्र राष्ट्रांचे रेडिओ नेटवर्क, एवढेच नव्हे तर ब्रिटिश कंपन्यांच्या कमर्शियल सिग्नलवर पाळत ठेवीत आहे, ते मॉनिटर करीत आहेः याची व्याप्ती आणि त्याकरीता ब्रिटिश सरकार पुरवत असलेले साधनस्त्रोत पाहता ही यंत्रणा ब्रिटनचे रूपांतर 'पोलिस राज'मध्ये करू शकते.' ही शक्यता भयंकर होती. आणि तिची चाहूलही लोकांना लागू नये, हा सरकारचा प्रयत्न होता. यासाठी सरकार प्रामुख्याने दोन आवडती साधने वापरते. एक म्हणजे - अज्ञान आणि दुसरे - भय. जनतेस अज्ञानात ठेवले की तिला प्रश्न पडत नाहीत. जे हे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न करतात त्यांना भय घातले, की ते गप्प बसतात. सेन्सॉरशिप, गोपनीयतेविषयीचे कायदे हे काम उत्तम प्रकारे करतात. कॅम्पबेल यांना त्या खटल्यात गोवले होते, ते त्यांना गप्प करण्यासाठीच. पण त्याचा फारसा उपयोग झाल्याचे दिसत नाही.

**पाळतखोरीवर बॉम्ब**

एक तर त्या 'एबीसी खटल्या'मुळे ब्रिटिश सरकारचा 'ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्ट'बाबतचा दृष्टिकोन बदलला. या कायद्यात एक उपकलम होते - 'सेक्शन टू'. त्यात गोपनीय माहितीची व्याख्या अशी काही ताणली होती, की ती कागदावर योग्य परंतु व्यवहारात हास्यास्पद ठरत होती. त्याबद्दल त्या काळी विनोदाने असे म्हटले जाई, की उद्या एखादा मंत्री त्याच्या चहात किती चमचे साखर घेतो, ही माहिती त्याच्या सचिवाने फोडली, तर या कलमाने त्याच्यावर गुन्हा दाखल करता येईल. तर हे असे कलम नंतर रद्द करण्यात आले. दुसरी बाब म्हणजे, त्या खटल्यानंतरही कॅम्पबेल यांची 'कलम'बंदी झाली नाही. यानंतर तीनच वर्षांनी, १ फेब्रुवारी १९८० रोजी 'न्यू स्टेट्समन' या मासिकातून त्यांनी अमेरिका आणि ब्रिटनच्या पाळतखोरीवर आणखी एक बॉम्ब टाकला. त्या लेखाचे नाव होते - 'बिग




*आपल्याकडे पेगॅससारखे प्रकरण न्यायाच्या सर्वोच्च पायरीवर जाऊन थंड होते, मीडिया आधीच गपगार झालेला असतो. तिकडे इंग्लंडमध्ये राज्यकर्त्यांच्या जुलूमशाहीला न जुमानता मीडिया आणि न्यायपालिका आपले कर्तव्य बजावत राहतात..*

---

बझ्बी इज वॉचिंग यू'.

'न्यू स्टेट्समन'चा तो अंक पाहण्यासारखा आहे. मुखपृष्ठावर एका ब्रिटिश अधिकाऱ्याचे मोठेसे कृष्ण-धवल छायाचित्र. त्याखाली ठळक अक्षरांत मथळा, की – 'हा माणूस फोन टॅप करतो'. त्याच्या बाजूला छोटी चौकट. त्यात एका सहा मजली इमारतीचे छायाचित्र आणि त्यावर लिहिलेले – '...आणि येथून चालते ते काम'. ही लंडनच्या चेल्सी भागातील पोस्ट खात्याची चारी बाजूंनी कुंपण, कुलूपबंद प्रवेशद्वारे, जाड सफेद पडद्यांनी झाकलेल्या खिडक्या अशी ती गूढ इमारत. तिला पोलिसी वर्तुळात 'टिंकरबेल' म्हणत. ही इमारत म्हणजे, सरकारी फोन टॅपिंगचे मुख्य केंद्र होती. जीसीएचक्यूने तयार केलेली फोन टॅपिंगची उपकरणे, त्या काळातील आधुनिक संगणक यांनी ते सज्ज होते. त्यात अमेरिकी तंत्रज्ञानावर आधारित संगणकीय 'व्हॉइस रेकग्निशन' तंत्र तर वापरले जात होतेच, शिवाय दूरध्वनीवरील संभाषण आपोआप लेखी स्वरूपात मुद्रित करण्याची व्यवस्थाही होती. हे केंद्र जीसीएचक्यू, एमआय-फाइव्ह आणि एमआय-सिक्सच्या कार्यालयांशी जोडलेले होते. त्यांना हवे ते फोन टॅप केले जात. त्यांचे ध्वनिमुद्रण हवे तेव्हा उपलब्ध करून दिले जाई. हे टॅप केले जाणारे फोन कोणाचे होते? सरकारला वाटेल त्याचे. ते गुन्हेगार, दहशतवादी, परकीय एजंटच असतील, असे नव्हे. कॅम्पबेल यांनी या लेखात एक उदाहरण दिले होते.

१९७६च्या ऑगस्ट महिन्यात लंडनमधील ग्रिनविक फिल्म प्रोसेसिंग लॅबमध्ये कामगार नेत्या जयाबेन देसाई यांनी संप पुकारला. तो पगारवाढीसाठी जेवढा होता, त्याहून अधिक मानवी प्रतिष्ठेसाठी होता. बहुसंख्य भारतीय, आशियाई कर्मचाऱ्यांची पिळवणूक होत होती, तेथे. एके दिवशी तेथील देवशी भुडिया या कर्मचाऱ्याला संथपणे काम करतो म्हणून काढून टाकण्यात आले. त्याच्या समर्थनार्थ सुरेश रुपारेलिया आणि चंद्रकात व भारत पटेल यांनी काम थांबवले. जयाबेन देसाई तेथेच काम करीत. त्यांना कंपनीने कामावरून कमी केले. यातून हा संप पेटला. दोन वर्षं तो चालला होता. त्यात युनियनबाजी झाली. अनेकदा त्यास हिंसक वळण लागले. आता हे संपकरी म्हणजे, काही पंचमस्तंभी नव्हेत. पण त्यांच्या नेत्यांचे फोन टॅप करण्यात येत होते. एवढेच नव्हे, तर त्या संपकऱ्यांच्या समितीने एका पबमधील खोलीत आपले कार्यालय सुरू केले होते. तर पोलिसांच्या स्पेशल ब्रँचने तेथील संभाषण ऐकण्यासाठी बाहेर दूर पल्ल्याचे मायक्रोफोन्स बसवले होते. आणि हे केवळ याच संपात करण्यात येत होते असे नाही. कॅम्पबेल सांगतात, फोन टॅपिंगचा दुरुपयोग होऊ नये म्हणून एक विशिष्ट कायदेशीर प्रक्रिया आखून दिलेली आहे. त्यासाठी आधी 'वॉरंट' घ्यावे लागते. पण सुरक्षा यंत्रणांना यातून जणू कायम स्वरूपी सूट देण्यात आली होती.

त्या काळात कॅम्पबेल यांनी अशी भीती व्यक्त केली होती, की लवकरच नव्या पद्धतीचे टेलिफोन एक्स्चेंज येणार आहेत. त्यांच्यावर नियंत्रण ठेवले नाही, तर ते घाऊक पाळतीचे हत्यार बनू शकतील. आपली ही भीती किती रास्त आहे आणि टेलिफोन एक्स्चेंजच्याही पलीकडे जाणारी आहे, हे त्यांना लवकरच कळणार होते. तसेही अमेरिकेचे उदाहरण त्यांच्या डोळ्यांसमोर होतेच...

**रवि आमले हे ज्येष्ठ पत्रकार-संपादक, प्रथितयश लेखक आणि भाष्यकार आहेत. त्यांची प्रोपगंडा, रॉ: भारतीय गुप्तचर संस्थेची गूढ गाथा, मॅनहंट (अनुवादित), परकीय हात, वरुण ते बहिर्जी आदी पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.**
**संपर्क:** ravi.amale@icloud.com

# इराणयुद्ध : साम्राज्यवादाची अर्थव्यवस्था उलगडताना...



हितेश पोतदार

अर्थबोध



*साम्राज्यवादी राष्ट्रांनी इराणमध्ये युद्धाचा भडका उडवला, त्याच्या झळा उर्वरित जगासोबत भारतातल्या सामान्यांनी सोसल्या...*

**या** मालिकेतील मागील काही लेखांमध्ये आपण जगाच्या राजकीय अर्थव्यवस्थेचा पाया समजून घेण्याचा प्रयत्न केला. इतिहास, भांडवलशाहीचा विस्तार, कामगारांचे जगणे आणि जागतिक स्तरावर निर्माण होणाऱ्या संबंधांची रचना. या सगळ्यांच्या माध्यमातून आपण आजच्या क्षणाला समजून घेण्यासाठी काही धागे उलगडत होतो. पण हा लेख त्या प्रवाहातला एक 'व्यत्यय' आहे, असे समजूयात. हा व्यत्यय केवळ लेखनाच्या मालिकेत नाही, तर तो आपल्या दैनंदिन जीवनातही घडतो आहे...

इस्रायल–अमेरिकेने अक्षरशः लादलेल्या युद्धामुळे हजारो किलोमीटर दूर इराणमध्ये पडणारे बॉम्ब, तिथे विस्कळीत होणारे जीवन आणि अचानक वाढणाऱ्या तेलाच्या किमती हे सगळं एकाच वेळी घडतं आणि त्याचे पडसाद महाराष्ट्रातल्या घराघरांत उमटतात. पेट्रोल पंपावर वाढलेले दर, गॅस सिलिंडरची वाढती किंमत, भाजीपाला महाग होणं, शेतीसाठी लागणाऱ्या खतांचे दर वाढणं हे सगळे लहान वाटणारे बदल आपल्याला या मोठ्या युद्धाशी जोडतात.

म्हणजेच, इराणमधील युद्ध हे फक्त तिच्याच भूमीत घडत नाहीये. तर ते इथेही घडतंय. आपल्या गल्लीत, गावात, शहरात, खिशात, आपल्या ताटात आणि आपल्या श्रमांच्या किमतीत. यातून एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. आपल्या दैनंदिन जीवनावर इतक्या दूर घडणाऱ्या घटनांचा एवढा खोल परिणाम का होतो?

हा प्रश्न केवळ 'भू–राजकारणा'चा नाही. तो जागतिक राजकीय अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे. आजची भांडवली व्यवस्था अशी गुंफलेली आहे की जगातील ऊर्जा, अन्न, पैसा आणि व्यापाराचे मार्ग काही विशिष्ट प्रदेशांमध्ये आणि काही शक्तिशाली देशांच्या नियंत्रणाखाली केंद्रित झाले आहेत. त्यामुळे जेव्हा त्या ठिकाणी युद्ध पेटते, तेव्हा त्याचे धक्के संपूर्ण जगभर पसरतात. म्हणून इथे फक्त देशांतील परस्परसंबंधांचा प्रश्न नाही. या संबंधांमध्ये जे सत्तेचे असमान नाते दडलेले आहे, त्याचा संबंध अधिक आहे. काही देश, काही राज्ये आणि काही आर्थिक शक्ती, काही मोठ्या कंपन्या आणि वित्तीय संस्था यांच्याकडे एवढी क्षमता आहे, की ते आपल्या निर्णयांमुळे इतर देशांतील लोकांचे जीवन विस्कळीत करू शकतात. म्हणूनच, हा व्यत्यय आपल्याला एका मोठ्या संकल्पनेकडे म्हणजेच साम्राज्यवादाच्या (imperialism) दिशेने घेऊन जातो.

साम्राज्यवाद म्हणजे केवळ एका देशाने दुसऱ्यावर केलेला लष्करी हल्ला नाही. तो जगाच्या अर्थव्यवस्थेची अशी रचना आहे, जिथे संसाधने, व्यापारमार्ग, चलनव्यवस्था आणि राजकीय निर्णय यांवर काही शक्तींचे वर्चस्व असते. या वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या देशांवर कधी निर्बंध, कधी त्यांची आर्थिक गळचेपी आणि कधी त्यांवर थेट लष्करी हल्ले करून अशा विविध स्वरूपात दबाव आणला जातो.

इराणवर लादलेले युद्ध हा या प्रक्रियेचा केवळ एक ताजा टप्पा आहे. इथे आपण या 'व्यत्यया'कडे केवळ एका युद्धाच्या घटनेप्रमाणे पाहत नाही, तर त्यातून साम्राज्यवाद आज कसा काम करतो, तो आपल्या दैनंदिन जीवनात कसा शिरतो आणि महाराष्ट्रातल्या सामान्य माणसाच्या जगण्याशी त्याचा काय संबंध आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न करत असतो.

**इराणच्या उदाहरणातून उलगडत जाणारा साम्राज्यवाद**

सामान्यपणे आपण साम्राज्यवाद हा शब्द ऐकतो, तेव्हा डोळ्यासमोर एक चित्र उभं राहतं. ते म्हणजे, एक शक्तिशाली देश दुसऱ्या देशावर हल्ला करतो, त्याची जमीन काबीज करतो आणि तिथे आपली सत्ता बसवतो. वसाहतवादाच्या काळातही हे चित्र बऱ्याच अंशी असंच होतं. पण आजचा साम्राज्यवाद इतकाच सरळ आणि उघड नाही.

आज साम्राज्यवाद सीमांवर दिसणाऱ्या युद्धात जितका असतो, तितकाच तो बँकांच्या व्यवहारात, चलनव्यवस्थेत, व्यापारमार्गांमध्ये आणि कर्जाच्या अटींशर्तींमध्येही लपलेला असतो. तो फक्त सैनिकांच्या सुटाबुटातून, दुर्बल देशांवर केलेल्या लष्करी आक्रमणातून दिसत नाही, तर तो डॉलरच्या व्यवहारात निर्बंधांच्या कागदपत्रांत आणि तेलाच्या जहाजांच्या समुद्रीमार्गातही दिसतो. थोडक्यात साम्राज्यवाद म्हणजे प्रगत भांडवलशाहीची अशी रचना, जिथे काही शक्तिशाली देश आणि त्यांच्याशी जोडलेल्या आर्थिक शक्ती जगातील संसाधने, बाजारपेठा आणि पैशाचा प्रवाह आपल्या नियंत्रणाखाली ठेवतात.

त्याकडे केवळ एखाद्या मूर्खसदृश नेत्याची चुकलेली नीती, धोरण किंवा युद्धखोर वृत्ती म्हणूनही बघता येत नाही. ती साम्राज्यवादाच्या टिकावासाठीची एक संरचनात्मक गरज असते. मोठ्या अर्थव्यवस्थांना आणि कंपन्यांना सतत विस्तार, नफा आणि नवीन संसाधनांची गरज असते. जेव्हा एखादा देश या प्रक्रियेत आपली स्वायतत्ता अधोरेखित करून अडथळा निर्माण करतो, उदाहरणार्थ, आपल्या नैसर्गिक संपत्तीवर स्वतःचा हक्क सांगतो, तेव्हा त्याच्यावर दबाव आणला जातो. त्याचा विध्वंस करण्याचे अनेक डावपेच आखले जातात. आजच्या युगात हा हस्तक्षेप इतक्या उघडपणे होत नाही, असा काहीसा समज निर्माण होत होता, पण ट्रम्प, नेत्यान्याहू यांनी या समजाला छेद दिला आहे. आज साम्राज्यवादाची अनेक सर्वमान्य साधने नव्याने तयार झाली आहेत.

एक मोठं साधन म्हणजे, आर्थिक निर्बंध. एखाद्या देशाला आंतरराष्ट्रीय व्यापारातून, बँकिंग व्यवस्थेतून आणि चलन

व्यवहारातून वेगळं केलं जातं. औषधे, अन्न, इंधन सगळ्याच गोष्टी महाग होतात. या निर्बंधांचा सर्वात मोठा फटका सरकारांना नव्हे, तर त्या देशातील सामान्य लोकांना बसतो. दुसरं महत्त्वाचं साधन म्हणजे, डॉलरचं वर्चस्व (dollar hegemony). जगातील बहुतेक तेल आणि मोठे व्यवहार अमेरिकन डॉलरमध्ये होतात. त्यामुळे अमेरिकेकडे अशी ताकद येते, की ती जागतिक वित्तीय प्रणालीतून कोणत्याही देशाला बाहेर ढकलू शकते. म्हणजेच, युद्ध न करता देखील एखाद्या देशाची अर्थव्यवस्था गुदमरवता येते. आणि तिसरं, अधिक उघड साधन–लष्करी शक्ती. जेव्हा आर्थिक आणि राजनैतिक दबाव पुरेसा ठरत नाही, तेव्हा थेट हल्ले, युद्ध किंवा 'सुरक्षे'च्या नावाखाली हस्तक्षेप होतो.

इराणवरील सध्याचे युद्ध या तिन्ही घटकांचा संगम दाखवते. दीर्घकालीन निर्बंध, आर्थिक गळचेपी आणि अखेरीस थेट लष्करी आक्रमण. म्हणूनच, साम्राज्यवाद समजून घेण्यासाठी फक्त 'कोण कोणावर हल्ला करतो' हे पाहून चालत नाही. आपल्याला हेही पाहावं लागतं की, कोण संसाधनांवर नियंत्रण ठेवतो, कोण चलनव्यवस्था नियंत्रित करतो आणि कोण ठरवतो, की कोणता देश 'मान्य' आणि कोणता 'धोकादायक' आहे. इराणचा प्रश्न हा याच मोठ्या चौकटीत बसतो. म्हणूनच, हा केवळ एका देशाचा प्रश्न राहत नाही, तर तो संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेचा आणि सत्तासंबंधांचा प्रश्न बनतो.

**इराणच का?**

इराणवरील आजचे युद्ध समजून घ्यायचे असेल, तर ते फक्त २०२६ पासून सुरू झाले आहे, असे मानून चालणार नाही. या संघर्षाची मुळे खूप खोलवर आहेत. किमान शंभर वर्षांच्या इतिहासात. या इतिहासात एक पॅटर्न सतत दिसतो. जेव्हा जेव्हा इराणने आपल्या संसाधनांवर किंवा राजकारणावर स्वतःचा ताबा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तेव्हा बाह्य शक्तींनी हिंसक हस्तक्षेप केला.

या कथेला एक महत्त्वाचा टप्पा आहे, तो १९५३चा. त्या वेळी इराणमध्ये मोहम्मद मोसादेघ यांचे लोकशाही सरकार होते. त्यांनी एक साधा, पण धाडसी निर्णय घेतला. तो देशातील तेल उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करण्याचा. म्हणजेच, इराणचे तेल परकीय कंपन्यांच्या ताब्यात न राहता इराणच्या लोकांच्या ताब्यात यावे.

पण हा निर्णय पाश्चात्य शक्तींना मान्य नव्हता. कारण तेल हे केवळ ऊर्जा साधन नव्हते. ते जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा होते. आणि अजूनही आहे. परिणामी, अमेरिकेची सी.आय.ए. आणि ब्रिटनची एम.आय-सिक्स यांनी मिळून मोसादेघ यांचे सरकार उलथवून लावले आणि शहांची हुकूमशाही पुन्हा सत्तेवर बसवली आणि साहजिकच हा हस्तक्षेप लोकशाही वाचवण्यासाठी नव्हता, तर तो संसाधनांवर नियंत्रण टिकवण्यासाठी होता.

यानंतर जवळपास दोन दशके अमेरिकेच्या पाठिंब्याने इराणमध्ये शहांची सत्ता टिकली. या काळात देशात काही प्रमाणात 'आधुनिकीकरण' झाले, पण त्याचबरोबर तीव्र दडपशाही, विषमता आणि असंतोषही वाढला. १९७९ मध्ये हा असंतोष स्फोटक झाला. मोठ्या जनआंदोलनातून शहांची सत्ता कोसळली. कामगारांचे संप, विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि सर्वसामान्य लोकांचा रस्त्यावर उतरलेला लढा या सगळ्यांनी मिळून एक क्रांती घडवली.

या क्रांतीत एक महत्त्वाचा, पण अनेकदा दुर्लक्षित घटक होता. कामगारांची स्वयंसंघटना, ज्याला इराणमध्ये 'शोरा' असे म्हणत. अनेक ठिकाणी कामगारांनी कारखान्यांवर ताबा घेतला, उत्पादन कसे चालवायचे हे स्वतः ठरवले. म्हणजेच, हा फक्त सत्ताबदल न ठरता तो समाजव्यवस्थेवरच प्रश्न उपस्थित करणारा क्षण होता.

पण ही शक्यता फार काळ टिकली नाही. क्रांतीनंतर सत्तेत आलेल्या इस्लामिक रिपब्लिकने हळूहळू या स्वायत्त संघटनांचे दमन सुरु केले, कामगार चळवळींना कमकुवत केले आणि एक नवीन प्रकारची राज्यसत्ता प्रस्थापित केली. बाह्य हस्तक्षेप आणि अंतर्गत दडपशाही या दोन्हींच्या मध्ये अडकलेला इराण पुढे गेला. यानंतरच्या दशकांमध्ये इराणवर सतत आर्थिक निर्बंध, राजकीयदृष्ट्या विलग आणि 'आण्विक युद्धाचा धोका' या कारणांखाली दबाव टाकला गेला. कधी वाटाघाटी, कधी करार आणि पुन्हा निर्बंध. असे एक भीषण चक्र सुरू राहिले.

म्हणून इराणचा इतिहास हा फक्त 'एक हुकूमशाही राज्य' किंवा 'एक बंडखोर देश' यापुरता मर्यादित राहत नाही. तर तो असा इतिहास ठरतो, जिथे बाह्य शक्ती संसाधनांवर सतत नियंत्रण ठेवू पाहतात, अंतर्गत सत्तासंघर्ष लोकांच्या आकांक्षा दडपतात आणि सामान्य जनता या दोन्हींच्या मध्ये अडकते. याच पार्श्वभूमीवर आजचेही युद्ध उभे आहे. म्हणूनच, २०२६ मधील हल्ले हे एखाद्या अचानक उद्भवलेल्या तणावाचे परिणाम नाहीत. ते या दीर्घ प्रक्रियेचा एक भाग आहेत, जिथे साम्राज्यवाद, राज्यसत्ता आणि लोकांचे जीवन यांचा संघर्ष सतत चालू आहे.

**वर्तमानाचा स्फोट की दीर्घ प्रक्रियेचा पुढचा टप्पा?**

फेब्रुवारी २०२६ मध्ये अमेरिका आणि इस्रायलने इराणवर मोठ्या प्रमाणावर हवाई हल्ले केले. या हल्ल्यांची वेळ आणि

पद्धत दोन्ही लक्षवेधी होत्या. या हल्ल्यांचे परिणाम त्वरित दिसू लागले. जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती वाढल्या आणि हॉर्मुझच्या सामुद्रधुनी (स्ट्रेट)भोवती निर्माण झालेल्या तणावामुळे ऊर्जा पुरवठ्याबाबत अनिश्चितता वाढली. ही केवळ बाजाराची हल्ल्याला दिलेली प्रतिक्रिया नव्हती. ती एक विशिष्ट जागतिक रचना आहे, जिथे काही विशिष्ट प्रदेश आणि मार्ग संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी निर्णायक ठरतात. त्यामुळे तिथे होणारा संघर्ष लगेचच जगभर पोहोचतो.

पण हे युद्ध फक्त आर्थिक परिणामांपुरतं मर्यादित नाही. त्याचं एक स्पष्ट लष्करी स्वरूप आहे. हवाई हल्ले, लक्ष्यित हत्या आणि 'अचूक' युद्धतंत्रज्ञानाचा वापर केला जातो. तरीही, 'अचूकता' हा शब्द इथे अनेकदा फसवा ठरतो. नागरी ठिकाणांवर, शाळा, इस्पितळांवर झालेल्या हल्ल्यांच्या बातम्या आपल्याला आठवण करून देतात, की आधुनिक युद्ध तंत्रज्ञान प्रगत झालं असलं, तरी त्याचे परिणाम पूर्वीसारखेच मानवी आणि विध्वंसक राहिले आहेत. युद्धाची भाषा बदलली आहे, पण युद्धाचा अनुभव नाही.

या सगळ्याच्या मागे एक तिसरा राजकीय संदेशाचा अधिक खोल स्तर आहे. अशा प्रकारचे हल्ले केवळ एका देशाला लक्ष्य करत नाहीत. ते इतर देशांनाही संकेत देतात. जागतिक व्यवस्थेला आव्हान देण्याची किंमत काय असू शकते, हे दाखवण्याचा हा एक मार्ग असतो. त्यामुळे हे युद्ध इराणपुरतं मर्यादित राहत नाही. ते संपूर्ण प्रदेशात आणि त्यापलीकडेही सत्तासंतुलन बदलण्याचा प्रयत्न बनतं.

इथेच साम्राज्यवाद पुन्हा समोर येतो. साम्राज्यवाद आज केवळ भूभाग जिंकण्याचा प्रश्न नाही. तो प्रदेशांवर, संसाधनांवर आणि आर्थिक मार्गांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आहे. काही वेळा याला regime change असं म्हटलं जातं. म्हणजे फक्त तेथील सरकार बदलणं एवढंच नव्हे, तर त्या देशातील सामाजिक रचना बदलून जागतिक व्यवस्थेला साजेशी बनवणे. पण अनेकदा हा प्रयत्न त्यापेक्षा व्यापक असतो. तो संपूर्ण प्रदेशाचा राजकीय आणि आर्थिक नकाशा बदलण्याचा प्रयत्न असतो.

इराणवरील सध्याचे हल्ले या मोठ्या चौकटीत पाहिले, तर ते अधिक स्पष्ट होतात. दीर्घकाळ चाललेले निर्बंध, आर्थिक दबाव आणि आता थेट लष्करी हस्तक्षेप हे सगळं एका सलग प्रक्रियेचा भाग म्हणून दिसू लागतं. पण या सर्व विश्लेषणांच्या पलीकडे एक साधी, पण महत्त्वाची गोष्ट आहे. या सत्तासंघर्षाच्या केंद्रस्थानी असतात, ते सामान्य लोक. तेहरानमध्ये, इस्फहानमध्ये किंवा मिनाबमध्ये या सामान्य लोकांचं दैनंदिन जीवन अचानक युद्धाने विस्कळीत होतं. त्याच वेळी, हजारो किलोमीटर दूर असलेल्या महाराष्ट्रात, जिथे युद्धाचा अनुभव वेगळ्या स्वरूपात येतो. त्याचा प्रभाव महागाईत, अनिश्चिततेत आणि रोजच्या जगण्यात उमटतो.

म्हणजेच, २०२६ चे हे युद्ध जागतिक पटलावरील व तिच्या इतिहासातील केवळ एक घटना ठरत नाही. असे क्षण आपल्याला जागतिक राजकीय अर्थव्यवस्थेची रचना उघड करून दाखवतात. व्यवस्थेला अधिक नग्न करतात. या रचनेत युद्ध, बाजार आणि दैनंदिन जीवन हे एकमेकांपासून वेगळे नसतात. ते एकाच प्रक्रियेचे वेगवेगळे पैलू ठरतात.

**डॉलर, निर्बंध आणि आर्थिक युद्धः साम्राज्यवादाचा अदृश्य चेहरा**

'डॉलरच्या वर्चस्ववादा'तून निर्माण झालेल्या निर्बंधांचा सामना इराण गेल्या अनेक दशकांपासून करत आहे. निर्बंधांवरील पर्याय काढण्यासाठी इराणने अलीकडे काही व्यवहार अमेरिकन डॉलरऐवजी चिनी चलन 'युआन'मध्ये करण्याची तयारी दाखवली आहे. यासाठी चीनच्या स्वतंत्र बँकिंग प्रणालीचा वापर केला जाणार आहे, ज्यामुळे व्यवहार अमेरिकन नियंत्रणाच्या बाहेर राहतील. हे डॉलरच्या वर्चस्वाला थेट एक आव्हान आहे.

त्यामुळे अमेरिकेच्या लष्करी ताकदीवर अवलंबून असणाऱ्या साम्राज्यवादालाही आव्हान मिळाले असते. पर्यायाने त्यांच्या आर्थिक आणि वित्तीय साम्राज्यवादालाही सुरुंग लागला असता. त्या अमेरिकन संरचनांना जर पर्याय निर्माण झाले, तर त्याच्या शक्तीलाही तडे जाऊ शकतात. पण या प्रक्रियेत एक विरोधाभासही आहे.

एका बाजूला, अशा पर्यायांमुळे काही देशांना थोडी स्वायत्तता मिळू शकते. पण दुसऱ्या बाजूला, जागतिक स्तरावर निर्माण होणारी ही ताणतणावाची परिस्थिती, जसे निर्बंध, चलनातील बदल, व्यापारातील अडथळे यांचा सर्वात मोठा फटका पुन्हा एकदा सामान्य लोकांनाच बसतो. म्हणजेच, साम्राज्यवादाचा हा आर्थिक चेहरा अधिक धोकादायक ठरतो, कारण तो अनेकदा अदृश्य असतो. बॉम्ब पडतात, तेव्हा युद्ध डोळ्यांना दिसतं, पण जेव्हा एखाद्या देशाची अर्थव्यवस्था हळूहळू गुदमरते, तेव्हा ते युद्ध आहे, हे लगेच लक्षात येत नाही. म्हणून आपल्याला बँकांच्या व्यवहारांकडे, चलनांच्या हालचालींकडे आणि निर्बंधांच्या राजकारणाकडेही तितक्याच

लक्षपूर्वक पाहावं लागतं.

आपण वारंवार म्हणत असतो की 'डेटा' हेच नवे तेल आहे आणि पुढील युद्धे तेलावर नियंत्रण मिळवण्यासाठी नव्हे, तर डेटासाठी लढली जातील. पण वास्तवाकडे पाहिलं, तर अलीकडील व्हेनेझुएला आणि इराणमधील अमेरिकन हस्तक्षेप आपल्याला एक वेगळीच गोष्ट सांगतात. साम्राज्यवाद अजूनही पूर्णपणे संसाधनांच्या 'क्लासिकल' राजकारणातून बाहेर आलेला नाही. म्हणूनच तेल ही केवळ एक वस्तू नाही. तेलाचा व्यापार आणि त्यावरील नियंत्रण ही आजही आधुनिक अर्थव्यवस्थेची एक मूलभूत अट आहे. आपण कितीही ए.आय. डेटा आणि डिजिटल अर्थव्यवस्थेबद्दल बोललो, तरी या सगळ्याच्या पायाशी अजूनही ऊर्जा उभी आहे. ऊर्जा नसल्यास सर्व्हर चालत नाहीत, डेटा सेंटर चालत नाहीत आणि तंत्रज्ञानाची ही संपूर्ण दुनिया थांबते.

यामुळेच तेलाच्या किमती वाढल्या की त्याचा परिणाम केवळ घरातील गॅस किंवा पेट्रोल पंपापुरता मर्यादित राहत नाही. तो संपूर्ण उत्पादन प्रक्रियेत पसरतो. वाहतूक, शेती, उद्योग आणि शेवटी आपल्या दैनंदिन जगण्याच्या प्रत्येक स्तरावर. म्हणूनच, इराणवरील संघर्ष हा केवळ एका देशाचा प्रश्न म्हणून उरत नाही. तर भारताचा आणि पर्यायाने महाराष्ट्रासाठीही तेवढाच महत्वाचा प्रश्न म्हणून समोर येतो.

**भारत, स्वायत्तता आणि आपल्या जगण्याचा प्रश्न**

भारताची अर्थव्यवस्था आज मोठ्या प्रमाणावर ऊर्जा आयातीवर अवलंबून आहे. तेल आणि गॅस यांसारख्या मूलभूत गरजांसाठी आपण बाहेरच्या बाजारांवर, विशेषतः पश्चिम आशियावर निर्भर आहोत. त्यामुळे या प्रदेशात उडणारा भडका आणि त्यातून निर्माण होणारा तणाव हा थेट आपल्या अर्थव्यवस्थेत उतरतो. पण हा प्रश्न केवळ अर्थव्यवस्थेपुरता मर्यादित नाही. तो तितकाच राजकीय स्वायत्ततेचाही प्रश्न आहे.

भारताने ऐतिहासिकदृष्ट्या स्वतःला एक स्वतंत्र, अलिप्त आणि त्याचवेळी मानवतावादी भूमिका घेणारा देश म्हणून जगासमोर उभं केलं होतं. वसाहतवादाविरोधातील लढ्याच्या अनुभवातून घडलेली ही भूमिका केवळ राजकीय नव्हती. ती एक मूल्यात्मक भूमिका होती. ज्यात मोठ्या शक्तींच्या संघर्षात अडकण्याऐवजी स्वतःचा मार्ग निवडण्याचा आग्रह होता. पण आजच्या परिस्थितीकडे पाहिलं, तर भारताला खरंच कुठली सुसंगत भूमिका आहे का, असा प्रश्न पडावा इतकी परराष्ट्र धोरणातील विसंगती आणि दयनीयता दिसू लागते. जागतिक ऊर्जा बाजारपेठा आणि वित्तीय व्यवस्था जेव्हा काही मोजक्या शक्तींच्या नियंत्रणाखाली असतात, तेव्हा इतर देशांची स्वायत्तता आपोआप मर्यादित होते. हे खरं आहेच. पण याचा अर्थ असा नाही, की भूमिका न घेणं हीच भूमिका ठरते. उलट, अशा वेळी भूमिका न घेणं हेच आपल्या जागतिक पातळीवरील अधिक मोठ्या पतनाचं लक्षण ठरतं.

देशांतर्गत राजकारणात भूमिकांचा गोंधळ झाकणं तुलनेने सोपं असतं. कारण तिथे सत्ताकेंद्रे, माध्यमं आणि यंत्रणा मोठ्या प्रमाणावर ताब्यात ठेवता येतात. पण जागतिक स्तरावर तसं शक्य नसतं. तिथे अधिक संसाधने असलेले, अधिक प्रभावी स्पर्धक असतात. त्यामुळे आपल्या भूमिकांमधील विसंगती, गौडबंगाल आणि दिशाहीनता लपवता येत नाही. ती सहज उघडी पडते.


म्हणूनच, कोणाकडून तेल घ्यायचं, कोणाशी व्यापार करायचा आणि कोणत्या राजकीय भूमिकेला पाठिंबा द्यायचा, हे निर्णय पूर्णपणे स्वतंत्र राहत नाहीत. त्यांच्यावर बाह्य दबाव, आर्थिक निर्बंध आणि रणनीतिक संबंध यांचा प्रभाव पडतो. म्हणजेच, आपण ज्या अर्थव्यवस्थेत जगतो, ती पूर्णपणे आपल्या नियंत्रणात नसते. ती एका व्यापक जागतिक प्रक्रियेचा भाग असते. जिथे युद्ध, व्यापार, आणि राजकारण एकमेकांत गुंतलेले असतात.

अशा परिस्थितीत घेतले जाणारे निर्णय, जे वरकरणी मुत्सद्देगिरीचे वाटतात, ते दीर्घकालीन परिणाम घडवतात. त्यांचा फटका केवळ सत्ताधारी व्यवस्थेला बसत नाही. तो सामान्य जनतेला अधिक आणि अनेक वर्षे सहन करावा लागतो. महागाईत, रोजगाराच्या असुरक्षिततेत आणि आर्थिक अस्थिरतेत हा फटका पुन्हा पुन्हा जाणवत राहतो.

**लेखक किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पीएच.डी. अभ्यासक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड येथेही ते अध्यापन सहाय्य करतात. त्यांचे संशोधन मुख्यत: कामगार (श्रम), तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे. संपर्क : ९६५७७९९९८६,**

**ईमेल :** hiteshdpotdar@gmail.com

# उत्तुंग क्रीडा यशाचे चिनी पाऊल-ठसे



गजानन जोशी

**शोधक नजर**







**चीनच्या उत्तुंग क्रीडा यशामध्ये बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीचा सिंहाचा खरे तर चिनी प्रतीकभाषेत बोलायचे झाल्यास, ड्रॅगनचा वाटा राहिला आहे. आजपर्यंत एकूण २१० पेक्षा जास्त सुवर्णपदकं, या युनिव्हर्सिटीच्या खेळाडूंनी मिळवली आहेत. या युनिव्हर्सिटीमध्ये एक खास रस्ता आहे, ज्याचे नाव 'चॅम्पियन रोड' असे आहे. या रस्त्यावर सुबक फरशा लावलेल्या आहेत. प्रत्येक फरशीवर एका सुवर्ण पदक खेळाडूच्या एका पावलाचा ठसा, नाव आणि प्रेरणादायी कामगिरीचा उल्लेख आहे. क्रीडा स्पर्धांमधले हे यश अतिशय नावीन्यपूर्ण पद्धतीने चीनने जगासमोर मांडले आहे...**

चीनमधील उत्पादक संस्थाना भेटी दिल्यानंतर इथे किती अवाढव्य आणि किती प्रगतिशील संस्था आहेत, याची नक्कीच जाणीव झाली होती. कामानिमित्त सतत प्रवास करत असल्यामुळे प्रचंड मोठाले रस्ते, भव्य विमानतळे, मेट्रो रेल्वेचे प्रचंड जाळे, अवाढव्य नि अचंबित करणारे वीज निर्मिती केंद्रे, प्रचंड मोठी माल वाहतूक करणारी बंदरे यांची देखील बऱ्यापैकी कल्पना आली होती. परंतु खेळ शिकविणाऱ्या संस्था आणि त्या सुद्धा किती प्रचंड महाकाय असू शकतात, याची एक झलक २-३ ठिकाणच्या म्हणजेच घोडेस्वारी, बास्केटबॉल, कॅंटिन आणि इतर परिसराला भेट दिल्यानंतर तसेच विविध प्रशिक्षण संकुल आणि प्रयोगशाळा यांची यादी बघूनच मिळाली होती. यामुळे संपूर्ण बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी बघण्याची आणि विशेष करून रेन ज्यामध्ये शिकतो, ती टेनिस इन्स्टिट्यूट बघण्याची ओढ लागली. परंतु प्रचंड मोठा परिसर, तितकेच प्रचंड अंतर चालत जाऊन बघितल्यामुळे आता पाय थकले होते. माझ्या, मते आम्ही साधारण १० कि.मी. चाललो असणार. पण अजूनही खूप काही बघायचे शिल्लक होते.

त्यानंतर साधारण एक महिन्याने पुन्हा बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीला भेट देण्याचा योग आला आणि अशा भेटी देण्याच्या संधी मिळत गेल्या, कधी एखादी स्पर्धा, कधी एखादा विशेष कार्यक्रम आणि रेन नेहमी आमंत्रण देऊ लागला.

या वेगवेगळ्या वेळेला आणखी बऱ्याच काही भव्य-अतिभव्य गोष्टी खेळांच्या संदर्भात बघायला मिळाल्या. तेथील बॅडमिंटन हॉलला भेट दिली. बीजिंग मधील माझ्या घराच्या जवळ असलेल्या बॅडमिंटन हॉलपेक्षा किमान तीन पट मोठा आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा आणि कोर्ट्स. येथे सुद्धा मुलांच्याबरोबर मुली नजरेत भरण्याइतक्या. प्रशिक्षकांमध्ये सुद्धा पुरुष आणि महिला. एक वेळेला जलतरण प्रशिक्षणाच्या ठिकाणी गेलो होतो. तेथे सुद्धा इनडोअर आणि आऊटडोअर असे प्रचंड मोठे तलाव. तेथे युनिव्हर्सिटीमधले विद्यार्थी त्याचप्रमाणे काही शाळेमधील सुद्धा विद्यार्थी आले होते. काही विशिष्ट काळात आणि वेळेत या शाळकरी मुला-मुलींना येथे सरावासाठी प्रवेश असतो. असेच टेबल टेनिसच्या ठिकाणी गेलो होतो. अतिशय नियमबद्ध-वैज्ञानिक पद्धतीने तेथे सराव आणि प्रशिक्षण बघायला मिळाले. याच सोबत बऱ्याच खेळांच्या विभागांना रेनमुळे भेट द्यायची संधी मिळाली.

**सारे काही अवाढव्य**

यात सर्वात जास्त वेळा भेट दिली, ती टेनिस प्रशिक्षण विभागाला. रेन येथे पाच वर्षाचा पदवी अभ्यासक्रम शिकत होता. टेनिस कॉम्प्लेक्स या नावाची प्रचंड मोठी बिल्डिंग होती, ज्यामध्ये टेनिस खेळ आणि त्या संदर्भामध्ये सर्व प्रकारचे वर्ग-संशोधन कक्ष-ऑडिटोरिअम-संगणकयुक्त आधुनिक सुविधा असे सर्व काही होते.

या टेनिस कॉम्प्लेक्सच्या बाजूलाच प्रचंड मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय दर्जाची कमीत कमी २०-२५ टेनिस कोर्ट्स, वर्गखोल्या, प्रयोगशाळेची इमारत आणि बऱ्या काही सुविधा तिथे योजलेल्या होत्या.

फक्त टेनिस या एकाच खेळा संदर्भात विचार केला तर खालील प्रमाणे वेगवेगळ्या इमारती आणि सुविधा होत्या:
१) टेनिस संकुल २) वर्गखोल्या आणि प्रयोगशाळा इमारत ३) क्रीडा विज्ञान इमारत ४) २०-२५ टेनिस कोर्ट असलेले प्रचंड मोठे मैदान

या कॅम्पसमध्ये काय प्रकारच्या सुविधा होत्या, त्यापैकी काही खालीलप्रमाणे :

वेगवेगळ्या अभ्यासाच्या प्रयोगशाळा : बोन एज, फिजिओलॉजी, मेडिसिन, रिहॅबिलिटेशन अँड हेल्थ, फटिग, मसल्स, बायोमेकानिक्स, स्पोर्ट्स ॲनाटॉमी, फिगर रूम, डेटा रूम्स, स्पोर्ट्स न्युट्रिशन, स्पोर्ट्स ॲडाप्शन, फिजिकल फिटनेस जिनोम, एन्डोक्राइन, स्पोर्ट्स बायोकेमिस्ट्री, सेल कल्चर लॅब, हिस्टोकेमिस्ट्री लॅब, स्पोर्ट्स ॲनाटॉमी आणि बरेच काही...

यापैकी काही ठिकाणी रेन मला घेऊन गेला होता. तेथे जगातील अतिशय अद्ययावत उपकरणे आणि प्रणाली कार्यरत होत्या. त्यापैकी ६० टक्के पेक्षा जास्त चीन मध्येच उत्पादन केलेल्या होत्या. ही चीनमधील उपकरणे इतर प्रगत देशांमध्ये देखील वापरात असतात.

एक दिवस रेन बरोबर टेनिस कोर्टवर भर सकाळी गेलो होतो. मला त्यांचे सकाळी होणारे सराव सत्र बघायचे होते. त्यावेळेस तेथे साधारण ५०-६० विद्यार्थी जमले होते आणि प्रशिक्षक त्यांना सूचना देत होते. एकदा रेन जेव्हा त्याच्या कॉलेजमध्ये सामना खेळणार होता, तो बघायला गेलो होतो. या सगळ्याचे काही फोटो देखील माझ्या संग्रही ठेवले आहेत.

**शास्त्रशुद्ध नि नियमबद्ध मशागत**

रेनमुळे त्याच्या काही शिक्षक आणि प्रशिक्षकांना देखील



*टेनिस या खेळविषयात पीएच.डी.पर्यंतचे सर्वोच्च प्रावीण्य मिळवण्यासाठी विद्यार्थी हजारोच्या संख्येने दाखल होतात, हे अद्‌भुतरम्य दृश्य चीनच्या क्रीडा विद्यापीठातच दिसते...*

भेटण्याची संधी मिळाली. त्यांच्याकडून खेळाडूंची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांचे आतापर्यंत झालेले शिक्षण, त्यांची आर्थिक स्थिती, कुटुंबीयांची शैक्षणिक पार्श्वभूमी या सगळ्यांचा विचार आणि अभ्यास केला जातो. मग मानसशास्त्राचे– सायकॉलॉजीचे शिक्षक पहिल्या काही महिन्यांसाठी काही विशेष शैक्षणिक तास आखून त्याप्रमाणे विद्यार्थ्याला शिक्षण देतात. परंतु ते करत असताना कोठेही याची वेगळी वाच्यता अथवा जाणीव करून दिली जात नाही. कारण त्या काळात प्रत्येक विद्यार्थी कोणत्या तरी प्रशिक्षण वर्गात असतोच. पहिल्या वर्षामध्ये अशा प्रकारची उत्तम प्रकारे मशागत करून प्रत्येक विद्यार्थ्याची पुढील शिक्षणासाठी उत्तम प्रकारे तयारी केली जाते. मुख्य खेळविषय जसे रेनचा टेनिस, त्याच्याबरोबर इतरही खेळांची उत्तम माहिती आणि शिक्षण या विद्यार्थ्यांना दिले जाते.

ज्याप्रमाणे आपल्याकडे किंवा इतरत्रही कोणत्याही विषयांतील पदवी–पदविका विद्यार्थ्यांना इंटर्नशीपसाठी विविध संस्थामध्ये ट्रेनिंगसाठी पाठविले जाते, त्याप्रमाणे दरवर्षी या ठिकाणी देखील विद्यार्थ्यांना पाठविले जाते. खेळांची उपकरण उत्पादन कंपन्या, देश–विदेश पातळीवरील खेळांचे सामने असतील तेथे, खेळांचे नियम/अटी समजून घेण्यासाठी त्या प्रकारच्या संस्था, देश आणि जागतिक किर्तीचे पंच यांच्याकडे प्रशिक्षण, प्रत्यक्ष मैदानावरती खेळांचे आयोजन करणे, नवीन मैदान तसेच क्रीडा संकुल जेथे बांधली जात असतील, तेथे प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण, स्पर्धांच्या आयोजनामध्ये स्वयंसेवक, अशा विविध मार्गाने यांना प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी दिली जाते.

सन २००९ मध्ये बीजिंगमध्ये चायना ओपन टेनिस स्पर्धा झाली. जगातील सर्व नामांकित टेनिस खेळाडूंनी त्यात भाग घेतला होता. जोकोविच, नडाल, फेडरर आणि आपली सानिया मिर्झासुद्धा त्यात खेळली होती. रेनमुळे मला येथे तीन दिवस प्रेक्षक म्हणून प्रवेश मिळाला होता. त्यामध्ये रेन याला बॉल बॉय म्हणून संधी मिळाली होती. आपल्याला वाटते, बॉल बॉय म्हणजे टेनिस सामना सुरु असताना कोर्टच्या चारही टोकांना, मधोमध, नेटजवळ अंतर ठेऊन उभे वा विशिष्ट पद्धतीने बसलेली काही मुलं–मुली पळत जाऊन सीमारेषेबाहेरचे, जाळीला लागून पडलेले बॉल आणण्याचे काम करतात तेच. त्यात काय मोठेसे. परंतु, रेनकडून समजले, की ते काम किती महत्त्वाचे आणि काटेकोरपणे करावे लागते. जेव्हा रेनचे काम नसायचे, तेव्हा तो माझ्याजवळ बसून मला बरीच महत्त्वाची माहिती देत असायचा.

रेन हा टेनिसमध्ये पदवीधर झाला, त्याने त्यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेतले, ज्यासाठी त्याला युरोपमध्ये सुद्धा जाऊन शिकता आले. आज तो राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळांच्या आयोजनामध्ये सहभागी असतो. त्याचप्रमाणे–प्रशिक्षणामध्ये देखील त्याचा सहभाग असतो. त्याच्या गावामधील शाळेच्या मुला–मुलींना प्रशिक्षण देण्याचे काम तो करतो. त्याला इतर विद्यापीठे आणि सरकारी क्रीडा आयोजनामध्ये आमंत्रित केले जाते. थोडक्यात, पूर्वीपेक्षा रेन आता फारच व्यग्र झाला आहे.

**याचा फायदा काय?**

आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे आता येतो. आपल्याकडे कोणत्याही गोष्टीकडे फार उथळपणे बघण्याची आणि उडवाउडवीच्या पद्धतीने बघण्याची बऱ्याच वेळा सवय असते. इथे, एक प्रश्न सहज कोणीही विचारणार– खेळामुळे काय फायदा होतो? कशाला असा आपला महत्त्वाचा आयुष्याचा वेळ फुकट घालवायचा? देशाला काय फायदा?

या संदर्भात चीन या देशाने काय साध्य केले, ते आधी कोठे होते आणि आता कोठे आहेत हे आपण थोडक्यात बघुया.

एशियाडची (एशियन गेम्स) सुरुवात १९५१ साली भारतात झाली. त्यावेळेला चीन हा देश सहभागीसुद्धा झालेला नव्हता. सर्वात प्रथम चीन एशियन गेम्समध्ये सहभागी झाला, १९७४ साली. स्पर्धा भरली होती, सध्या अमेरिका–इस्राएलच्या युद्धखोरीला धिटाईने तोंड देत असलेल्या तेहरान, इराण येथे.

म्हणजे, एशियन गेम्स सुरू झाल्यानंतर २५ वर्षांने. यामध्ये सगळ्यात जास्त खेळाडू सहभागी झाले होते, ते यजमान देश असलेल्या इराणचे (४००), त्यानंतर चीन (२६९) आणि भारत (१५५) असा सहभागी खेळाडूंच्या संख्येचा पट होता. पदार्पणाच्या पहिल्याच वर्षी चीनने एकूण १०६ पदके पटकावून पदक तालिकेमध्ये तिसरा क्रमांक प्राप्त केला होता. ज्यामध्ये ३३ सुवर्ण, ४६ रौप्य आणि २७ कास्य पदके होती. इराणमधल्या स्पर्धेत भारत सातव्या क्रमांकावर होता.

**पदकांची अक्षरशः लयलूट**

पुढे १९७८ साली बँकॉकमध्ये झालेल्या एशियन गेम्समध्ये चीनने विलक्षण झेप घेत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला. त्यानंतरची आशियाई क्रीडा स्पर्धा होती, भारतात. साल १९८२. हत्तीचे अप्पूनामे गोंडस पिल्लू प्रतीक असलेल्या त्या एशियाडपासून २०२२ मधल्या हंगजाऊ चीनमध्ये पार पडलेल्या आजवरच्या एशियन गेम्सपर्यंत चीन हा कायमच प्रथम क्रमांकाचा देश राहिला आहे. १९८२ एशियाडमध्ये चीनने पटाकवलेल्या पदकांची एकूण संख्या होती, १५३. त्यामध्ये ६१ सुवर्ण पदके होती. सन १९८२ पर्यंत चीन २०० पेक्षा कमी पदके जिंकलेला देश होता. मात्र त्यानंतर कायम २०० पेक्षा जास्त, सन २००२ पासून ३०० पेक्षा जास्त, तर सन २०१० साली गुआंगजाऊ, चीन येथे झालेल्या स्पर्धेमध्ये एकूण ४१६ पदक जिंकलेला आहे, ज्यामध्ये जवळ जवळ २०० सुवर्ण पदके आहेत. सन २०२२ मध्ये चीनने जिंकलेल्या पदकांची संख्या एकूण ३८३ आहेत, त्यात सुवर्ण पदके आहेत, तब्बल २०१!

आता आपण ऑलिम्पिककडे बघुया. चीन हा देश सर्वात प्रथम १९८४ मध्ये अमेरिकेमधल्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिक सहभागी झाला. नाही म्हणायला, १९५२ मध्ये हेलसिंकी, फिनलँड येथे चीन म्हणजेच पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाने प्रत्यक्ष सहभाग घेतला होता, पण तेव्हा फक्त एक, किती, फक्त एक जलतरण स्पर्धक चीनचे प्रतिनिधित्व करत होता. त्यानंतर चीन आणि तैवान यामधला संघर्ष आणि इतर जागतिक राजकीय कारणांमुळे चीनने १९५२ नंतर थेट १९८४ मध्ये ऑलिम्पिकमध्ये आपला सहभाग नोंदवला. ज्यामध्ये ३० पेक्षा जास्त पदके पटाकावली. त्यात सुवर्णपदकांची संख्या निम्मी होती. पुढे, सन १९९६ पर्यंत सरासरी १३ ते १५ सुवर्ण पदक जिंकणारा चीन हा देश सन २०००, सिडनी ऑलिम्पिकपासून सरासरी ३० ते ४० सुवर्ण पदक जिंकत आला. २००८ हे ऑलिम्पिकच्या संदर्भाने चीनने वर्ष होते. चीनने धडाकेबाज पद्धतीने बीजिंग ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन केलेच, पण एकूण १०० पदके पटकावली, ज्यामध्ये ४८ सुवर्ण पदकासहित प्रथम क्रमांक मिळवला. सन २०२४ पॅरिसमध्ये झालेल्या स्पर्धेमध्ये एकूण ९१ पदके मिळवली, ज्यामध्ये ४० सुवर्ण पदकासहित द्वितीय क्रमांक राखला. प्रथम क्रमांक अमेरिकेने मिळवला. त्यांची गोळाबेरीज होती, १२६ एकूण पदके, त्यात सुवर्णपदके किती, चीनइतकीच ४०.

आपल्याला एक महत्त्वाची बाब समजून घेतली पाहिजे, की चीनने भले उशिरा स्पर्धेमध्ये पदार्पण केले असेल, परंतु त्यापूर्वी प्रयत्न, सराव, प्रशिक्षण उत्तम पद्धतीने चालू होते. त्याचा परिणाम प्रत्यक्ष सहभाग घेतल्यापासून लगेचच बघायला मिळाला. चीनने हे दाखवून दिले.

**महिला दाक्षिण्य आणि प्रेरणादायी चॅम्पियन रोड**

या ऑलिम्पिक स्पर्धांच्या पदकांच्या संख्येबरोबरच आणखी एक खूपच महत्त्वाची बाब आहे, ती म्हणजे यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या संदर्भातील. सन १९८४ मध्ये प्रथम सहभागी झालेल्या चीनच्या संघामध्ये १३२ पुरुष, तर साधारण ८० महिला सहभागी झाले होते. त्यानंतर १९८८ च्या स्पर्धेमध्ये १४९ पुरुष तर १२४ महिला. मात्र त्यानंतर साधारण कायम महिला खेळाडूंची संख्या पुरुष खेळाडूंपेक्षा अधिक राहिली आहे.

मला आमच्या औद्योगिक आणि वीज निर्मिती आणि इतर कामातही महिलांचा सहभाग पुरुषांच्या बरोबरीने चीनमध्ये कायम बघायला मिळाला. त्याचीच प्रचिती या खेळामध्ये देखील बघायला मिळते. चीनमध्ये कोणतेही क्षेत्र महिलांसाठी वर्ज्य नाही, याची प्रचिती प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्यक्ष क्षेत्रात बघायला मिळते. महिला म्हणजे, समाजातील ५० टक्के शक्ती आहे. त्याचा पूर्णपणे आदराने चीन उपयोग करून घेतो, हे आपण समजून घेतले पाहिजे.

आपल्या चर्चेमधील बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीचा देखील सिंहाचा किंवा ड्रॅगनचा वाटा चीन देशाच्या यशस्वी वाटचालीमध्ये आहे. आजपर्यंत एकूण २१० पेक्षा जास्त सुवर्णपदकं या युनिव्हर्सिटीच्या खेळाडूंनी मिळवली आहेत. यामध्ये ऑलिम्पिक तसेच एशियन आणि इतर आंतरराष्ट्रीय खेळांचा समावेश आहे. याचा युनिव्हर्सिटी आणि तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कायम अभिमान वाटत आला आहे.





*सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करणारी क्रीडा विद्यापीठे ही चीनची खासियत आहे. या विद्यापीठांमध्ये खेळ या विषयाला आंतरविद्याशाखीय ज्ञानाशी जोडले जातेच पण त्यासाठी स्वतंत्र टेनिस कॉम्प्लेक्स, स्पोर्ट्स सायन्स बिल्डिंग, क्लासरुम अँड लॅबोरेटरी बिल्डिंगही असतात...*

त्यांची मेहनत, यश हे कायम प्रेरणादायी राहिले आहे. हे यश अतिशय नावीन्यपूर्ण पद्धतीने त्यांनी जगासमोर मांडले आहे.

उदाहरणच द्यायचे झाले तर, या युनिव्हर्सिटीमध्ये एक खास रस्ता आहे, ज्याचे नाव 'चॅम्पियन रोड' असे आहे. या रस्त्यावर सुबक फरशा लावलेल्या आहेत. प्रत्येक फरशीवर एका सुवर्ण पदक खेळाडूच्या एका पावलाचा ठसा, नाव आणि प्रेरणादायी कामगिरी याचा उल्लेख आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला या रस्त्यावरील फरशीवरूनच आणि या रस्त्यावरूनच जावे लागते. दरवर्षी आणखीन काही फरशा येथे लावल्या जातात, कारण दरवर्षी सुवर्ण पदकांच्या संख्येत भर पडत असतेच. आपल्याकडे मंदिरांमध्ये साधारणत: फरशा बसवल्या जातात, ज्यावर देणगीदाराचे नाव लिहिले जाते. परंतु आपल्याकडील विद्येच्या मंदिरांमध्ये सुद्धा अशा फरशा जर आपण लावल्या आणि त्यावर यशस्वी विद्यार्थ्यांची नाव आणि हात-पाय यांचे ठसे उमटवले, तर एक नवी प्रेरणा नव्या पिढीला नक्कीच मिळत राहील.

माझा मित्र रेन हा सध्या प्रशिक्षक म्हणून टेनिससाठी काम करतोय, तसेच परदेशातही आयोजक, प्रशिक्षक म्हणून तो जात असतो. परंतु मला एक अतिशय महत्त्वाची आणि अभिमानाची माहिती त्याने दिली, ती म्हणजे २०२० मध्ये टोकियो ऑलिम्पिकमध्ये चीनच्या गोल्फ संघाने कास्य पदक मिळवले. त्या संघाचा रेन हा कोच होता. त्याने मला त्याचे फोटो देखील पाठवले. गोल्फ हा रेनचा टेनिसबरोबर दुसरा आवडता खेळ आहे, हे त्याने मला पूर्वीच सांगितले होते. परंतु देशाला पदक मिळवून देण्यापर्यंत त्याने मजल मारली, याचा त्याच्या देशाला, त्याच्या संघाला तसेच त्याला अभिमान आहेच, परंतु तेवढाच किंवा जास्तच अभिमान त्याचा एक भारतीय मित्र म्हणून मला देखील आहे...

**(क्रमशः)**

**हा लेख लिहिताना जेन लिऊ (जेन) आणि चेन शुओ चु (रेन) यांची मोलाची मदत झाली. दोघांचेही आभार.**

**गजानन जोशी नामवंत ऊर्जानिर्मिती अभ्यासक, भाष्यकार आहेत. समाज, साहित्य आणि कला हे त्यांचे चिंतन आणि आस्वादनाचे विषय आहेत.**
**संपर्क :** joshigajanan@hotmail.com


# मूरची अंतर्दृष्टी... चांगुलपणाचे दर्शन घडवणारी!



प्रा.श्रीनिवास हेमाडे

गोष्ट प्रेमाची

लेखांक – ४



एक सनातन समस्या आहे : *''प्रेम करणे चांगले की वाईट?''* अर्थात ''प्रेमात पडणे चांगले की वाईट?''

हाच प्रश्न बदलून ''प्रेम चांगले की वाईट?'' असा केला तर त्याचा अर्थ बदलतो. पहिला प्रश्न प्रेम करणे ही एक 'कृती' (action) आहे, असे सुचवतो तर दुसरा प्रश्न प्रेम ही एक 'संकल्पना' (concept) असे स्पष्ट करतो. कृतीमागील संकल्पना स्पष्ट झाली, की कृती साकारण्याची दिशा स्पष्ट होते, ती करावी की नाही हे उमजते. ''जगावे की मरावे?'' (to be or not to be) हा प्रश्न 'जगणे' (to live, to exist) या कृतीशी निगडित आहे. प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी ''जगणे म्हणजे काय?'' या मूळ प्रश्नाकडे जावे लागते. मग ''जगणे चांगले की वाईट?'' असे विचारता येते. त्यानुसार जगणे अथवा ते न जगणे, अशी पर्यायी निवड करता येते. (तात्त्विक दृष्टिकोनातून ''जगावे की मरावे?'' हा प्रश्न नाही, ती द्विरुक्ती tautology आहे.)...

**ज्याची प्रेरणा प्रेमात आहे आणि ज्याचे मार्गदर्शन ज्ञानाने होते, असे जीवन हेच 'चांगले जीवन' होय.**

**– बर्ट्रांड रसेल**

'प्रेम चांगले असते', असा निर्णय घेण्यासाठी 'प्रेम' या 'संकल्पने'चे स्व-रूप (nature) पाहणे अनिवार्य ठरते. 'प्रेम चांगले असते' ते स्वरूप कळले, तर प्रेम करणे या 'कृती' विषयीही म्हणजे 'प्रेम करणे चांगले असते' असा निर्णय घेता येतो. 'प्रेम करणे चांगले असते' आणि 'प्रेम चांगले असते' या दोन वाक्यात 'समान' असणारा घटक म्हणजे 'चांगले' ही संकल्पना किंवा 'चांगुलपणा' हा गुणधर्म. जोपर्यंत ही संकल्पना किंवा गुणधर्म स्पष्ट होत नाही, तोपर्यंत त्यांच्याविषयी कोणताही बौद्धिक निर्णय घेता येत नाही, पण भावनिक निर्णय घेता येतो (म्हणजेच कुणाच्या तरी प्रेमात पडता येईल!)

हा निर्णय घेणे अतिशय अनिवार्य आहे. कारण प्रेमात पडणे ही कृती व्यक्तिगत पातळीवर प्रेम विवाहापुरती अथवा प्रेम प्रकरणापुरती मर्यादित असली तरी विवाह अन् प्रेम प्रकरण ही सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय घटना असते. समाज, संस्कृती, धनसंपत्ती आणि राजकारण ही निखळ भौतिक घटना आहे, अनेकदा ती किंवा बहुधा भावनाहीन निर्दय, क्रूर व निर्घृण असते. अर्थव्यवस्था व राजकारणातील निर्घृणता उघड असते, तर सामाजिक व सांस्कृतिक क्रूरता संथ, गुप्त, सुप्त असते. परिणामी, व्यक्तिगत प्रेम प्रकरणे ते राष्ट्रप्रेम अनेकदा भावनेचे बळी ठरून क्रूरतेच्या अन् निर्घृणतेच्या पातळीवर उतरून प्रेमातील उदात्तता, काव्य, सौंदर्य या मूल्यांचे अवनतीकरण होते. मग प्रेमिक प्रेमाचे 'हुतात्मे' होतात, मग ते व्यक्तिगत लैला-मजनू असो की धर्मवीर असो की राष्ट्रप्रेमिक असो, – 'हुतात्मे' बनतात.

असे हुतात्मा होणे चांगले की वाईट? असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्याचेही उत्तर देणे नैतिकदृष्ट्या बंधनकारक ठरते. कारण 'हुतात्मा' होणे ही देखील एक 'कृती' (action) आहे. आणि कृतीचा विवेक करावाच लागतो; त्याशिवाय मानव प्रजाती धारणा आणि तिचे सातत्य टिकून राहत नसते. तूर्तास आपण 'प्रेम' ही 'संकल्पना' आणि ती जिच्यातून उद्भवते ती प्रत्यक्ष 'कृती' यांच्यावर 'ध्यान' केंद्रित करू.

'प्रेम चांगले असते' असा निर्णय झाला, तर प्रेमिकाच्या सर्व कृती 'चांगले आचरण' म्हणाव्यात अशा असतील, असे समजू. निदान प्रेमपात्राच्या बाबतीत तरी, उदाहरणार्थ खासगी प्रेम प्रकरणे ते राष्ट्र प्रेमिक व्यक्ती सर्व कृती, आचरण चांगले असते. प्रेमिकाला स्वतःचे सगळे आचरण चांगलेच आहे, याची खात्री असते. तेव्हा ''चांगले आचरण म्हणजे काय?'' हा प्रश्न उद्भवतो.

**चांगले म्हणजे काय?**

''चांगले आचरण म्हणजे काय?'' ही अतिशय अवघड, मूलभूत आणि सदैव जिती जागती (perennial) समस्या आहे. सभ्यता आणि संस्कृतीच्या उदयाचा प्रारंभ मुळात या समस्येपासून होतो. रानटी रासवट टोळी जीवन असो अथवा सुसंस्कृत नागरी जीवन असो, एकत्र राहण्याचा मौलिक प्रश्न म्हणजे, 'चांगले आचरण'. असे आचरण की जे सर्वांना सामावून घेणाऱ्या सहअस्तित्वाची शाश्वती देते.

विश्लेषणात्मक तत्त्वचिंतनाचा आधुनिक प्रवर्तक ब्रिटिश तत्त्ववेत्ता जॉर्ज एडवर्ड मूर (जन्म ०४ नोव्हेंबर १८७३, मृत्यू २४ ऑक्टोबर १९५८) त्याच्या 'Principia Ethica' (१९०३) पुस्तकात सिद्ध करतो की 'चांगले आचरण' ही मिश्र संकल्पना आहे. म्हणजे जे चांगले नाही, असे आचरण असू शकते आणि आचरणाशिवाय इतर गोष्टीही चांगल्या असू शकतात. म्हणून चांगले आचरण व इतर चांगल्या गोष्टी या दोहोंना 'समान असणारे चांगले' हे तत्त्व निश्चित केले पाहिजे. अर्थात चांगले म्हणजे काय? ते प्रथम ठरवले पाहिजे. ते निश्चित झाले की मग आपण 'चांगले' हे पद अथवा विशेषण अन्य कोणत्याही वस्तू, घटना, प्राणी अथवा मानवी व्यक्ती यांना लागू करताना आवश्यक ती काळजी घेऊ शकतो. जसे की चांगले शासन, चांगले राज्य, चांगला माणूस, चांगला मित्र, चांगला रस्ता, चांगले कुत्रे, चांगला मोबाइल, चांगले नेटवर्क, चांगली सर्व्हिस, चांगला वडा, चांगला वर, चांगली वधू, चांगला संसार (मस्त चाललंय आमचं! किंवा मस्त चाललंय की दोघांचं – त्याचं!) इत्यादि मधील 'चांगुलपणा'चे नेमके स्वरूप अथवा अर्थ कळू शकतो.

मूरच्या मते, जगताना दोन प्रश्न महत्त्वाचे बनतात:
(१) कोणत्या गोष्टी त्यांच्या स्वरूपामुळे *असावयास* हव्यात? आणि (२) त्या गोष्टी अस्तित्वात याव्यात म्हणून कोणत्या प्रकारच्या कृती आपण केल्या पाहिजेत?

या प्रश्नांना स्वतः मूर उत्तरे देतो, ती अशी : (१) ज्या गोष्टी केवळ *'स्वतःसाठी'* म्हणून असल्या पाहिजेत, त्याच गोष्टी

*'असाव्यात'*. अर्थात त्यांचे 'स्व-रूप'च (nature) असे असावे की केवळ 'स्व-रूपा'मुळे त्या गोष्टी असाव्यात. उदाहरणार्थ ज्या गोष्टींना आपण *'आंतरिकरीत्या'* (intrinsically) चांगल्या (Good) अथवा 'स्वतः होऊन चांगल्या' आहेत, असे म्हणतो त्याच गोष्टी *असाव्यात*. येथे 'असणे' म्हणजे अस्तित्वात येणे, वर्तनातून जाणवणे. (२) त्या गोष्टी *अस्तित्वात* याव्यात म्हणून माणसाने अशा कृती कराव्यात की ज्यामुळे त्या **'चांगल्या गोष्टी'**त वाढ होईल. अर्थात, ज्या कृतीने अधिकात अधिक चांगलेपणा निर्माण होईल तीच आपण नेहमी केली पाहिजे.

सकृतदर्शनी ही प्रश्नोत्तरे अतिशय साधी सरळ दिसतात. तथापि ज्या कोणत्या कृतीने अधिकात अधिक चांगलेपणा निर्माण होईल अशा कृती करण्यासाठी, आधी चांगले म्हणजे काय? हे तर समजले पाहिजे! म्हणजेच त्या कृतीचे परिणाम आंतरिकरीत्या चांगले आहेत, हे ज्ञान असले पाहिजे. पर्यायाने कोणत्या प्रकारच्या गोष्टी आंतरिकरीत्या चांगल्या आहेत, याचे ***पूर्वज्ञान*** कृती करण्याआधी असणे आवश्यक आहे, असे मूरचे मत आहे. त्या नंतरच अशा कृतीची सुरुवात करता येऊ शकते.

आता प्रश्न उपस्थित होतो की चांगले म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर काय द्यावे? तर मूरच्या मते, या प्रश्नाचे उत्तर देणे सोपे नाही, कठीण आहे. एखाद्या अमुकतमुक म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर देताना साधारणपणे आपण त्या वस्तूचे गुणधर्म, त्याचे काही सुटे भाग असल्यास, ते कसे जोडले आहेत इत्यादि रचना आणि त्या वस्तूचे उपयोग, तिची किंमत, उपलब्धता, तिची वाहतूक इत्यादि सांगतो. अर्थात, तिचे विश्लेषण करतो. मग तिची व्याख्या करतो. वस्तूचे विश्लेषण केल्याशिवाय तिचा चांगुलपणा स्पष्ट होत नाही. (वर वधू चांगले आहेत, असे सांगताना ३६ गुण सांगणे म्हणजे कोणकोणत्या गुणधर्मांनी ते बनले आहेत, त्याचे विश्लेषण करणे.)

तथापि चांगले या पदाने जे काही समजते त्या गोष्टीचे असे सुटे भाग नाहीत; तिची रचना, उपयोग, किंमत, वाहतूक इत्यादि सांगता येत नाही. कारण ती मुळात 'वस्तू'च नाही; तर ती एक संकल्पना आहे आणि 'चांगले' ही संकल्पना कोणतेही कसलेही विभाग नसलेली, कोणतेही मिश्रण नसलेली सरल (simple) म्हणजे 'अमिश्र' संकल्पना आहे. परिणामी जिचे विश्लेषण करता येत नाही, अशी अविश्लेष्य (unanalysable) संकल्पना आहे. थोडक्यात, 'चांगले ही संकल्पना अविश्लेष्य आहे, म्हणून 'चांगला'ची, 'चांगलेपणा'ची व्याख्या करता येणे अशक्य आहे. म्हणून 'चांगले' ही अव्याख्येय (indefinable) संकल्पना आहे.

पण याचा अर्थ असा नाही की, ज्यांच्या ठिकाणी अंगभूतपणे हा प्रस्तुतचा 'चांगला' अविश्लेष्य गुणधर्म वसतो आहे, त्या वस्तू (किंवा व्यक्ती म्हणा हवं तर) पाहिल्यानंतर तिचा 'चांगुलपणा' आपण ओळखू शकणार नाही; तो आपण ओळखू शकतो! अगदी नक्की ओळखू शकतो. डोक्याला, मनाला थोडा ताण दिला, बुद्धीला पुरेसे कष्ट करायला लावून विचार केला तर ''आंतरिकरीत्या चांगल्या गोष्टी कोणत्या?'' ते आपण जरूर ओळखू शकतोच. व्यवहारात तसे घडताना आपण अनुभवतो. *फक्त 'चांगुलपणा'चा पुरावा देता येत नाही.*

आता, प्रश्न उपस्थित होतो की ''आपण हा चांगुलपणा जाणतो कसा? त्याचे ज्ञान कसे होते?'' ज्याचा पुरावाच देता येत नाही, ते अस्तित्वात आहे, अस्तित्वात आले पाहिजे, असा दावा का अन् कसा करावा?

...तर, मूर म्हणतो की एखादी गोष्ट, वस्तू अथवा व्यक्ती 'आंतरिकरीत्या चांगली' आहे की नाही हे नुसतं *पाहून* अर्थात जाणून ठरविण्याची बाब आहे!

फार तर, आपल्याकडून चूक होऊ नये, ''ती गोष्ट चांगली नाही (किंवा वाईट आहे)'' असे चुकूनही ठरविले जाऊ नये, म्हणून आपण एक काळजी घेऊ शकतो. ती अशी की, आपल्या मनःचक्षूसमोर त्या क्षणाला केवळ 'तोच प्रश्न आहे', दुसरा कोणताही प्रश्न नाही, याची खबरदारी घ्यावयाची; म्हणजेच 'क्ष' चांगले आहे की नाही? हाच प्रश्न समोर असला पाहिजे, दुसरा कोणताही प्रश्न अथवा विचार मनापुढे आणावयाचा नाही. सारे ध्यान (meditation) केवळ त्याचं प्रश्नावर केंद्रित असले पाहिजे.

एकदा 'चांगुलपणा' उमजला, की मग दुसरा प्रश्न त्या चांगल्या गोष्टी *अस्तित्वात* याव्यात म्हणून काय करावे? या प्रश्नाकडे लक्ष देण्यास वेळ मिळतो. (त्यासाठीच पहिल्या प्रश्नांकडे 'ध्यान केंद्रित' करावे लागते.) या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर येते, की ''चांगुलपणात वाढ होईल, अशा कृती कराव्यात आणि त्या नेहमीच केल्या पाहिजेत.''

हे ही उत्तर अगदीच बरोबर व योग्य उत्तर आहे.

थोडक्यात, ''कोणत्या गोष्टी स्वतः होऊन चांगल्या आहेत?'' या पहिल्या प्रश्नाच्या उत्तरावर ''चांगुलपणाच्या



*काही तरी चांगले आहे, हे ज्ञान अमूर्त असल्याचे त्याचे ज्ञानही अमूर्त साधनानेच होत असते. ते साधन म्हणजे सहज बुद्धी. तत्त्वज्ञ मूर यांच्या मते, या सहज बुद्धीचे विकसित रुप म्हणजेच अंतःप्रज्ञा...*

वृद्धीसाठी कोणत्या कृती कराव्यात?'' या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे. ज्या गोष्टींच्या ठिकाणी *चांगलेपणा* असेल त्या चांगल्या गोष्टी असतात, असे सहजबुद्धीला उमगेल, असे हे पहिल्याचे उत्तर आहे. पण या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आधी चांगले म्हणजे काय, चांगले या पदाचा नेमका अर्थ काय, ते ठरवावे लागते. आता, तो अर्थ कसा ठरवायचा किंवा शोधायचा, हे ठरवीत असता मूर अशा निष्कर्षाप्रत आला की *''चांगले म्हणजे चांगले!''*

बस्स्! येथेच थांबावयास हवे.

'चांगले'ची व्याख्या करण्याच्या मागे लागूच नये. ते पद अव्याख्येय आहे.

'चांगला'ची व्याख्या का करता येत नाही?

आणि

मुळात ''व्याख्या म्हणजे काय?...'' तर, एखाद्या शब्दाचा अर्थ सांगणे, याचा अर्थ त्या शब्दाची व्याख्या करणे असते.

तथापि कोणताही शब्द केवळ 'शब्द' (word) नसतो, काही शब्द म्हणजे 'संकल्पना' (concept) असतात. एखादा शब्द जर अशी 'संकल्पना' असेल तर व्याख्या देण्यासाठी त्या संकल्पनेचे विश्लेषण (analysis) करावे लागते. अधिक खुलासा करायचा तर त्या शब्दात, संकल्पनेत गुंतलेल्या सर्व घटकांचे स्पष्टीकरण देणे; ते घटक एकमेकांशी कसे आणि का जोडले गेले आहेत, याची कारणे देऊन स्पष्टीकरण देणे. हे सगळे करणे म्हणजे विश्लेषण करणे. पुढे जाऊन त्याचे घटक सुटे करणे आणि पुन्हा आधी होते, तसेच तंतोतंत जोडून दाखवणे म्हणजे त्यांचे संश्लेषण (synthesis) करणे.

आता, चांगले या संकल्पनेचे असे विश्लेषण करणे उर्फ त्याची व्याख्या करणे शक्य नाही. का शक्य नाही, हे समजावून देण्यासाठी मूर 'पिवळा' या रंगाचे उदाहरण घेतो. हळदीच्या ठिकाणी 'पिवळा' रंग असतो. हळद हा भौतिक पदार्थ आहे, त्याला रंग आहे. म्हणून रंग असणे, हा एक भौतिक गुणधर्म आहे. आता पिवळा म्हणजे काय? याचे काय उत्तर देणार! तर ते देता येत नाही. 'डोळा' या भौतिक इंद्रियाला 'पिवळा'चे ज्ञान होते हे खरे, त्याचे ज्ञान तुम्हाला असेल तरी किंवा नसेल तरी. पण समजा ते ज्ञान नसेल तर 'पिवळा' पणाची व्याख्या करून त्याच्या स्वरूपाचे ज्ञान करून देता येत नाही. कारण *पिवळेपणा* या संकल्पनेचे जे काही ज्ञान होते, त्या ज्ञानाला कसलेही अन् कोणतेही 'अवयव' अथवा 'भाग अथवा विभाग' नाहीत. *पिवळेपणा* बिनअवयवी अर्थात निरवयवी (घटक नसलेला) गुणधर्म आहे.

पाहा, पिवळा म्हणजे काय, हे अनुभवाने, डोळ्याने पाहून उमगते. ज्याला असा अनुभव घेणे शक्यच नाही, अशा एखाद्या अंधाला 'पिवळा' शब्दाच्या अर्थाची फोड करूनही समजावून सांगता येणार नाही. कारण 'पिवळे'चा जो काही अर्थ आहे, त्या अर्थाला 'अवयव' नाहीत, त्याचे कोणतेही घटक नाहीत. 'पिवळा' हा एक साधा, सरल, निरवयवी (घटक नसलेला) अमिश्र, पण भौतिक (नैसर्गिक) गुणधर्म आहे, त्याचे विश्लेषण अशक्य असल्याने तो अविश्लेष्य गुणधर्म आहे. म्हणून त्याची व्याख्या शक्य नाही, ते अव्याख्येय आहे.

'पिवळा' या गुणधर्मा प्रमाणेच 'चांगला' (चांगलेपणा–चांगली, चांगले) हा देखील असाच एक गुणधर्म आहे की ज्याचे विश्लेषण करता येत नाही असा साधा, सरल, निरवयवी (घटक नसलेला) अमिश्र, अविश्लेष्य गुणधर्म आहे; पण तो ('पिवळा' प्रमाणे) भौतिक गुणधर्म नाही तर 'अभौतिक ' गुणधर्म आहे. अभौतिक गुणधर्म असल्याने त्याचे ज्ञान किंवा

दर्शन साध्या डोळ्याने – मूर्त इंद्रियाने होत नाही, तर ***अभौतिक अमूर्त सहजबुद्धी***ला होते. ज्ञानाची वस्तू ज्या 'स्व–रुपा'ची असते तसेच तिचे ज्ञान जाणण्याचे साधन उर्फ ज्ञानेंद्रिय असते.

'चांगला' हे ज्ञान अमूर्त असल्याने त्याचे ज्ञान देखील अमूर्त साधनाने होत असते. ती आहे 'सहज बुद्धी' जी अमूर्त असते. मूर म्हणतो, या बुद्धीचे जे अधिक विकसित रूप आहे ते म्हणजे 'अंतःप्रज्ञा' किंवा प्रतिभान (intuition). 'अंतःप्रज्ञा' ही प्रतिभा शक्ती असते; म्हणून तिला होणाऱ्या वस्तूच्या–संकल्पनेच्या दर्शनाला 'प्रातिभ दर्शन' (intuition) म्हणावे लागेल. भौतिक गुणधर्माचे ज्ञान भौतिक इंद्रियाने तर अभौतिक गुणधर्माचे ज्ञान अभौतिक ज्ञानशक्तीने उर्फ बुद्धीने – 'अंतःप्रज्ञा'ने होते. 'चांगला' हा अभौतिक अमूर्त गुणधर्म आहे, म्हणून त्याचे दर्शन ते 'प्रातिभ दर्शन'. थोडक्यात, अमूर्त अभौतिक अमूर्त 'चांगला'चे ज्ञान अभौतिक अमूर्त 'अंतःप्रज्ञा' या साधनाने होते.

**अव्याख्येय अन् सरल संकल्पना**

थोडक्यात, मूरच्या मते, 'चांगलेपणा' हा केवळ शब्द नसून ती एक 'संकल्पना ' (concept) आहे आणि ती 'अविश्लेष्य' आहे. तिचे विश्लेषणचं शक्य नसल्याने ती संश्लेषितही नाही. म्हणून 'चांगलेपणा' किंवा 'चांगला' हे पद अव्याख्येय अन् सरल संकल्पना आहे.

ज्यांनी ज्यांनी 'चांगले'ची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला, त्या प्रत्येकाने या नाही तर त्या, अन्य भौतिक, नैसर्गिक गुणधर्माशी चांगलेपणाचे समीकरण केले. कोणी म्हटले, 'चांगले म्हणजे वस्तूचे सुख' कोणी म्हटले 'निसर्गानुसार जीवन जगणे म्हणजे चांगले जीवन', तर आणखी कोणी म्हणतो, 'जे जीवनाचा विकास करते (जीवन आध्यात्मिक पातळीवर नेते) ते चांगले'; काही जणांच्या मते, चांगले म्हणजे 'चांगले' या पदाचा वापर करणाऱ्या वक्त्याला जे काही पसंत आहे अथवा अपेक्षित आहे ते. जसे की ईश्वरवाद्यांच्या मते, ईश्वर चांगला असल्याने ईश्वराकडून जे काही सांगितले जाते, ज्या आज्ञा मिळतात ते चांगले. (सारे धर्मग्रंथ)

**मूरचा आक्षेप**


मूर येथे एक मोठा व मूलभूत आक्षेप घेतो. मूरच्या मते, 'चांगले'च्या अशा तऱ्हेने केलेल्या 'सर्व व्याख्या तार्किक आहेत, तर्कशास्त्रीय नियमांना अनुसरून काटेकोर आहेत, असे सकृतदर्शनी दिसते'. पण त्या सर्व व्याख्यांमध्ये, त्या सर्व प्रयत्नांमध्ये एक ***तर्कदोष*** (fallacy) घडतो. त्या तर्कदोषाला मूर 'नैसर्गिकतेचा तर्कदोष' (naturalistic fallacy) म्हणतो. एका नव्या दृष्टिकोनातून 'चांगले म्हणजे काय?' या समस्येकडे पाहिले, तर हा दोष टाळता येणे शक्य आहे.

मूरचा या प्रस्तुतच्या तर्कदोषाचे स्वरूप आणि त्याची नवी दृष्टी पाश्चात्य–युरोपीय नीतिशास्त्राच्या इतिहासात क्रांतिकारी ठरली. तिने पाश्चात्य विचारविश्वावर खूप मोठा प्रभाव टाकला. मूर चांगुलपणा असणाऱ्या, स्वतःहून चांगल्या असलेल्या काही संकल्पनांची यादी देतो आणि त्यात तो 'प्रेम' ही संकल्पना समाविष्ट करतो.


मूरची ही विश्लेषण पद्धती आणि चांगलेपणाकडे पाहण्याची नवी दृष्टी यांचे उपयोजन केल्यास 'प्रेम' ही भावना आणि संकल्पना या दोन्ही अर्थाने आपल्या आकलन कक्षेत आणि अर्थात आचरणात अगदी यथार्थतेने येण्याच्या मार्गाचे जणू 'प्रातिभ दर्शन' घडू शकते. ते कसे, त्याचे स्वरूप आपण या लेखाच्या उत्तरार्धात पाहू.

(पूर्वार्ध)

**लेखक व्यावसायिक तत्त्ववेत्ते आणि सल्लागार आहेत.**
**संपर्क : ९१५ ८६५ ८०६६,** wiselove2026@gmail.com




# सांख्य तत्त्वज्ञान :
# पारलौकिकतेकडून इहलोकाकडे



जगदीश काबरे

नास्तिक दर्शन



**मा**गील लेखात आपण सांख्य दर्शनातील मूलभूत तत्त्वे पाहिली. आता या लेखात सांख्य तत्त्वज्ञान काय आहे ते विस्ताराने पाहणार आहोत. सांख्य दर्शन हे भारतीय षड्दर्शनांपैकी एक दर्शन आहे हे आत्तापर्यंतच्या विवेचनातून कळलेच आहे. अथर्ववेदाच्या काळात सांख्य दर्शन प्रसिद्ध झाले. तिथल्या ब्रह्मसूक्तात म्हटले आहे, की त्रिगुणांनी आवृत अशा नवद्वार पुंडरिकात जे मूर्तिमंत यक्षरूप ब्रह्म आहे, त्याला ब्रह्मवेत्यांनी जाणले (१० ८.४३). हे नवद्वार पुंडरीक म्हणजे त्रिगुणांनी आवृत मानवशरीरच होय. कठ, श्वेताश्वतर, प्रश्न व मैत्रायणी या प्राचीन उपनिषदांवर सांख्य दर्शनाचा खोल ठसा उमटला आहे...

उपनिषद कालानंतर भारतीयांच्या विचारसरणीत सांख्य दर्शनाने अढळपद मिळवले. सांख्य व वेदान्त यांचा संगम करून वैदिक भारतीयांनी दार्शनिक विचारसरणी निर्माण केली. महाभारत, गीता, पुराणे व मनुसंहिता यांतील तत्त्वज्ञान सांख्य-वेदान्तांच्या समन्वयानेच बनले आहे. बुद्ध व जैन यांचे विचारही सांख्य दर्शनाच्या वातावरणात वाढले. सांख्य विचारपद्धती इसवीसनपूर्व ८०० च्या सुमारास अस्तित्वात आली असावी. शुद्ध बुद्धिप्रामाण्यावर आधारलेले हे दर्शन आहे.

**भव्य आणि तर्कनिष्ठ**


प्रा. स. रा. गाडगीळ यांनी सांख्य दर्शनाबद्दल पुढील विचार मांडले आहेत, सांख्य दर्शन हा विश्वविकासाची भौतिक दृष्टिकोनातून मीमांसा करण्याचा पहिलाच भव्य आणि तर्कनिष्ठ असा प्रयत्न आहे. तत्पूर्वी शेकडो वर्षे लोकजीवनामध्ये प्रचलित असलेल्या स्थूल आणि ग्राम्य इहलोकवादाला शास्त्रीय चिंतनाची बैठक देऊन सांख्यांनी एक सुसंगत आणि युक्तिसिद्ध असे जीवन दर्शन निर्माण केले. स्त्रीला निर्मितिकेंद्र कल्पून तांत्रिकांनी आपली विश्वनिर्मितिविषयक उपपत्ती मांडली होती. यातूनच सांख्यांचा प्रकृतिपुरुषविचार उद्भवला. अर्थात सांख्य म्हणजे तंत्रसाधना नव्हे. तांत्रिकांच्या वामाचारादी मंत्रतंत्रात्मक कर्मकांडातून बाहेर पडून सांख्यांनी प्रकृति-पुरुष विचाराला तत्त्वचिंतनाच्या पातळीवर आणून सोडले. प्राचीन परंपरेप्रमाणे सांख्याला प्रारंभी तंत्र या नावानेच संबोधित असावे. शंकराचार्यांनी सांख्यांचा 'कपिलस्य तंत्रं' असाच उल्लेख केला आहे. स्वतः सांख्यकारिका कर्त्यानेही आपल्या तत्त्वज्ञानाचा उल्लेख तंत्र याच शब्दाने केला आहे. तेव्हा सांख्य आणि तंत्र यांचा संबंध त्या काळात सर्वमान्य असावा. सांख्यांनी तांत्रिकांचा प्रकृति-पुरुष विचार घेऊन त्यातून आपला सुप्रसिद्ध अचेतनप्रधान कारणवादाचा सिद्धांत मांडला. अर्थात त्यांचा हा सिद्धांत उत्तर काळात मूळ शुद्ध स्वरूपात टिकला नाही. त्यांच्या तर्कशुद्ध विचारांना विज्ञानाची जोड मिळण्यापूर्वीच त्याचे वेदान्तात विलिनीकरण झाले. पण मूळ सांख्य तत्त्वज्ञानाचे स्वरूप पूर्णपणे जडवादी व वेदविरोधी होते.

**विवेकज्ञानाचा पैस**

सांख्य या नावाची व्याख्या कपिल मुनींनी अनेक प्रकारे केलेली आहे. या दर्शनाने पहिल्याप्रथम तत्त्वांची गणना केली. गणनेला संख्या असेही नाव आहे. संख्येला प्राधान्य दिल्यामुळे या दर्शनाला सांख्य असे नाव मिळाले. सांख्य शब्दाची दुसरीही एक व्याख्या केलेली आहे. संख्या म्हणजे विवेकज्ञान. प्रकृती व पुरुष यांच्या बाबतीत अज्ञान असल्यामुळे माणूस जन्म-मरणाच्या फेऱ्यात सापडतो. पण जेव्हा माणसाला पुरुष (जीव) हा प्रकृतीपासून भिन्न व स्वतंत्र आहे, असे ज्ञान होते, तेव्हा त्याला मोक्षाची प्राप्ती होते. या विवेकज्ञानाला प्राधान्य असल्यामुळे या दर्शनाला सांख्य हे नाव पडले. प्रकृती व पुरुष ही दोन मूलभूत तत्त्वे या दर्शनात मानल्यामुळे हे द्वैतवादी दर्शन आहे. प्राचीन कालातील विचारविश्वावर या दर्शनाचा खूपच प्रभाव पडला होता. म्हणून याचा प्रवर्तक महर्षी कपिल याला प्रथम दार्शनिक (आदिविद्वान) असे गौरवाने संबोधले गेले आहे.

सांख्य दर्शनात तत्त्वांची मीमांसा फार चांगल्या रीतीने केलेली आहे. सांख्यांनी पंचवीस तत्त्वे मानलेली आहेत. त्यांचे यथार्थ ज्ञान झाले असता कोणाही व्यक्तीला दुःखापासून मुक्ती मिळते. एक तत्त्व असे आहे, की जे सर्वांचे कारण आहे; पण कार्य मात्र कोणाचेच नाही. याला प्रकृती असे नाव आहे. काही तत्त्वे स्वतः कार्य असतात. पण ती दुसऱ्या कोणाला उत्पन्न करीत नाहीत. त्यांना विकृती असे म्हणतात. काही तत्त्वे कार्य व कारण अशा दोन्ही रूपांत असतात. त्यांना प्रकृति-विकृती असे नाव आहे. काही तत्त्वे कार्य व कारण या उभयविध संबंधाने रहित असतात. म्हणजे ती कार्यही नसतात किंवा कारणही नसतात. त्यांना 'न प्रकृति-न विकृती' असे नाव आहे. प्रधान, अव्यक्त किंवा प्रकृती हे तत्त्व प्रकृती या वर्गात येते. पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंच महाभूते व मन अशी सोळा तत्त्वे विकृती या सदरात मोडतात. महत्तत्त्व, अहंकार व शब्दतन्मात्र, स्पर्शतन्मात्र, रूपतन्मात्र, रसतन्मात्र, गन्धतन्मात्र ही पाच तन्मात्रे प्रकृति-विकृती या वर्गात येतात. पुरुष या तत्त्वाचा समावेश न प्रकृति-न विकृती या वर्गात होतो.

या जगातील मन, शरीर, इंद्रिय, बुद्धी इ. सर्व पदार्थ सीमित व परतंत्र असल्यामुळे कार्यरूप आहेत. त्यांची उत्पत्ती कोणत्या तरी मूलतत्त्वापासूनच झालेली आहे. या मूलतत्त्वाचे अन्वेषण व तात्त्विक विवेचन करणे हे प्रत्येक दर्शनाचे आवश्यक कार्य आहे. सांख्य दर्शनात स्थूल व सूक्ष्म अशा सर्व कार्यांची म्हणजे जगताची उत्पादक प्रकृती मानलेली आहे. जगतातील सर्व पदार्थ सीमित व परतंत्र आहेत; त्यामुळे त्यांचे मूलकारण अपरिमित व स्वतंत्र असले पाहिजे. जगातील सर्व पदार्थात




*कपिल महर्षींनी प्रकृती आणि पुरुष या दोन मूलतत्त्वांच्या आधारे सांख्य तत्त्वज्ञानाची मांडणी केली. ती करताना त्यांनी प्रत्येक व्यक्तीला वेगळा आत्मा मानला. आत्मा ही संकल्पना स्वीकारल्याने ते नास्तिकतेच्या जवळ जाणारे तत्त्वज्ञान ठरले, नास्तिक नव्हे!*

सत्त्व, रज व तम हे तीन गुण दृष्टीला पडतात. प्रत्येक पदार्थ सुख, दुःख व मोह उत्पन्न करणारा आहे. त्यामुळे ही वैशिष्ट्ये असलेले एक मूल कारण असले पाहिजे. प्रत्येक कार्य हे कारणात अव्यक्त रूपाने राहत असते. हे जग म्हणजे कार्याचा एक समूह आहे. तेव्हा तो कोणत्या ना कोणत्या कारण जगात अव्यक्त रूपाने राहतो. हे मूल कारण म्हणजे, अव्यक्त किंवा प्रकृती होय. कार्य हे कोणत्या तरी कारणातून उत्पन्न होते व शेवटी त्याच कारणात लीन होते, असे सर्वत्र दिसते. हेच कारण कोणत्या तरी सूक्ष्म कारणातून उत्पन्न होते. ते पुन्हा सूक्ष्मतर कारणातून निर्माण होते. असे करता करता शेवटी जे सूक्ष्मतम तत्त्व राहते, ती प्रकृती होय आणि तीच सर्वांचे कारण आहे. तिच्यापासूनच हे विश्व उत्पन्न होते. प्रलयाच्या वेळी याच्या उलट क्रिया होते. म्हणजे स्थूल कार्य आपल्या कारणात लीन होते. ते कारणही आपल्या सूक्ष्मतर कारणात लय पावते. अशा प्रकारे, ही परंपरा जिथे संपते, तेच सूक्ष्मतम अव्यक्त तत्त्व होय. अशा तऱ्हेने विश्वाच्या आविर्भावाचे जे अंतिम तत्त्व मानावे लागते, तीच प्रकृती होय. सत्व, रज व तम हे तीन गुण प्रकृतीच्या ठिकाणी राहतात. त्यामुळे जगातील पदार्थांतही हेच गुण येतात. एकच वस्तू कोणाला आनंद तर कोणाला दुःख देते आणि कोणाला मोहात पाडते. प्रकृती हे मूलतत्त्व असून, ते नित्य, व्यापक, एक, अवयवरहित असून कोणावरही आश्रित नसणारे आहे, स्वतंत्र आहे. ती आपल्यातून सर्व विश्व निर्माण करते आणि प्रलयाच्या वेळी पुन्हा आपल्यातच त्याचा लय करते. ती जडरूप आहे. अव्यक्तरूप असल्यामुळे तिला अव्यक्त, प्रधान कारण आणि सर्वाची जननी आहे. प्रकृती स्वतः अज आहे, ती कारण असली तरी स्वतः कोणाचे कार्य नाही.

पुरुष तत्त्वानुसार जगातील सर्व पदार्थ अनेक गोष्टी म्हणून एकसंघ बनलेले आहेत. विटा, दगड, चुना, सिमेंट इ. वस्तूंचा समुदाय म्हणजे घर होय. अनेक तंतूंचा समूह म्हणजे वस्त्र होय. अशा या संघटित वस्तू नेहमी दुसऱ्या कुणाच्या तरी उपयोगासाठी असतात. म्हणून प्रकृतीपासून निर्माण झालेले हे संघातमय जगत प्रकृतीपेक्षा दुसऱ्या कुणासाठी तरी असले पाहिजे. हा दुसरा कोणीतरी म्हणजे या जगापासून विलक्षण असलेला पुरुष होय. जड पदार्थात चेतन कोणीतरी असल्याशिवाय, त्यात प्रवृत्ती दिसत नाही. रथामध्ये त्याचा नियंता असा चेतन सारथी असल्याशिवाय, तो एका स्थानावरून दुसऱ्या स्थानाकडे जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे सुखदुःखमोहात्मक अशा जगताचा कोणीतरी चेतन अधिष्ठाता असल्यामुळेच त्यात प्रवृती दिसून येते. जगातील सर्व विषय हे भोग आहेत. तेव्हा त्यांचा भोक्ता कोणीतरी असलाच पाहिजे. तोच पुरुष होय. या जगात काही मानव असे असतात, की जे दुःखाने व्यथित होऊन मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न करतात. यावरून असे दिसते, की कोणीतरी निश्चितपणे दुःखापासून निवृत्ती मिळवू शकतो. तोच पुरुष होय.

**आत्मा एकच कसा?**

सांख्यांनी प्रत्येक व्यक्तीला वेगळा आत्मा मानला आहे. अशा प्रकारे त्यांनी अनेक पुरुष मानले आहेत. पुरुषाची अनेकता सिद्ध करण्यासाठी त्यांच्या मते निरनिराळ्या व्यक्तींचे जन्म-मृत्यू, ज्ञान व कृती यांमध्ये खूपच तफावत दिसते. जर आत्मा एकच असता, तर एका पुरुषाचा जन्म झाल्यावर सर्व पुरुषांचाच जन्म झाला असता. एका पुरुषाचा मृत्यू झाल्यावर सर्वच पुरुष मरण पावले असते. एक पुरुष आंधळा व बहिरा

असता, जगातील सर्वच पुरुष आंधळे व बहिरे झाले असते. पण असे कधी होत नाही. म्हणून आत्मे अनेक मानावे लागतात. व्यक्तींमध्ये एकाच वेळी एकच प्रवृत्ती दिसत नाही. एकाच वेळी कोणी पुरुष रडत असतो, तर कोणी हसत असतो. सकाळच्या वेळी कोणी विद्यार्थी अंगणात खेळत असतो, तर कोणी घरात बसून अभ्यास करीत असतो. यावरून पुरुष किंवा आत्मे अनेक असून, ते आपल्या इच्छेनुसार एकाच वेळी भिन्न भिन्न कामे करीत असतात. या जगात माणसामाणसात अनेक भेद दिसतात. सर्वच मनुष्यांचा स्वभाव सारखा नसतो. काही व्यक्ती चिंतनशील असतात, तर काही सतत काही ना काही उद्योग करीत असतात. कोणी अभ्यासू असतात, तर कोणी आळशी असतात. एकच आत्मा किंवा पुरुष असता, तर माणसांमध्ये स्वभावभेद दिसला नसता. सर्व व्यक्ती एकाच प्रकारच्या झाल्या असत्या. यावरून सिद्ध होते, की पुरुष आणि आत्मे एक नसून अनेक आहेत.

**ज्ञानाची घडणक्रिया**

जगातील पदार्थांचे ज्ञान आपल्याला इंद्रियांच्या साहाय्याने होते. इथे प्रश्न असा उपस्थित होतो, की ज्ञान कोणात असते? नेत्राच्या द्वारे मडक्याचे प्रत्यक्ष होते, ते ज्ञान कोण करून देतो? पुरुष का बुद्धी? याचे उत्तर असे, की एकट्या पुरुषात किंवा एकट्या बुद्धीने ज्ञानाची उपलब्धी होत नाही, तर दोहोंच्या मीलनामुळे ज्ञानव्यापार समजवून घेतला जातो. जेव्हा आत्म्याचे चैतन्य बुद्धीत प्रतिबिंबित होते, तेव्हा ज्ञानाची उत्पत्ती होते. आत्म्याला किंवा पुरुषाला बुद्धी, मन व इंद्रिये यांच्या साहाय्याने पदार्थांचे ज्ञान होते. मन व इंद्रिये जे विषय बुद्धीच्या पुढे प्रस्तुत करतात, त्यांच्याप्रमाणे बुद्धी आकार धारण करते. आणि जेव्हा बुद्धीवर पुरुषाच्या चैतन्याचा प्रकाश पडतो, तेव्हा आपल्याला त्या विषयांचे ज्ञान होते. अशा प्रकारे झालेल्या यथार्थ ज्ञानाला 'प्रमाण ज्ञान' असे म्हणतात.

सांख्यांनी प्रत्यक्ष, अनुमान व शब्द ही तीन प्रमाणे मानलेली आहेत. त्यांच्या मतानुसार प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे एखाद्या विषयाचा इंद्रियाशी संयोग झाल्यावर, त्याचे जे साक्षात ज्ञान होते, त्याला प्रत्यक्ष असे म्हणतात. प्रत्यक्षाची प्रक्रिया पुढीलप्रमाणे होते... समजा, आपल्या समोर एक वृक्ष आहे. आपण त्याला पाहण्याचा प्रयत्न केला असता आपले डोळे त्या वृक्षाकडे पाहू लागतात. मग ते डोळे तो विषय मनासमोर (म्हणजे आजच्या काळात मेंदूत) ठेवते. तेव्हा मन आपला संकल्पात्मक व्यापार त्याच्यावर करते, की 'हा वृक्षच आहे; दुसरी कोणती वस्तू नाही.' मग मन त्या संकल्पित वृक्षाला बुद्धीच्या समोर ठेवते. त्या वेळी बुद्धी स्वतः वृक्षाचे रूप धारण करते. मग बुद्धीवर पुरुषाच्या चैतन्याचा प्रकाश पडतो. त्याच वेळी ज्ञान होते, की हा समोर दिसणारा पदार्थ वृक्ष आहे.

प्रत्यक्षाचे निर्विकल्पक व सविकल्पक असे दोन प्रकार आहेत. ज्या वेळी इंद्रियाचा विषयाशी संयोग होतो, त्या वेळी विषयाचे जे आलोचन केले जाते, त्याला निर्विकल्पक असे म्हणतात. या दशेत वस्तू केवळ इंद्रियाच्या द्वारे गोचर होते. मनाची क्रिया त्याच्यावर झालेली नसते. त्या वेळी ही एक काहीतरी वस्तू आहे, एवढेच ज्ञान झालेले असते. मनाची क्रिया झाल्यावर हा पदार्थ गाय आहे, तिचा रंग पांढरा आहे, इ. ज्ञान होते, त्याला सविकल्पक असे म्हणतात.

संख्यांच्या विचारानुसार अनुमानाचे वीत व अवीत असे दोन प्रकार होतात. जे अनुमान व्यापक विधिवाक्यावर अवलंबून असते त्याला वीत अनुमान असे म्हणतात. दोन पदार्थांच्या ठिकाणी निश्चितपणे असलेल्या व्याप्तिसंबंधावर आधारित जे अनुमान ते पूर्ववत होय. जसे की धूर दिसला म्हणजे अग्नी आहे, असे अनुमान काढता येते. धूर आणि अग्नी यांच्यातील निश्चित संबंधाचे ज्ञान आपल्याला स्वयंपाक घर वगैरे ठिकाणी आधी झालेले असते. जेव्हा हेतू आणि साध्य यांच्यामधील व्याप्तिसंबंधाचे प्रत्यक्ष ज्ञान आपल्याला होत नाही, तेव्हा सामान्यतः दृष्ट अनुमान होते. इंद्रियांच्या अस्तित्वाचे ज्ञान आपल्याला प्रत्यक्ष कधी होत नाही, तर ते अनुमानानेच करून घ्यावे लागते. कोणतीही क्रिया करायची, तर तिला साधनाची आवश्यकता असते. वृक्ष तोडण्यासाठी कुऱ्हाड लागते. लेखनक्रियेसाठी लेखणीची गरज असते. त्याचप्रमाणे पाहणे ही एक क्रिया आहे व तिचे साधन म्हणून डोळ्यांची सत्ता आपण मानतो. हे 'सामान्यतः दृष्ट' अनुमान होय.

**कैवल्यज्ञानाचा उदय**

अवीत अनुमानाला न्यायदर्शनात शेषवत म्हटलेले आहे. 'शब्द हा गुण आहे', हे अनुमान त्या प्रकाराचे आहे. आप्तवचनाला शब्द असे नाव आहे. आप्त म्हणजे सच्चा विश्वस्त पुरुष. त्याचे वचन प्रामाणिक असते. त्यालाच शब्दप्रमाण असे म्हणतात. त्याचप्रमाणे वैदिक वाक्यही प्रमाणभूत असते. ज्या अलौकिक गोष्टींचे ज्ञान प्रत्यक्ष किंवा अनुमान यांच्या द्वारे होत नाही, त्यांचे ज्ञान आपल्याला

वेदवाक्यांनी होते. वेद हे सत्य व अपौरुषेय आहेत. त्यामुळे ते स्वतः प्रमाण आहेत.

माणसाचे जीवन हे सुखदुःखांनी भरलेले असते. सुखाने मनुष्याला आनंद होतो. दुःखाने तो त्रस्त होतो. सुखापासून मिळणारा आनंद हा क्षणिक असतो. तो स्थायी नसतो. जगात एकूण दुःखच अधिक दिसते. दुःखाचे आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक असे तीन प्रकार होतात. आध्यात्मिक याचा अर्थ आत्म्यासंबंधी असा आहे. पण आत्मा या शब्दाचा अर्थ इथे देह, शरीर असा आहे. मन व शरीर यांच्यासंबंधी जे दुःख ते आध्यात्मिक होय. आधी म्हणजे मानसिक चिता, उद्वेग, क्रोध इत्यादी व व्याधी म्हणजे शारीरिक रोग, आघात, इत्यादी. या दोहोंचे संमीलित रूप म्हणजे आध्यात्मिक दुःख होय. आधिभौतिक दुःख हे बाह्य पदार्थांपासून उत्पन्न होते. साप किंवा विंचू चावणे, काठीचा मार लागणे, इ. हे आधिभौतिक दुःख होय. भूतप्रेतपिशाच्च यांपासून उत्पन्न होणारे दुःख ते आधिदैविक होय.

दुःखापासून मुक्त होण्यासाठी प्रत्येक प्राणी धडपडत असतो. तसेच, त्याची प्रत्येक क्रिया ही सुख व आनंद मिळविण्याच्या हेतूने केलेली असते. परंतु नश्वर शरीर व दुर्बल इंद्रिये यांमुळे सुख हे पुष्कळदा दुःखमिश्रित असते. तेव्हा दुःखापासून आत्यंतिक निवृत्ती हे मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. अज्ञान हे सर्व दुःखाचे कारण आहे. जगातील वस्तूंचे यथार्थ रूप न जाणल्यामुळे दुःख उत्पन्न होते आणि जसजसे त्यांचे यथार्थ रूप आपल्याला समजू लागते, तसतशी दुःखाची निवृत्ती होत जाते. 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' म्हणतात, ते हेच होय. विवेकज्ञानामुळे पुरुषाच्या ठिकाणी कैवल्यज्ञानाचा उदय होतो. या वेळी त्याला 'नास्मि' म्हणजे मी स्वभावतः निष्क्रिय आहे. 'नाहम्' म्हणजे माझ्या ठिकाणी कोणतेही कर्तृत्व नाही व 'न मे' म्हणजे मी असंग आहे, असा अनुभव येतो. प्रत्येक मनुष्याला या जन्मात अशी मुक्तावस्था प्राप्त करून घेता येणे शक्य आहे. जीवनमुक्ती आणि विदेहमुक्ती असे मुक्तीचे दोन प्रकार आहेत. विवेकज्ञान झाल्यावर मनुष्य याच जन्मात ज्या मुक्तीचा अनुभव घेतो, तिला जीवन्मुक्ती असे म्हणतात. जीवन्मुक्त व्यक्ती कर्मव्यापारापासून विरक्त होत नाही, तर पूर्वीइतक्याच आस्थेने प्रारब्ध कर्मे करीत राहते. परंतु आता ही कर्मे त्या व्यक्तीला बंधनकारक होत नाहीत. घट बनल्यावर कुंभाराने चाक फिरवायचे थांबवले, तरी पूर्वीच्या गतीमुळे ते जसे थोडा वेळ फिरत राहते, त्याचप्रमाणे प्रकृतीची निवृत्ती झाल्यावरही व्यक्ती काही काळ प्रारब्ध कर्मे करीत राहते. शरीराचा नाश झाल्यावर व्यक्तीच्या ऐकांतिक व आत्यंतिक म्हणजे अविनाशी अशा दुःखांचा नाश होतो. यालाच विदेहमुक्ती अशी शास्त्रीय संज्ञा आहे. विज्ञानभिक्षूने याच मुक्तीला खरी मुक्ती मानलेली आहे. असे हे सांख्य तत्त्वज्ञान पारलौकिकतेकडून इहलोकाकडे नेणारे वास्तव तत्त्वज्ञान आहे. तरीही त्यांनी आत्मा ही संकल्पना स्वीकारल्यामुळे त्याला नास्तिक तत्त्वज्ञान म्हणता येत नाही. फार तर नास्तिकतेच्या जवळ जाणारे तत्त्वज्ञान असे म्हणता येईल.

**जगदीश काबरे हे विज्ञानप्रसार आणि सामाजिक उन्नयनाशी निगडित कार्यकर्ते, ज्येष्ठ लेखक आणि आस्वादक आहेत.**
**संपर्क :** ९९२०१९७६८०
**ई मेल :** jetjagdish@gmail.com

**दी रजिस्ट्रेशन ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल) रुल्स १९५६ नियम क्र. ८ अन्वये समतावादी मुक्त संवाद पत्रिका या मासिकाची मालकी व इतर तपशिलांसंबंधी निवेदन**

१) नियतकालिकाचे नाव : समतावादी मुक्त संवाद पत्रिका

२) प्रकाशकाचे नाव : विवेक दत्तात्रय कोरडे

राष्ट्रीयत्व : भारतीय

३) प्रकाशन स्थळ : रुम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई-४०० ०१३

५) मुद्रण स्थळः जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती, ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई-४०० ००४

६) संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे, रुम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई-४०० ०१३

राष्ट्रीयत्व : भारतीय

कार्यालयाचा पत्ता : रुम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई-४०० ०१३

मी विवेक दत्तात्रय कोरडे घोषित करतो, की वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीनुसार विश्वासपात्र व सत्य आहे.

दिनांक : एप्रिल २०२६

**विवेक दत्तात्रय कोरडे**
**प्रकाशक**

# मौसम-ए-दिल्ली



आशय गुणे

**बरसाती मजला**



*लोधी गार्डनमधला बहर...*

दिल्लीत दीड वर्ष राहिल्यानंतर एका स्थलांतरित व्यक्तीची मानसिकता स्थानिकांच्या तुलनेत अधिक सजग किंवा जिज्ञासू असते का, असा मला प्रश्न पडला आहे. इथे येण्याच्या आधी सगळं आयुष्य मुंबईत घालवलं आणि त्यामुळे मुंबईच्या जीवनशैलीशी मुद्दाम जुळवून घ्यायची वेळ कधी आलीच नाही. खरं तर मुंबईचा पावसाळा ही एकच वार्षिक घटना आहे, ज्याच्याशी खास जुळवून घ्यावं लागतं. कदाचित त्याचं कारण तितक्या प्रकर्षाने न बदलणारं मुंबईचं तापमान व ऋतुचक्र हे असावं. किंबहुना, पावसाळ्यातही तापमान हा घटक महत्त्वाचा नसून जीवनपद्धती विस्कळीत होणं, हीच मुंबईची सर्वात मोठी तक्रार असते. या पार्श्वभूमीवर दिल्लीचे ऋतुचक्र आणि त्या भोवती फिरणारी जीवनपद्धती हा अत्यंत निराळा अनुभव आहे...

नव्या प्रकल्पानिमित्त दिल्लीत आलो, २०२४ च्या ऑक्टोबर महिन्यात. ऑक्टोबर महिन्यात मुंबई सोडणं ही खरं तर आनंदाची गोष्ट म्हणायला हवी! कारण, विशेषतः गेल्या दहा वर्षात 'ऑक्टोबर हीट' एप्रिल आणि मे महिन्याच्या उष्णतेसमोर स्पर्धा उभी करू लागली आहे. मात्र दिल्लीत या महिन्यात उन्हाळ्याने आपली तीव्रता कमी केलेली असते आणि हवेत आधीच्या महिन्यातील भीषण उन्हाळ्याच्या तुलनेने बऱ्यापैकी थंडावा आलेला असतो. आयुष्याचा मोठा काळ मुंबईत राहिलो असल्यामुळे मला तिथे ज्या एका गोष्टीचा अभाव असतो, त्याचे आकर्षण होते – थंडी!

मात्र आता जाणवतं की दिल्लीकर मंडळींना ऑक्टोबर महिन्यात, त्यांच्याकडे थंडी (जी तितकेच तीव्र रूप धारण करते) हा स्वतंत्र हंगाम असूनही, ती येण्याची आस लागलेली असते. कारण २०२४ च्या ऑक्टोबर महिन्यात व मागच्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यातही आजूबाजूला या वर्षी थंडी जास्त (किंवा कमी) असणार आहे या गप्पा, चर्चा आणि परस्परसंवाद हे मी ऐकले आहेत. गंमत म्हणजे, बाजारात, मेट्रोत, चहाच्या टपरीवर आणि अशा अन्य सार्वजनिक ठिकाणावर थंडीची चर्चा सुरू होते. बातम्यांमध्ये या दिवसात थंडी लवकर दाखल होणार, की उशिरा याची माहिती प्रदर्शित होते.

**उत्सवरंगाच्या छटा आणि प्रदूषणाचे पडदे**

दरम्यान, नवरात्री म्हणजेच दुर्गा पूजा आणि दसरा आपापल्या ढंगासह दाखल झालेले असतात. त्यात विशेष उल्लेख म्हणजे, दिल्लीच्या सी. आर. पार्क या बंगाली वस्तीतील दुर्गा पूजा पंडालांचा आणि रामलीला मैदानाच्या रावण दहन सोहळ्याचा. शिवाय, आणखी दोन सणांनी आपले अस्तित्व दिल्लीत अगदी ताकदीने राखले आहे. करवा चौथ आणि छठ पूजा. या दोन्ही सणांची चाहूल लागते, दिल्लीच्या रस्त्यांवर, फुटपाथवर. इथे मोठ्या संख्येने मेंदी काढून घ्यायला बसलेल्या सर्व वयोगटातील बायका-मुली आणि दैनंदिन कामांसाठी असलेल्या कामगारांची अनुपस्थिती हे अनुक्रमे करवा चौथ आणि छठ पूजा याची प्राथमिक व ठळक लक्षणं आहेत! या व्यतिरिक्त छठ पूजेनिमित्त मोठ्या आवाजात व कर्कश डीजेच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या सार्वजनिक कार्यक्रमांना आपल्या गावी न गेलेले बिहारी मनसोक्त दाद देताना आढळतात, त्यांचे आवाज अगदी मध्यरात्रीपर्यंत ऐकू आले नाहीत, तरच नवल!

मात्र, करवा चौथ निमित्ताने उडवलेल्या फटाक्यांमुळे येणाऱ्या हिवाळ्याच्या बरोबरीने आणखी एका घटकाची चाहूल लागते – प्रदूषण! दरवर्षी या एका समस्येमुळे ऑक्टोबर ते जानेवारी या महिन्यात दिल्ली हे संपूर्ण देशाच्या चर्चेत असते. या चर्चेची सुरुवात होते, ऑक्टोबरच्या अखेरीस व ती त्वेषाचे रूप घेते दिवाळीत! दुर्दैवाने, वातावरणात प्रदूषण असो वा नसो, फटाके हे स्वतंत्रपणे प्रदूषणास कारणीभूत असतात, ही साधी बाब या चर्चेमुळे झाकोळली जाते. संपूर्ण दिल्ली ही उद्ध्वस्त झालेलं वातावरण निमूटपणे (आणि इथला एक गट, अभिमानाने) सहन करते. मात्र दिवाळी आटोपली, की वातावरणातील गारवा अगदी प्रकर्षाने जाणवू लागतो. मला तर ऑक्टोबर २०२४ मधील दिवाळीच्या शेवटच्या दिवशी जाणवलेला वातावरणातील बदल लख्ख आठवतो आहे. इतकंच काय, तर हा असा बदल कुठे किती वाजता जाणवला, हे देखील आठवतंय.

पुढे जवळजवळ दोन महिने हा गारवा वाढत जातो आणि साधारण पंधरा डिसेंबरपासून ते जानेवारी अखेरीस या कालावधीत त्याने तापमानाचा नीचांक गाठलेला असतो. आधी नमूद केल्याप्रमाणे प्रदूषण देखील वाढते. दिवाळी नंतर सुरू होणाऱ्या गारव्यामुळे हळूहळू दिल्लीकरांच्या अंगावर सुरुवातीला स्वेटर आणि नंतर हळूहळू ऐपतीनुसार जॅकेट, चादरी चढू लागतात. इथे मात्र माझ्यासारख्या मुंबईत आयुष्य घालवलेल्या व्यक्तीला हा बदल बघण्यास मजा वाटते.

मुंबईत जूनच्या अखेरीस प्रत्येकाच्या हातात छत्री येण्यासारखा हा सामूहिक बदल आहे. एकूणच, वाढीव दिखावा हा दिल्लीकरांच्या स्वभावाचा स्थायीभाव. परंतु तो हिवाळ्यातील पेहरावात मात्र चांगलाच आकर्षण भासतो. थंडी आणि उकाडा हे दोन्ही इथे अगदी टोकाचे असूनही इथली जनता थंडीचे स्वागत विलक्षण उत्साहाने करते, हे अगदी प्रकर्षाने जाणवते. कारण थंडी सुरु होताच इथे अनेक प्रकारचे महोत्सव सुरू होतात. साहित्य, संगीत, नाटक यांच्याशी संबंधित कार्यक्रमांच्या जाहिराती दिसू लागतात. तसेच अनेक प्रकारचे खाद्य महोत्सव, हस्तकलांचे प्रदर्शन हे देखील भरताना दिसतात. दिल्ली ही राजधानी असल्यामुळे बहुतेक वेळेस या कार्यक्रमांना राष्ट्रीय स्वरूप प्राप्त होते.

ऋतुचक्र पुढे सरकत सरकत वसंत पंचमी येते. ही तारीख

हवामानात बदल होण्याच्या पार्श्वभूमीच्या दृष्टीने दिवाळीसारखीच महत्त्वाची! कारण या आठवड्यात, आता आपल्याला फार काळ अंगावर जॅकेट चढवायला व घरी जाड पांघरुणांमध्ये झोपावे लागणार नाही, याची जाणीव होऊ लागते. अर्थात, थंडी पूर्णपणे निघून जाते, असं नाही, मात्र वातावरणात एक ऊब जाणवू लागते जी अत्यंत आनंददायी असते.

**धूप आयी...**

हिवाळ्यातील ऊन आणि आता सुरू झालेल्या वसंत ऋतु मधील ऊन यातला फरक सांगतो. २०१९ च्या डिसेंबरचा तिसरा आठवडा होता. मी आणि माझे दोन मित्र खान मार्केट येथे स्थित फकीर चंद अँड सन्स या पुस्तकाच्या दुकानात रमलो होतो. हा तापमानातील नीचांक गाठणारा कालावधी, त्यामुळे बाहेर उन्हाचा अभाव. आम्ही पुस्तकं बघण्यात दंग असताना अचानक दोन लोक आले आणि दुकान सांभाळणाऱ्या व्यक्तीला 'धूप आयी' असं आनंदाने सांगू लागले. गंमत म्हणजे, काही क्षणात ते तिघेही बाहेर ऊन अनुभवण्यासाठी गेले.

एकंदरीतच वसंत पंचमी नंतरचे ऊन मात्र वेगळ्या अर्थाने खास! नेहरू पार्क, लोधी गार्डन, सुंदर नर्सरी, रोज गार्डन, हौज खास येथील डिअर पार्क या इतर शहरांना हेवा वाटेल, अशा उद्यानांत लोक वातावरणाची मजा घ्यायला जमतात. कुणी वाचत बसतं, कुणी आपल्या कुटुंबासह खायला-प्यायला येतं किंवा कुणी मित्रमंडळींबरोबर गप्पांचे फड रंगवतं. मी मात्र २०२५ आणि २०२६ या दोन्ही वेळेस डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत ही सर्व उद्यानं चालून पालथी घातली. दिल्लीतील अनेक ठिकाणी चालत फिरून रस्ते शोधून काढले. मेट्रोमुळे बहुतेक प्रवास जमिनीखालून होत असल्यामुळे शहराचा पटकन अंदाज लागणे कठीण! म्हणूनच या सुखावह वातावरणात मी दिल्लीचे रस्ते पिंजून काढून शहर अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेतलं. जावेद अख्तर यांनी, 'एक लडकी को देखा तो ऐसा लगा' या त्यांच्या गाजलेल्या गाण्यात 'जैसे' या श्रेणीत एक वर्णन 'सर्दी की धूप' असं का केलं आहे, ते इथे उत्तर भारतात राहून समजतं!

मात्र या थंडीत प्रदूषण आणि धूळ याचाही त्रास सहन करावा लागतो. लोकांचे आजारी पडणे वाढते (माझ्या ऑफिसमध्ये माझ्या सहकाऱ्यांची सर्वाधिक वेळेस तब्येत बिघडण्याचा काळ हाच - नोव्हेंबर ते फेब्रुवारी). शहरात ठिकठिकाणी असलेली वृक्ष धूळखात पडलेली पाहिल्यावर साहिर लुधियानवी यांची माफी मागून म्हणावेसे वाटते:

*ए दिल्ली,*
*ये जिंदगी तेरे धूल के जाल में गुजर न जाती,*
*तो शादाब हो भी सकती थी!*

*आणि वातावरणातील बदल जाणवून देणारा आणखी एक बिंदू उभा ठाकतो - होळी!*

**भिववणारे रंग**

मात्र मी दिल्लीतील होळी ही अगदी ठरवून टाळली. मागच्या वर्षी मसुरीला जाऊन आणि या वर्षी श्रीनगरला! सोशल मीडियावर आणि दिल्लीस्थित अनेकांच्या, विशेषतः महिलांच्या, अभिप्राय ऐकल्यानंतर ठरवलं की या बीभत्सपणात सामील होण्यात काही अर्थ नाही. बुरा ना मानो, होली हैं या घोषणेचा आधार घेत किंवा निमित्त साधून किंवा फायदा उठवून रंग (लावून नव्हे) फासणे यासाठी इथली आणि एकूण उत्तर भारतातील होळी कुप्रसिद्ध आहे असं ऐकलं आहे. हे सर्वांना एकाच तराजूत तोलणे वाटेलही. परंतु काही समाजकंटकांमुळे मला माझे खाजगी आयुष्य कुणाच्याही हवाले करायचे नव्हते.

खरं तर, उत्तरेत काही ठिकाणी साजरी होणारी होळी मला बघायची होती. त्यात विशेष नमूद करावे वाटते ती म्हणजे, बरसानाची लठमार होळी. नंदगावातून कृष्णाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पुरुष मंडळी बरसानात दाखल होतात, जे राधेचे गाव आहे. त्यांचं स्वागत होतं, मिठाई खाल्ली जाते आणि मग आपली पगडी बांधून ही मंडळी तिथल्या महिलांना, जे राधेचे प्रतिनिधित्व करतात, रंग लावण्याची परवानगी मागतात. आणि या महिला या प्रस्तावाचा प्रतिकार पुरुषांवर लाठी उगारून करतात व या लाठ्यांपासून आपला बचाव करण्यासाठी पुरुषमंडळी ढाल पुढे करतात. दिल्लीत आल्यावर याबद्दल माहिती मिळवण्याचे कारण म्हणजे, लहानपणापासून राग मुलतानीत ऐकलेला बडा ख्याल, गोकुल गाव का छोरा और बरसाने की नार. तसंच कुमार गंधर्वांनी प्रसिद्ध केलेली होरी -

*बरसाना में खेलत होरी*
*श्री ब्रुखभान किशोरी ।*
*कोऊ चंदन, बंदन, अत्तर अरगज*
*अबीर गुलाल लिये भरजोरी रे ।।*

याचा अनुवाद असा - बरसानात श्री वृषभानूची कन्या (राधा) होळी खेळत आहे. कुणी चंदन, वंदन, अत्तर आणि



*थंडीचा मोसम आला की, धुक्यात हरवलेल्या दिल्लीत खऱ्या अर्थाने रंगांची उधळण सुरु होते, दिल्लीकर स्वतःला मिरवण्यासाठी या मोसमाचा यथेच्छ वापर करून घेतात. मात्र हातावर पोट असणाऱ्यांसाठी हाच मोसम कठीण परीक्षेचाही काळ ठरतो...*

सुगंधी अरगज घेऊन आले आहे, तर कोणी अबीर-गुलाल घेऊन आनंदाने रंगांची उधळण करीत आहे. पण सोशल मीडियावर या होळीची वस्तुस्थिती काही वेगळीच बघायला मिळते. मला हा सोहळा अनुभवायचा होता, मात्र स्वतः रंगात न भिजता, जे शक्य नव्हतं. त्यामुळे पुढे कधीतरी हे अनुभवूया अशा विचारात तो मोह सोडून दिला.

**असह्य मोसम**

होळीपर्यंत तापमान वाढण्याचा अंदाज आलेला असतोच. मात्र आता ते क्रमाक्रमाने वाढत जाते आणि एप्रिलच्या अखेरीस असह्यता वाढू लागते. फेब्रुवारीत सार्वजनिक ठिकाणी उत्साहात भाग घेणारी मंडळी आता दिवसभर घरी राहणे पसंत करू लागतात. सकाळचा अगदी ६ ते ७:३० चा मॉर्निंग वॉकचा कालावधी सोडला, तर सर्व उद्यानं ओस पडलेली दिसतात आणि मंडळी संध्याकाळी ७ नंतरच बाहेर पडणं पसंत करतात. परिणामी मसुरी, नैनिताल, हरिद्वार-ऋषिकेश, शिमला, धर्मशाळा अशासारखी ठिकाण दिल्ली व इतर मैदानी प्रदेशातील पर्यटकांनी भरून जातात. इथून पुढे, म्हणजे जून पासून सप्टेंबरपर्यंत मुंबईची आठवण अगदी प्रकर्षाने येऊ लागते.

जून महिन्याचे माझ्यासारख्या मुंबईत वाढलेल्या आणि आयुष्य जगलेल्या व्यक्तींसाठी एक वेगळे महत्त्व आहे. मला तर, शाळा सुरु होण्याचा महिना, उन्हाळा संपवून पाऊस सुरू होण्याचा महिना आणि माझा वाढदिवस या तीन गोष्टींमुळे जून महिन्याला काहीतरी नवीन सुरू होण्याशी सतत जोडावेसे वाटले आहे. हा संबंध इतका घट्ट आहे, की कॅलेंडर मध्ये ३१ मे चं १ जून झालं की आपण एका नवीन बदलास सामोरे जाणार आहोत असं वाटतं.

दिल्लीत मात्र परिस्थिती एकदम उलट झालेली असते. तापमानाचा पारा ४० च्या वर गेलेला असतो, सतत तहान लागत असते आणि बाहेर पडलं की भाजल्याव्यतिरिक्त दुसरी कोणतीही भावना नाही. अशा जूनची मला अजिबात सवय नव्हती, त्यामुळे अधिकच चुकल्या-चुकल्यासारखे वाटले. शिवाय उकाड्याची तीव्रता कमी करण्यासाठी या भागाकडे एक नैसर्गिक तंत्र आहे. तापमान ४२ किंवा ४३ पर्यंत गेले की धुळीचे वादळ येते आणि पुढील काही दिवस तापमान ३६ डिग्रीपर्यंत खाली उतरते. तेवढेच दोन दिवस तुलनेने बरं वाटतं, परंतु जवळजवळ एका आठवड्यात पुन्हा आधीची ४२ किंवा ४३ ची पातळी गाठली जाते आणि आपण पुढील धुळीच्या वादळाची आतुरतेने (!) वाटू पाहू लागतो. कारण दगडापेक्षा वीट मऊ! आणि जुलै व ऑगस्ट महिन्यात धुळीच्या वादळांचे रूपांतर शेवटी पावसात होते आणि अनेक कारणांसाठी पुन्हा मुंबईची आठवण तीव्र होत जाते.

दिल्लीचा पावसाळा खरं तर क्षुल्लक म्हणून दुर्लक्षित करता येऊ शकतो. परंतु हे शहर इतकं क्षुल्लक पातळीचा पावसाळाही सहन करू शकत नाही, क्षणातच कोलमडून जातं, ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. मी इतकी वर्ष पावसाळ्यातील व्यवस्थापनामुळे मुंबईवर टीकेची झोड उठवत असे. परंतु मुंबई कोलमडते, ही सतत दिवसभर किंवा दीड दिवस पाऊस पडत राहिल्यानंतर. दिल्लीला कोलमडायला अक्षरशः एक तास पुरेसा आहे. काही भागात तर त्याहून कमी! दिल्ली आणि नॅशनल कॅपिटल रिजन (एनसीआर) हे मोठ्या दिमाखदार पद्धतीने तिथली मेट्रो आणि तिथले उद्योग यासाठी सादर केले जातात. मात्र अर्ध्या तासाचा पाऊस यातील दाव्यांना पोकळ सिद्ध करण्यासाठी पुरेसा आहे.

एक छोटे उदाहरण देतो. मागच्या वर्षीच्या जुलै महिन्याची गोष्ट. बसंत लोक या भागातील एका हॉटेलात जेवायला गेलो होतो. हा भाग वसंत विहार मेट्रो स्थानकाजवळचा आहे आणि दिल्लीतील उच्चभ्रू वस्तीतला म्हणता येईल, कारण थोडं पुढे वसंत कुंज ही चांगलं नियोजन म्हणता येईल अशी वस्ती आहे. आता जो क्रम सांगतो आहे, त्यात कोणतीही अतिशयोक्ती नाही. मी हॉटेलात शिरलो, सूप मागवलं आणि मोजून अर्ध्या तासात बाहेर पडलो. आत शिरण्याआधी पावसाचा एक थेंबही






*जीवघेण्या उकाड्यानंतर बाग-बगीच्यांमध्ये, घरांच्या कठड्यांवर मोर बागडू लागले की, मोसम बदल रहा है...ची चाहूल लागते. मग थोडा जरी पाऊस झाला की, दिल्ली क्षणात पाण्यात बुडते. गाड्या जागीच ठप्प होतात...*

पडत नव्हता, पण अर्ध्या तासात पाऊस पडतो काय आणि संपूर्ण वसंत लोक हा भूभागात पाणी साठून मला पँट गुडघ्यापर्यंत दुमडून चालावे काय लागते, सगळंच त्रासदायक आणि गैरसोयीचे!

या पार्श्वभूमीवर दिल्लीचे नशीब चांगलं आहे की इथे जुलै ते सप्टेंबर या महिन्यात रोज पाऊस पडत नाही. नाहीतर हे शहर केव्हाच बुडून गेलं असतं! परंतु हा अनियमित पाऊस हवेत भीषण दमटपणा घेऊन येतो, ज्याला सहन करणे ही दुसरी मोठी परीक्षा असते. शिवाय पावसाचा दिल्लीकरांवर मानसिक परिणाम देखील होतो. थोडा पाऊस जरी पडत असला, तरी इथली रहदारी सावध होते, रेंगाळते आणि अंतिमतः साऱ्या शहराचा वेग मंदावतो. अशा वेळेस मेट्रो असून काहीच उपयोग नाही, कारण ती पकडण्यासाठी संबंधित स्थानकावर पोचायलाच जर उशीर झाला तर पुढची सगळी गणितं बिघडतात! त्यामुळे ज्या दिवशी पाऊस पडतो, त्या दिवशी हमखास लोकं ऑफिसला उशिरा पोचणार! गंमत म्हणजे, मुंबईत ही परिस्थिती दिल्लीपेक्षा दहापट पाऊस पडला, तो देखील सलग, तरच उद्भवते.

**बिन छत्री बरसात...**

इथली आणखी एक गंमत म्हणजे, जुलै ते सप्टेंबर या कालावधीत मी कधीही दिल्लीत कुणालाही छत्री घेऊन बाहेर पडलेलं बघितलेलं नाही. जी तत्परता स्वेटर किंवा जॅकेटमध्ये दिसते, ती पावसाळ्याच्या दिवसात छत्रीसाठी का दिसत नाही हा प्रश्न रोचक आहे! या दिवसात तीज आणि रक्षाबंधन सोडले तर मोठ्या प्रमाणात साजरे होणारे सणही दिल्लीत नाहीत. गंमत म्हणजे, मुंबईत राहून दिल्लीला परत गेलेल्या दिल्लीकरांनी दही हंडी आणि विशेषतः गणेश चतुर्थी हे दोन सण दिल्ली, नोएडा आणि गुडगाव येथील वसाहतींमध्ये साजरे करण्यास सुरुवात केली आहे, असं ऐकण्यात येत आहे. तीज संबंधित अनेक कार्यक्रम होतात आणि रक्षाबंधनसाठी हमखास सुट्ट्या घेतल्या जातात, हे विशेष. मात्र दही हंडी आणि गणपती या दोन सणांची सवय झालेल्यांना मुंबईकरांना दिल्लीत चुकल्यासारखं नक्कीच वाटणार!

सप्टेंबरच्या अखेरीस आणि ऑक्टोबरच्या सुरुवातीला उकाड्याची सवय झालेली असते. अधूनमधून पाऊस पडत असतो. आणि ऑक्टोबर येताच पुन्हा करवा चौथ, नवरात्री आणि दसरा यांचं आगमन होतं. दिल्ली पुन्हा एकदा हिवाळ्याची उत्सुकतेने वाट पाहते. ऋतुचक्र सुरु राहतं. ओढाळ मनाला दिलासा देत राहतं...

**आशय गुणे हे दिल्लीस्थित अमेरिका इंडिया फाउंडेशनचे कम्युनिकेशन कन्सल्टंट, लेखक, अनुवादक आणि संगीत आस्वादक आहेत. त्यांचे डॉ. मनमोहन सिंग-ए टेम्पेस्टुअस टेन्यूर-सहलेखक सुजय शास्त्री- हे पुस्तक प्रकाशित आहे.**
**संपर्क:** gune.aashaygmail.com

# शिळा 'मिकेलांजले' मुक्त केली...



डॉ. आनंद जोशी

ज्ञान रंग



**मि**केलांजलो (इंग्लिशमध्ये मायकेलँजलो असाही उच्चार करतात) बाबत विचार करत होतो. समोर त्याची शिल्पचित्रे पसरली होती. विषय कोणताही असो माझे विचार डार्विन आणि मेंदूविज्ञान यात अडकतात. याला कारण या दोन ज्ञानशाखा माझ्या स्मृतिभूमीत इतक्या खोलवर रुजल्या आहेत. कोणतीही विद्याशाखा हा पिंजरा असतो, असे म्हणतात. पण या पिंजऱ्याच्या तारा लवचिक असतात. यातून बाहेर येऊन दुसऱ्या शाखेतील ज्ञानाशी हातमिळवणी करता येते, यातून नवीन ज्ञानाची निर्मिती होऊ शकते...

**जॉ**न होपफील्ड (१९३३-) आणि जिऑफ्रे हिंटन (१९४७) हे दोघे भौतिकी तज्ज्ञ. त्यांनी मेंदूतील न्यूरॉन्सच्या संदेशवहनाच्या जाळ्याचा अभ्यास केला. न्यूरल नेटवर्क्स आकलन करणारी 'टूल्स' तयार केली. होपफील्ड यांनी न्यूरल नेटवर्क्सचा प्रोग्राम लिहिला. तो हिंटन यांनी सुविकसित केला. म्हणजे, त्यांनी जणू मेंदूच्या बुद्धिमत्तेची नक्कल केली. त्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स = कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया बांधला. त्याचा झटकन विकास झाला. या दोघांना २०२४ चे भौतिकी नोबेल मिळाले. आज चॅट जीपीटी, जेमिनी, मेटा, क्लॉड-कोवर्क, हे एआय आपल्या सेवेला हजर आहेत. भौतिकी विज्ञान आणि मेंदू विज्ञान यांचे भौतिकी वैज्ञानिकानी केलेले संमिलन आहे.

तेव्हा आपल्या पिंजऱ्यातले थोडे ज्ञान घेऊन शिल्पकलेबाबत विचार करायला काय हरकत आहे, असा विचार स्पर्शून गेला. 'द डिसेंट ऑफ मॅन'(१८७१) मध्ये चार्ल्स डार्विनने लिहिले आहे, त्याचा आशय असाः 'हात जणू उपकरणे असतात आणि हाताची संगत थेट बुद्धीशी असते. हात आणि बुद्धी यांच्या मिलनाने मानवाला जगावर वर्चस्व मिळवता आले. पाय उभे राहण्याकरता आणि चलनशक्तीसाठी उपयुक्त ठरले.'

**आकाश छताखाली...**

माणूस लाखो वर्षं शिकार करत, फळे कंदमुळे वेचत रानभर भटकत होता. या अरण्यात ठिकठिकाणी अवाढव्य शिळा, दगड, धोंडे, पडले असणार. हे त्रिमितीय आकार, विविध कोनातून त्याला निरनिराळे भासले असतील, सूर्योदयाच्या कोवळ्या किरणात, दुपारच्या वेळी झाडांच्या सावल्यात, रात्रीच्या चंद्रप्रकाशात, कधी भयावह, तर कधी सुखावणारे. आकार, अवकाश, दिवस रात्रीत बदलणारा प्रकाश, यांच्या परस्पर प्रतिक्रियांमधून निर्माण होणारे आभास व आशय मानवाच्या स्मृतीत आणि नेणिवेत रुजले आणि कोरले गेले. अशी युगानुयुगे गेली. त्याने आगळी वेगळी हत्यारे तयार केली. हस्त कौशल्याबरोबर बुद्धी कौशल्य वाढत गेले. निरीक्षणाने आणि चिंतनाने या दगडी आकारातून आणखी आकार त्याने हत्याराचा वापर करून चतुरपणे निर्मिले. आज अस्तंगत झालेल्या कितीतरी संस्कृतीतील त्या आदिम शिल्पांचे भग्नावशेष जगभर सापडतात. मानवी स्मरणात हे आकार खोलवर रुतून बसले आहेत. या विचारांची पावती मला अशी मिळाली.

इंग्लंडमध्ये 'स्टोन हेन्ज' पाच हजार वर्षापूर्वी निर्मिलेल्या इमारतीचे भग्नावशेष आहेत. याला युनेस्कोने जागतिक वारसा हा दर्जा दिला आहे. चित्रकार प्रभाकर कोलते यांच्या दृक् चिंतन (अनुनाद प्रकाशन २०२१) या पुस्तकात हेन्री मूर (१८९८-१९८६) 'आकाशाला आधार देणारा शिल्पात्मा' हा लेख आहे. त्यात नमुदले आहे, 'विद्यार्थीदशेत असताना हेन्री मूर एकदा 'स्टोन हेन्ज' नावाची इमारत पाहण्यास गेला होता. ती इमारत दिवसाच्या उजेडात अन् रात्रीच्या चांदण्यात अनेक वेळा पाहिल्यानंतर त्याला ती केवळ इमारत नसून 'एक सुंदर शिल्प' देखील आहे, असा साक्षात्कार झाला. त्यानंतर कैक वर्षांनी शिल्पकार म्हणून काम करताना प्रकाश व माध्यम, आशय आणि भव्यता यांची त्याने सगुण सांगड घातली.'

याच लेखात प्रभाकर कोलते लिहितात, 'हेन्रीने घडविलेल्या रिक्लाइनिंग फिगर या शिल्पाकृतीने त्याला जगन्मान्यता आणि प्रतिष्ठा मिळवून दिली. या शिल्पाची जडण घडण करण्यासाठी उघड्या जागेवर उभारलेल्या मोठ्या स्टुडियोत त्याने त्यानंतरची बहुतेक शिल्पे घडवली. निसर्गाच्या कुशीत आकाश छताखाली काम करणे हेन्रीने नेहमीच पसंत केले.'

**मिकेलांजलोची घडण**

मिकेलांजलोची जन्म तारीख ६ मार्च १४७५. गाव कॅप्रिसी. हा भाग इटलीतील टस्कनी परगण्यात मोडतो. लिओनार्दो (१४५२ -१५१९), मिकेलांजलो (१४७५-१५६४), गॅलिलिओ गॅलिली(१५६४-१६४२), हे तिघे टस्कनी या भागातील. हे तिघे जणू एकमेकाला खो-खो देत जन्माला आले, म्हणून हे तिघे 'ग्रेट टस्कन' म्हणून ओळखले जातात.

मिकेलांजलो, लिओनार्दोपेक्षा २३ वर्षं तरुण आणि त्याच्या नंतर ४५ वर्षं जगला. त्याला लाभलेल्या दीर्घ जीवनात युरोपीय कलाविश्वातील चित्रवंतांची भूमिका कशी बदलली, याचा तो साक्षीदार तर होताच, पण या बदलास काही प्रमाणात कारणीभूत सुद्धा होता.

त्या काळात कोणत्याही कारागिराला जसे शिक्षण मिळते, तसेच त्यालाही मिळाले. वयाच्या तेराव्या वर्षी तो शिकाऊ म्हणून डोमेनिको गिरलँडटो (१४४०-१४९४) या मास्टर्सच्या फ्लॉरेन्स येथील स्टुडियोत कामाला लागला. हा खूप चित्रकाम असलेला स्टुडियो होता. या चित्रशाळेत त्याने तीन वर्षं तालीम घेतली. डोमेनिको हा मास्टर 'कथा-वेल्हाळ' होता. धार्मिक



*पोपने मिकेलांजलोला रोमच्या सिस्टिन चॅपेलचे घुमटाकार छत रंगवण्याची आज्ञा दिली. त्याने नाइलाजाने काम हाती घेतले. चार वर्षे लावली. पण बायबलमधल्या कथांची जी काही अद्‌भुत चित्रकारी केली, त्याने जगाला त्याच्यातला प्रज्ञा आणि प्रतिभावंत आकळला...*

घटना जणू आज घडली आहे, अशी तो त्याच्या चित्रकथेत रंगवीत असे. तरुण मिकेलांजलोवर याचा प्रभाव होता. चित्र–शिल्पाची सगळी तंत्रे या ज्वानीतील शिकावूने आत्मसात केली.

पण त्याच्या कलेबाबतच्या कल्पना वेगळ्या होत्या. तीन वर्षानंतर त्याने या स्टुडियोला रामराम ठोकला. मेडिची फॅमिलीचे फ्लॉरेन्स वर राज्य (१४३४–१७३७) होते. त्यांच्या कडे गतकाळातील मास्टर्सच्या चित्रांचा तसेच ग्रीक आणि रोमन शिल्पांचा खजिना होता. याचा या तरुण कलाकाराने सूक्ष्म नजरेने अभ्यास केला. या चित्र–शिल्पातील मानवी कायेची कमनीयता आणि गतिमानता पाहून मिकेलांजलो उद्दीपित झाला.

**कायाविज्ञान**

आधुनिक वैद्यकीय विज्ञानाचा विद्यार्थी असताना 'ॲनाटॉमी' हा विषय पहिल्याच वर्षात शिकलो होतो, पण या 'कायाविज्ञानाचा' आणि चित्र–शिल्पकला यांच्याशी काही संबंध असतो, याची कल्पना नव्हती. पुढे हे लेखन करायला लागल्यानंतर यावर प्रकाश पडू लागला. डिसेंट ऑफ मॅन या डार्विनच्या पुस्तकात 'ग्रेट आर्टिस्ट्स अँड ग्रेट ॲनॅटॉमिस्ट्स' लेखक रॉबर्ट नॉक्स याचा महत्त्वाचा संदर्भ आहे. १८५२ साली जॉन वॅन वूस्ट यांनी लंडन येथे हे पुस्तक प्रथम प्रकाशित केले. याच पुस्तकाचे 'ए बायग्राफिकल अँड फिलॉसॉफिकल स्टडी' हे उपशीर्षक मला महत्त्वाचे वाटले. या पुस्तकाची २०१९ साली अमेरिकेत प्रकाशित झालेली पुनर्मुद्रित आवृत्ती माझ्या संग्रहात आहे. यात लिओनार्दो, मिकेलांजलो, राफाएल (१४८३–१५२०) हे तीन इटालियन कलावंत काया वैज्ञानिकही कसे होते, ते थोडक्यात आणि जुन्या भाषापद्धतीत सांगितले आहे. त्याची सजोड या लेखाला आहे.

मिकेलांजलो घोककाम्या नसल्याने कोठेतरी वाचून कायाविज्ञानाचे नियम त्याला शिकायचे नव्हते. त्याने लिओनार्दो सारखीच स्वकष्टाने अनेक शवविच्छेदने केली आणि माणसाच्या शरीराचा प्रतिसाद आत्मसादात झाला पाहिजे, या करता तो जागरूक होता. माणसाच्या प्रत्येक हालचालीतील शरीराची ढब आणि ठेवण याची त्याने रेखाटने केली. पूर्वीच्या मास्टर्सना त्याने मागे टाकले आहे, असा त्याचा नावलौकिक तो वयाच्या तिशीत असतानाच झाला.

**दगडांच्या प्रेमात**

त्याचे असे झाले, नव्याने लौकिकाला आलेला मिकेलांजलो आणि लिओनार्दो हे १५०० साली दोघेही फ्लॉरेन्समध्ये होते. फ्लॉरेन्सवासीयांनी या दोघांवर फ्लॉरेन्सचा इतिहास नगरपालिकेच्या हॉलच्या भिंती चित्रित करण्याची जबाबदारी सोपवली. दोघे कामाला लागले. सगळे नगरवासी या दोघातला कोण जिंकतो, याची उत्कंठतेने वाट पाहात होते. हे सर्व नगरच कलाप्रेमी, कलासक्त, होते. पण हे भित्तीचित्र कधी पुरे झाले नाही. १५०६साली लिओनार्दोला मिलानला जावे लागले. त्या वेळचे पोप धार्मिक सत्ताढ्य, त्यांनी फतवा काढून मिकेलांजलोला रोमला बोलावून घेतले. पोप महाशयांना त्यांची मोठी कबर त्यांच्या हयातीतच बांधून घ्यावयाची होती. हे काम त्यांनी मिकेलांजलोवर सोपवले.

पण  नियतीचा डाव काही निराळाच होता. थडग्यासाठी संगमरवर आणण्याकरता 'कॅरारा' या संगमरावराच्या सुप्रसिद्ध खाणगावी त्याची रवानगी झाली. तो या खाणगावी सहा महिने

राहिला. दिवस रात्रीच्या प्रकाशात या शिळा बघून तो दगडांच्या प्रेमात पडला. प्रेमात पडल्याशिवाय मेंदूच्या छिन्नीला धार येत नाही. या शिळा पाहून 'प्रतिमावंत' आणि 'शब्दवंत' वेगवेगळ्या विश्वात राहतात, याची मिकेलांजलोची जाणीव सहा महिन्यात तीव्र झाली. अनेक शिळांमध्ये अनेक सुप्त आकृती मुक्त होण्यासाठी वाट पाहत होत्या, असे त्याला वाटले.

'मायकेलँजलोने आपली छिन्नी जणू लेखणीसारखी वापरली आहे' असे हेन्री मूर या जगप्रसिद्ध शिल्पकाराने म्हटले आहे. (दृक् चिंतनः प्रभाकर कोलते). ही खाण मिकेलांजलो करता संगमरवरी ग्रंथालय होते. व्यासंगासाठी कितीतरी 'ग्रंथांची' निवड करून तो रोमला परतला.

**निराशेतून नवा कोंभ**

रोमला आल्यावर त्याला कळले पोप महाशयांच्या योजना बदलेल्या आहेत. त्यांना आता जुने सेंट पीटर्स चर्च मोडून नवे बांधायचे होते. त्यांना स्वत:ची मोठी कबर बांधण्यात रस नव्हता. मिकेलांजलोची घोर निराशा झाली. त्याने त्याचा रोममधील स्टुडिओ बंद केला. आतल्या सगळ्या वस्तू विकून टाका अशी मदतनीसांना आज्ञा केली. ९० वॅगनलोड इतका मार्बल स्टोन तसाच सोडून दिला. त्याला उबग आला, किळस वाटली. तो ताबडतोब फ्लॉरेन्सला माघारी आला. त्याने पोपला उर्मट पत्र लिहिले, 'जर तुम्हाला मी हवा असेन, तर तुम्ही मला शोधत फ्लॉरेन्सला या.' पण पोप महाशय रागावले नाहीत. त्यांनी फ्लॉरेन्सच्या राजघराण्याशी वाटाघाटी सुरू केल्या. 'या तरुण कलावंताचे रोमला येण्यासाठी मन वळवा' असे पोपगुरुंनी सुचवले. फ्लॉरेन्स राजसत्तेला रोमच्या धर्मसत्तेशी पंगा घेणे परवडणारे नव्हते. मेडिची – राज-कुटुंबाने मिकेलांजलोला रोमला परत पाठवले. त्याच्या बरोबर एक पत्र दिले 'या तरुण चित्रवंताला कृपाळूपणे वागवा. तो अशा काही गोष्टी साध्य करेल, ज्यामुळे सर्व जग चकित होईल.'

रोमच्या वॅटिकन सिटीच्या सिस्टिन चॅपेलमध्ये पूर्वीच्या मास्टर्सनी भित्तीचित्रे रंगविली होती, पण घुमटाकार छत ओकेबोके होते. पोपने या छतावर बारा शिष्यांच्या बायबलमधील कथांची चित्रकारी करण्याचे आदेश दिले. 'मी शिल्पकार आहे चित्रकार नाही,' या त्याच्या सांगण्याला पोपने धूप घातली नाही. त्याने हाताखाली काम करायला काही सहकारी घेतले. पण एके दिवशी या सगळ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला, दरवाजे लावून घेतले आणि मिकेलांजलोने हे चित्रकर्म चार वर्षात (१५०८-१५१२) ५८०० चौरस फूट छतावर एक हाती पूर्ण केले. प्रथम त्याने कागदावर रेखाटने केली. परांची बांधलेल्या लाकडी फळ्यांवर उताणे पडून वर बघत अर्धगोलाकृती द्विमितीय पृष्ठभागावर एकहाती चित्रपट रंगवला. मिकेलांजलोची प्रज्ञा आणि प्रतिभा जगाला कळली आणि सगळे थक्क झाले. मेणबत्तीच्या धुराने ही चित्रे काळवंडली होती, १९८० मध्ये साफसफाई पूर्ण झाली. शिल्पसदृश ही चित्रे आहेत. चित्रातील नाट्यात्म भाव, नग्नकाया आणि मुद्रा यांचा सुमेळ, शिल्पसंयोजन केवळ अप्रतिम आहे. 'करारा' इथे पाहिलेल्या आणि मनात जपून ठेवलेल्या शिळा मिकालांजलोने या पटात जिवंत केल्या आहेत. जमिनीवर आडव्या पडलेल्या ॲडॅमला एका बोटाच्या स्पर्शक्षमतेने जिवंत करण्याचे मिकेलांजलोचे 'निर्मिती-चित्र' आज जगभर प्रसिद्ध आहे. या चॅपेलला अगदी थोड्या आणि अरुंद खिडक्या आहेत, या प्रकाशात मिकेलांजलोने जे काम केले, ते आज दर्शक प्रखर विजेच्या प्रकाशात बघतात आणि अचंबित होतात.

**पावलाचे रेखाटन**

सिस्टिन चॅपेलच्या छतावर चित्र काढण्याचे नावडते काम मिकेलांजलोवर सोपवले होते. त्याला पेंटिंगपेक्षा रेखाटनाची आवड होती. छत चित्राकरता त्याने अनेक रेखाटने केली त्यातील फक्त पन्नास सध्या उपलब्ध आहेत. २ फेब्रुवारी २०२६ रोजी एक विलक्षण घटना अमेरिकेत घडली. ५ इंच बाय ४ इंच लाल खडूने केलेले महिलेच्या पायाचे रेखाटन २७.२ मिलियन डॉलर्सला एका कला लिलावात विकले गेले. मिकेलांजलोने लिबिन सिबिल-'Libyn Sibyl' या महिला प्रॉफेटच्या पावलाचे १५०८-१५१२ या कालखंडात केलेले हे रेखाटन आहे. ही महिला प्रॉफेट चॅपेलच्या छतचित्रात आहे. साउथ करोलिना विद्यापीठातील आर्ट हिस्ट्रीच्या असिस्टंट प्रोफेसर ॲना स्वार्ट वूडहाऊस यांचा या घटनेवरील निबंध नुकताच वाचला. निरांजनी माहिती मिळाली.

कॉन्डिवी (१५२५-१५७४) या मिकेलांजलोच्या शिष्याने त्याच्याच मदतीने चरित्र लिहिले आहे. त्यात मिकेलांजलोने विनोदाने म्हटले आहे, 'मी शिल्पकार झालो, कारण मी अर्भक असताना मला स्तनपान देणारी दाई ही दगडफोड्याची मुलगी होती.'

या छत पेंटिंगचा त्याला खूप मानसिक त्रास झाला. उताणे पडून चित्र काढताना ब्रशमधून रंग सतत चेहऱ्यावर अंगावर ठिबकत असे, त्यावर त्याने एक कविता केली होती, बाजूला एक व्यंगचित्र काढले होते. त्यात त्याचे चिडचिडे आणि अस्वस्थ मन दिसून येते.

मिकेलांजलोच्या रेखाटनामुळे, रेखाटने हा महत्त्वाचा बौद्धिक, शोधक आणि निर्मितीक्षम व्यायाम आहे, अशी कलाजगतात मान्यता मिळाली. मिकेलांजलोचा चरित्रकार जॉर्जिओ वसारी (१५११-१५७४) याला 'कलेच्या इतिहासाचा बाप' असे म्हणतात, याने यासाठी 'Disegno' हा इटालियन शब्द वापरला आहे. याचा अर्थ नुसती रेखाचित्रे काढणे असा नसून, त्या सबंध चित्रकर्माचा मेंदूत आराखडा, आकृतीबंध तयार करणे. कागदावर रेखाटल्यावर तो संकल्पना आणि प्रत्यक्ष चित्रकर्म यांना जोडणारा पूल ठरतो. 'डीसिंन्यो' चित्रकर्मीला ईश्वरासारखी शक्ती देतो.

मिकेलांजलोने हातचा पंजा, पावले, डोळे आणि अवयवांचे निरनिराळे भाग आणि त्यांचे हावभाव, हालचाली, यांची अभ्यासात्मक रेखाटने केली. मानवी कायाविज्ञान आणि अभिजात कला यांचा सांधा ही रेखाटने जोडतात. मिकेलांजलोच्या 'डेविड' या चित्र-शिल्पात डेविड कॉन्ट्रापोस्टोमध्ये उभा आहे. यात शरीराचा वरचा मध्य भाग तोलताना, एक पाय रोवून उभा असतो, तर दुसरा पाय गुडघ्यात थोडा वाकलेला असून पाऊल चवड्यावर असते. त्यामुळे शरीराच्या वरच्या मध्य भागाला 's' शेप कर्व- म्हणजेच, इंग्रजी एस आकाराचा बाक प्राप्त होतो. यात शिल्प गतिमान आहे, असे भासते. मिकेलांजलोचे पायाच्या तसेच शरीराच्या स्नायूंचे आणि शिरांचे हे चित्रण पाहून काया वैज्ञानिक ॲनाटॉमिस्ट चकित व खूश होतात.

**कला आणि विज्ञान**


चित्रकला आणि विज्ञान यांची सांगड घालण्याच्या प्रयत्नांची सुरुवात सिग्मंड फ्रॉइड याने केली. लिओनार्दो आणि मिकेलांजलो यांच्या निर्मिती प्रक्रियेबाबतचे महत्त्वाचे शोधनिबंध फ्रॉइडने लिहिले. त्याच्या विषय-विवेचनाचा रचलेला कटाव पूर्ण गोल नव्हता. त्याच्या आळ्यात फक्त चित्रनिर्मिकाचा विचार होता, दर्शकाचा नव्हता. पण दर्शक कलाकृती बघत असताना त्याच्या मेंदूत काय घडते, याचा शोधविवेक केल्याशिवाय कलेचा चंद्रगोल पूर्ण होत नाही. पुढे मेंदूविज्ञानाने निर्मिक आणि दर्शक यांच्या मेंदूत काय घडते याचा सप्रयोग, आधुनिक तंत्राचा उपयोग करत वेध घेतला. हा शोधवेध अजूनही सुरू आहे आणि सुरू राहणार आहे.

सेमीर झेकी (१९४०-) हे ब्रिटिश आणि फ्रेंच न्युरो बायॉलॉजिस्ट-मेंदू जैववैज्ञानिक. यांच्या ऑक्सफर्ड विद्यापीठाने प्रकाशित 'इनर व्हिजन' या पुस्तकात मिकेलांजलो वर एक अर्धे प्रकरण आहे, त्याचा आधार पुढे घेतला आहे. विज्युअल ब्रेन-दृष्टी-मेंदूचे काम काय असते, या बाबतच्या नवीन संकल्पना समजून घेणे बोधक आहे. 'दृष्टी-मेंदू' हा शब्द महत्त्वाचा. यात डोळा, मेंदूतील दृष्टीकेंद्रे आणि यांच्याशी जोडलेली मेंदूतील इतर सर्व केंद्रे यांचा समावेश होतो. दृष्टी-मेंदूचे कार्य म्हणजे सभोवतालातून 'essentials' सारभूत घटकांचा-अत्यावशक घटकांचा शोध घेणे. डिजिटल भाषेत बोलायचे, तर याचा अर्थ भोवतालातून आत येणारा डेटा सूचिबद्ध करणे. मानवी मेंदू हे युगानुयुगे करत, उत्क्रांत होत आला आहे. या सगळ्याचा कलेशी काय संबंध असा प्रश्न पडणे सहाजिक. कला-दृश्यकला- चित्र-शिल्पकला ह्या कला दृष्टी-मेंदूच्या कार्याचे 'एक्सटेन्शन' - विस्तारित भाग आहेत असे मेंदूविज्ञान मानते.

महान कला वास्तवाचे नुसते बाह्यरूप दाखवत नाही, तर अनेक पैलू दाखवते आणि मेंदूचा अनेक 'एसेन्शिअल्स' जो शोध चालू असतो, त्याचे समाधान करते. ही महान कलेची मेंदूविज्ञानाची व्याख्या आहे, असे म्हणायला हरकत नाही. म्हणजे महान कलाकार फोलपटे काढून टाकतो आणि जे नित्य आहे, जे सारभूत घटक-एसेन्शिअल्स ते दाखवतो. मिकेलांजलोची शिल्पे, चित्रे अनेक दर्शकांना अनेक वर्षं आवडत राहतात, कारण अनेक दर्शकांच्या मेंदूचे एसेंशिअल्सच्या शोधाचे समाधान या कलाकृती करत असाव्यात. असे मेंदूविज्ञानाचे म्हणणे आहे.

**निर्मिकाच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव**

चित्रकाराच्या मानसिकतेचा परिणाम त्याच्या कलाकृतीवर होत असतो. हे दाखवण्याकरता याच पुस्तकात सेमीर झेकी यांनी मिकेलांजलोचे उदाहरण दिले आहे. कलेच्या इतिहासकारांच्या मते, मिकेलांजलो हा समलिंगप्रेमी, आजच्या भाषेत 'गे' होता. सेमीर झेकी यांच्या मते, त्याच्या या लैंगिकतेचा परिणाम त्याच्या शिल्पांवर दिसून येतो. पुरुषाच्या शरीराचे सूक्ष्म तपशील, नरकायेचे सौंदर्य, याचा प्रभाव त्याच्या





*मिकेलांजलोचे दोन अपूर्णांक : सेंट मॅथ्यू आणि डे ही दोन शिल्पे... जाणकार या कलाकृती अपूर्ण आहेत, असे मानतच नाहीत...*

या लैंगिक मानसिकतेमुळे त्याच्या 'दृष्टी मेंदूवर' झाला असणार. हा डेटा त्याच्या मेंदूने सूचिबद्ध करून ठेवला होता, तो त्याच्या शिल्पामध्ये पुरेपूर उतरला आहे. नरदेहाच्या हालचालीत असलेला सुडौल, घनता त्याने निर्मिलेल्या पुरुषांच्या शिल्पात बोलकी होतात. त्याची शिल्पे आणि चित्रे गतिमान वाटतात. याच्या तुलनेत त्याने निर्मिलेली स्त्री शिल्पे इतकी प्रभावी होत नाहीत. दर्शकाला मिकेलांजलोचे चरित्र माहीत नसले, तरी त्याने कोरलेली नरशिल्पे पाहून दर्शक प्रभावित होतो. कारण दर्शकाच्या दृष्टी मेंदूचा नरदेहाच्या 'एसेन्शियल्सचा' शोध मिकेलांजलोच्या शिल्पाने पूर्ण केलेला असतो. त्याचे 'द डाइंग स्लेव्ह' हे शिल्प पाहून याची कल्पना येते.

**अपूर्ण कलाकृती**

मिकेलांजलोने अनेक शिल्पे, पेंटिंग्ज, ड्रॉइंग्ज, अपूर्णावस्थेत ठेवली आहेत. सॅन मॅटिओ-सेंट मॅथ्यू आणि डे ही त्याची शिल्पे अनेक अपूर्णांकांपैकी दोन उदाहरणे. याचे स्पष्टीकरण कलेच्या इतिहासकारांनी दिलेले आहे. पण मेंदू वैज्ञानिकांनी त्याचा निराळा अन्वयार्थ लावला आहे. मेंदूला जास्त कल्पना क्षमता बहाल करण्यासाठी मिकेलांजलोने केलेली ही मेंदू विज्ञानीय युक्ती आहे. दर्शकाने ते शिल्प त्याच्या कल्पनेने पूर्ण करायचे आहे. त्या शिळेतील उरलेले सपाट पृष्ठभाग, संगमरवरी शिरा, त्या आकारहीन वास्तुमानाला, बेडौल जडत्वाला भावनेचा जिवंत डौल दर्शकाने त्याच्या दृष्टी-मेंदूने द्यावयाचा आहे. म्हणजे ते शिल्प दर्शकाच्या मेंदूत पुन्हा जन्म घेते.


मिकेलांजलो हा कवी होता. त्याने अनेक सुनिते लिहिली आहेत. त्यातील एकाचा आशय 'महानातल्या महान शिल्पकाराच्या मनात असा कोणताही विचार नाही, जो त्या संगमरवरी कवचात नाही. संगमरवराने त्यावर घातलेली मोहिनी, भंग करण्याचे काम मेंदू त्याचा नोकर, जो हात त्याच्याकडून करून घेतो.'

मिकेलांजलोने छिन्नीने अपूर्ण सोडलेली संगमरवरी शिळा जेव्हा दर्शक त्याच्या दृष्टी-मेंदूच्या कल्पना शक्तीने उकलतो, तेव्हा कलेचे वर्तुळ पूर्ण होते. 'शिळा मिकेलांजले मुक्त केली' असे वाटत राहते...

**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी हे मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट', 'अक्षर पाविजे निधरि', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) 'ऑर्वेलच्या अवतीभोवती' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत.**


**ई मेल :** drjoshianand628@gmail.com

# विस्मयकारी विरामचिन्हे!



अरुण नेरुरकर





*थॉमस कॅन्डी*



**एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या इंग्रज अधिकाऱ्यांनी मराठी भाषेचा उत्तम अभ्यास करुन, भाषेला प्रमाणबद्धता आणि व्याकरणिक शिस्त दिली त्यामध्ये, मेजर थॉमस कॅन्डी यांचे नाव आदराने घ्यावे लागेल. अशा या थॉमस कॅन्डी यांच्या एकशेपन्नासाव्या स्मृतिवर्षास २६ फेब्रुवारी २०२६ पासून प्रारंभ झाला आहे. या वर्षाचे औचित्य साधून मराठी संशोधन मंडळ, 'मराठी भाषेचा शिलेदार : थॉमस कॅन्डी' हा ग्रंथ प्रकाशित करणार आहे. त्यातील एक प्रकरण इथे साभार देत आहोत...**

विरामचिन्हे ही रूढिबद्ध (conventional) चिन्हे/प्रतीके असून, लेखक शब्दांद्वारे मांडत असलेला विचार वाचकांसमोर नेमकेपणा उलगडण्याचे महत्त्वाचे काम विरामचिन्हे करतात. वाद्यवृंदाचा संयोजक (conductor) आपल्या हातातील छडी (baton) विशिष्टप्रकारे हलवून गीतरचनेची लय कमीजास्त करतो. त्यामुळे रचना अधिक मधुर, अधिक श्रवणीय होते. गद्यलेखनालाही आपली अशी एक अंगभूत लय असते. ती, कळतनकळत, वाचकावर प्रभाव टाकत असते. यात, विरामचिन्हे मार्गदर्शकाच्या छडीचे काम बजावतात. गद्यलेखनाचा प्रवाह नियंत्रित करून, ते कसे वाचावे, याचा आदर्श वस्तुपाठ समोर ठेवतात.

विरामचिन्हांच्या साहित्यिक मूल्यांचा विचार करून, फाऊलर यांनी आपल्या 'दि किंगज् इंग्लिश' या पुस्तकात या तीन तत्त्वांचा पुरस्कार केला आहे:

१) विरामचिन्हांचा मुख्य उद्देश वाक्यांची व्याकरणिक रचना निर्देशित करणे हा आहे.

२) हा हेतू साध्य होईल तितक्याच प्रमाणात विरामचिन्हांचा वापर करावा आणि,

३) या चिन्हांचा उद्देश, मूळ लेखनात फेरफार करणे हा नसून, ते अधिक अर्थवाही, अधिक स्पष्ट करणे हा आहे.

विरामचिन्हांचे लिखित भाषेतील स्थान व महत्त्व यांचा विचार करायचा तर, भूतकाळात डोकावणे आवश्यक आहे. ख्रिस्तपूर्व सातवे ते पाचवे शतक या दरम्यानच्या काळात, ग्रीक आणि रोमन भाषांमधील कोरीव लेख आणि पपायरीमध्ये (पपायरसचे अनेकवचन), बिंदूंच्या माध्यमातून शब्द वेगळे केलेले आढळतात. जसे की, Wishing : you : a : merry : christmas.

आपण आज वापरत असलेल्या विरामचिन्हांचे जग व्यामिश्र आहे. चिन्हागणिक त्यांचे नियम आहेत. त्यांचे निश्चित स्थान आहे. ही चिन्हे कधी परस्पर-पूरक असतात, तर कधी, एकमेकांविरोधात उभी ठाकतात. अर्थात, त्यामुळे त्यांचे सहचर्य बाधित होत नाही. निरभ्र आकाश आपले लक्ष वेधून घेत नाही जितके की, तारेतारकांनी चमचमणारे. त्यात पुन्हा इंद्रधनुष्याचे रंग वेगळे, आकाशाला कवेत घेऊ पाहणारे. फुलांनी बहरलेले झाड नेहमीच जास्त आकर्षक वाटते. मोजके दागिने स्त्रीच्या सौंदर्यात भर घालतात. तद्‌वत, विरामचिन्हे लेखनाला स्पष्टता, सौंदर्य, सौष्ठव बहाल करतात. ते कसे वाचावे, कसे समजून घ्यावे हे सांगतात. लेखन अर्थवाही करण्यात विरामचिन्हांचे योगदान निर्विवाद असते. मात्र, विरामचिन्हांचा कौशल्यपूर्ण वापर करणे ही कष्टसाध्य कला आहे. प्रत्येक लेखकाची आपली अशी शैली असते. त्यात तो विरामचिन्हांचा सुनियोजित वापर करतो. अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या 'दि ओल्ड मॅन अँड द सी'चे उदाहरण घेऊ. यात, शब्दांचा वापर मितव्ययी आहे. वाक्ये छोटी आहेत. साहजिकच, पूर्णविरामांची रेलचेल आहे. साध्या सोप्या वाक्यातून हेमिंग्वे यांनी साध्याभोळ्या, पापभीरू सांतियागोची व्यक्तिरेखा समर्थपणे साकारली आहे. त्यामुळे, वाचकही सांतियागोच्या व्यक्तिरेखेशी तितक्याच सहजतेने तादात्म्य पावतो.

**अर्थपूर्ण विरामाची चिन्हे**

जगभरातील लेखकांनी विरामचिन्हांचा सुनिश्चित उपयोग करून आपले कथन अर्थपूर्ण केले आहे. इथे त्याच्या तपशिलात जाऊन विषयांतर करण्याचे प्रयोजन नाही. मात्र, विरामचिन्हांचा अर्थ उलगडणाऱ्या एका खास लेखाविषयी सांगणे आवश्यक वाटते.

साधना साप्ताहिकाच्या १० डिसेंबर २०२२च्या अंकात, कोल्हापूरचे सहदेव चौगुले-शिंदे यांनी, टी.एस्. एलियट यांच्या 'दि वेस्टलँड' या कवितेच्या शताब्दीवर्षाप्रीत्यर्थ, विशेष लेख लिहिला आहे. आपल्या या कवितेत, एलियट विरामचिन्हांचा वापर किती विचारपूर्वक करतो आणि स्वतःला अभिप्रेत असलेला अर्थ, तो वाचकांपर्यंत कसा पोहोचवतो याबाबतचे सुरेख रसग्रहण या लेखात वाचायला मिळते. ते असे :

''दत्त. दयध्वम. दम्यत.
शांती शांती शांती''

ते म्हणतात : बारीक नजरेने पाहिल्यास, असे लक्षात येते की या अवतरणातील पहिल्या ओळीतील प्रत्येक शब्दानंतर, एलियट यांनी पूर्णविराम दिला आहे. वाचकांनी हा संदेश गांभीर्यानी घ्यायला हवा, हे एलियट पूर्णविरामाच्या माध्यमातून सुचवू पाहात आहेत. तसेच, या अवतरणाच्या दुसऱ्या ओळीत, कोणतेही विरामचिन्ह वापरलेले नाही. विशेष म्हणजे, कविता संपूनही पूर्णविराम दिलेला नाही. याचे कारण, कविता संपली तरी तिचा विषय संपत नाही. दान, दया, दमन या संदेशाचे मनःपूर्वक पालन करून, प्रत्येकाने या जगात शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करायला हवा. अर्थात, असा प्रयत्नही नेहमीच अपूर्ण राहणारा असतो कारण, शांतीचा शोध अखंड आहे. कवितेचे रसग्रहण करताना, शिंदेसरांनी विरामचिन्हांचे

महत्त्व सुंदररीत्या अधोरेखित केले आहे. विरामचिन्हांविषयीचे असे स्पष्टीकरणात्मक लेखन मराठीत फारसे वाचायला मिळू नये ही बाब भाषासंपन्नतेसाठी अनुकूल नव्हे. तर, ते असो!

**विरामचिन्हांची त्रिमूर्ती**

आता, विरामचिन्हांच्या लेखनातील नियत भूमिकेसंबंधी थोडक्यात जाणून घेऊ.

पूर्णविराम : विरामचिन्हीकरण जगात, पूर्णविराम लाल (.) दिव्याची भूमिका बजावतो. तो वाक्याची सीमा निश्चित करतो. दोन पूर्ण विरामांच्या मध्ये येणारी चिन्हे, वाक्याचा अर्थ आणि अर्थबदल सूचित/स्पष्ट करतात. मात्र, त्यांच्यावर हुकूमत चालते ती पूर्णविरामाची. पूर्णविराम लेखनाला गती आणि शैली बहाल करतो.

अर्धविराम : अर्थसदृश असलेल्या दोन पूर्ण वाक्यांना (;) जोडण्याचे प्रमुख काम अर्धविराम पार पाडतात. याचे स्थान, स्वल्पविराम आणि पूर्णविराम या दोहोंच्या दरम्यान असून, ते मध्यस्थाची भूमिका बजावते. दोन लहान वाक्ये स्वतंत्रपणेही आपले अस्तित्व राखू शकतात. तरीही, कलात्मकदृष्ट्या, अवतरणचिन्हे हे सर्जनशील लेखकासाठी उपलब्ध असलेले उत्तम उपकरण आहे.

स्वल्पविराम : स्वल्पविराम हा लेखनाच्या मार्गातील (,) गतिरोधक आहे. आपल्या विराम घेण्याच्या क्षमतेमुळे, तो वाक्यातील चढउतार, लय, शैली नियंत्रित करतो. इंग्रजी comma हा शब्द ग्रीक komma (short clause) पासून तयार झाला आहे. हादेखील वाक्यात मध्यस्थाची भूमिका बजावतो. याचा योग्य उपयोग करू शकणाऱ्या लेखकाला, इतर कोणतीही चिन्हे गोंधळात टाकत नाहीत असे विधान हॅरी शॉ यांनी आपल्या 'Punctuate it Right' या पुस्तकात केले आहे.

पूर्णविराम, अर्धविराम आणि स्वल्पविराम ही तीन चिन्हे वाक्यरचनेतील आपली भूमिका जबाबदारीने पार पाडतात. अत्यंत महत्त्वाची अशी ही चिन्हे, कधी वाक्यांना विलग करतात तर कधी एकसंध. परस्पर-सहकार्याने ही चिन्हे, रचनेचा आशय समर्थपणे उलगडतात. त्यांच्या या गुणांमुळे त्यांना विरामचिन्हांच्या विश्वातील 'त्रिमूर्ती' असे संबोधले जाते.

ही झाली प्रमुख चिन्हे, आता, काही इतर चिन्हांची ओळख करून घेऊ.

**जादूगार चिन्हे**

अपूर्णविराम : कंस, अवतरणचिन्हे, संयोगचिन्हे, परिच्छेद (:) यांच्याप्रमाणे, अपूर्णविरामही लेखनाला अनोखा ढंग प्रदान करतात. त्याच्या गुणात्मक मूल्यात भर टाकतात. विशिष्ट शब्दांना/वाक्यांशाना प्रकाशझोतात आणतात. म्हणूनच, त्यांना विरामचिन्हांच्या जगातील जादूगार म्हटले जाते.

प्रश्नचिन्ह : या चिन्हाचा उपयोग प्रश्न विचारण्यासाठी, (?) ऐकणाऱ्याचे लक्ष वेधून घेण्यासाठी, एखादा मुद्दा ठसवण्यासाठी केला जातो. मात्र, याचा अतिरिक्त वापर हानिकारक असतो. याचा उपयोग लेखनाच्या सुरुवातीस केला जाऊ नये. तसे केल्यास, लेखक स्वतःच संभ्रमात आहे का, असा प्रश्न वाचकाला पडू शकतो. म्हणून, याचाही वापर सावधगिरीने करायला हवा.

उद्‌गारचिन्ह (!) : एफ. स्कॉट फित्‌जेराल्ड या सुप्रसिद्ध लेखकाने म्हटले होते : ''an exclamation mark is like laughing at your own joke.'' याचा अर्थ ते निरुपयोगी आहे असे नव्हे. प्रश्नचिन्हाप्रमाणे, याचेही स्वतःचे असे स्थान आहे. उपयोगिता आहे. आणि आवश्यकताही. याचा उपयोग काटकसरीने केला जावा. हेमिंग्वे यांच्या मते, उद्‌गारचिन्हे वाचकाला विश्वासात घेण्याचा त्याच्याशी सलगी साधण्याचा प्रयत्न करतात. 'दि ओल्ड मॅन् अँड द सी' ही कादंबरी गंभीर प्रकृतीची असल्यामुळे, या संपूर्ण कादंबरीत त्यांनी फक्त दोन वेळा उद्‌गारचिन्ह वापरले आहे. याउलट, एका कोळियाने या भाषांतरात, पु. ल. देशपांडे यांनी उद्‌गारचिन्हांचा सढळ (काही ठिकाणी दोन आणि तीनही) वापर केला आहे, जो कादंबरीच्या एकंदर प्रकृतीशी विपरीत आहे. उद्गारचिन्ह जास्त प्रभावशाली असल्याने, लक्ष जरा जास्तच वेधून घेत असल्याने, त्याचा वापर काळजीपूर्वक करायला हवा.

अवतरण चिन्हे (:) अवतरण चिन्हे तुतारीसारखी असतात. ती काही घोषित करू.

(' ' '' '') पाहतात. विरामचिन्हांच्या कुटुंबातील ही चिन्हे, सर्वाधिक खुलून दिसतात. बऱ्याच लेखनात दोन जगांचा समावेश असतो. गद्यलेखन आणि संवादलेखन. एकाच पुस्तकात आपले स्वतंत्र अस्तित्व जपत साहचर्याने नांदणाऱ्या या दोन जगांना अवतरणचिन्हे ठळकपणे समोर आणतात.

एकेरी आणि दुहेरी अशा दोन स्वरूपात वापरल्या जाणाऱ्या या चिन्हांचा प्रभावी वापर, फ्रान्झ काफ्का, फ्लॅनेरी-ओ-कॉनर, जॉन अपडायक आणि अन्य लेखकांनी आपल्या लेखनात केला आहे. याशिवाय, विरामचिन्हांचे काही अन्य

प्रकारही आज सर्वत्र वापरले जातात. मात्र, सुरुवातीस मराठीत आणि इंग्रजीतही, विरामचिन्हे नव्हती. इंग्रजीमध्ये विरामचिन्हांचा उपयोग, सर्वप्रथम, १४५५च्या बायबलमध्ये झाल्याचे आढळते. मात्र, यात अवतरणचिन्हांचा वापर सढळ होता. पुढे, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, बायबलच्या मराठी भाषांतरात, यांचा वापर करणे योग्य होईल का, या संदर्भात युरोपियन पंडितांमध्ये चर्चा झाली. मतमतांतरे झाली. मराठीतील विरामचिन्हांच्या इतिहासाच्या दृष्टीने, ही चर्चा निश्चितच महत्त्वाची आहे. 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती' या आपल्या प्रबंधात्मक ग्रंथाला (१९५६), कृ. भि. कुलकर्णी यांनीही या चर्चेची दखल घेतली आहे. वाचकांच्या उपयोगासाठी/माहितीसाठी ती पुढे देत आहोत.

**अवतरण चिन्हांभोवतीचे विवेचन**

या पंडितांपैकी एक, डि. झो. ॲलन यांनी अवतरणचिन्हे वापरू नयेत असे म्हटले होते. तर, 'इंग्रजीमध्ये वापरली जाणारी अवतरणचिन्हे मराठीतही त्याच पद्धतीने वापरली जावी' असे मत, आयसेनबर्ग यांनी व्यक्त केले होते. या मताला ह्युम, स्टीवनसन, मिचेल, जॉर्ज कँडी, नेसबिट आदी अभ्यासकांनी दुजोरा दिला होता. मराठी वाङ्मयाचे एक अभ्यासक, जॉन विल्सन यांनी, इंग्रजीसारखाच मराठीतही यांचा उपयोग व्हावा, असे आग्रही प्रतिपादन केले होते. मात्र, पहिल्या मराठी-इंग्रजी शब्दकोशाकरिता मोल्सवर्थ यांना सहकार्य करणारे थॉमस कँडी याकरिता अनुकूल नव्हते. त्यांनी म्हटले होते : ''ही चिन्हे पौर्वात्य भाषांच्या संपन्नतेला बाधा आणणारी असल्याने, त्यांचा उपयोग करणे मी निश्चितपणे टाळेन.''

थॉमस कँडी यांचा मराठी भाषेचा व्यासंग व त्यांनी लिहिलेली अनेक पुस्तके, मराठी भाषेच्या अभ्यासकांसाठी आजही उपयुक्त आहेत. मराठीमध्ये विरामचिन्हांचा अंतर्भाव करण्यासंबंधी बरीच साधकबाधक चर्चा झाल्यानंतर, १८५० मध्ये, थॉमस कँडी यांनी Marathi Punctuation- विरामचिन्हांची परिभाषा ही अवघ्या दहा पानांची पुस्तिका तयार केली. मराठी संशोधन मंडळाने आपल्या जुलै १९५७च्या तिमाही पत्रिकेमध्ये ती पुनर्मुद्रित केली आहे. अभ्यासकांना/जिज्ञासूंना ती सुलभतेने उपलब्ध व्हावी, यासाठी ही पुस्तिका पुढे (बरहुकूम) देत आहोत. कँडी यांनी या पुस्तिकेत फक्त पाच विरामचिन्हांचा वापर केला आहे. कालांतराने त्यात भर पडत गेली आणि आज शब्दांचे, वाक्यांचे विविध अर्थ ध्वनित/सूचित करण्यासाठी, अशा अनेक चिन्हांचा सुयोग्य वापर केला जातो.

''आपल्या मनातील विचार वाचकांसमोर नेमकेपणाने मांडण्यात विरामचिन्हे शब्दकळेपेक्षा जास्त महत्त्वाची भूमिका बजावतात असे रॉबर्ट ब्रिटेन (Brittain) यांनी आपल्या 'पंक्च्युएशन' (१९५०) या पुस्तकात म्हटले होते. खरे आहे. मागील दोनशे वर्षांत, आपल्या भाषेचे स्वरूप पूर्णतः बदलले आहे. भाषेचे हे अंगभूत वैशिष्ट्य असते. भाषा नेहमीच प्रगतिशील असते. प्रवाही असते. आपल्या या प्रवासादरम्यान, जुने काही सांडत आणि नवे गोळा करत, ती पुढे जात राहते. स्वतः संपन्न होते आणि ती बोलणाऱ्यांनाही संपन्न करते. मग, एखादा सर्जनशील लेखक, कल्पनारम्यतेच्या अवकाशात उत्तुंग भरारी घेतो. याचे एक उदाहरण देऊन थांबतो. विरामचिन्हांच्या मूळ उद्देशाव्यतिरिक्त, एका वेगळ्या, काहीशा मजेदार नजरेनेही त्यांच्याकडे पाहता येते, हे यियुन ली यांच्यासारख्या सर्जनशील लेखिकेच्या Apostrophe's Dream ही कथा वाचताना लक्षात येते. महान लेखक फ्रान्झ काफ्का यांच्या स्मृतिशताब्दीचे (१९२४-२०२४) औचित्य साधून, त्यांची स्मृती जागवणारे अनेक कार्यक्रम जगभरात साजरे करण्यात आले. काही खास पुस्तके प्रकाशित करण्यात आली. 'ए केज् वेन्ट इन् सर्च ऑफ ए बर्ड' हे त्यापैकी एक. काफ्का त्याच्या विशिष्ट लेखनशैलीसाठी ओळखला जातो. प्रस्तुत पुस्तकात, दहा लेखकांनी काफ्काशैलीत (kafkaesque) लिहिलेल्या कथा असून, यियुन ली यांच्या उपरोक्त कथेचा समावेश या संग्रहात आहे.

**स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची विरामचिन्हे**

छपाईसाठी खिळे (types) वापरले जात होते, त्या काळातील या कथेमधील व्यक्तिरेखा म्हणजे विरामचिन्हे. जुळणीकाराने (compositor) एका वेगळ्या पेटीत ठेवलेल्या विरामचिन्हांचे हे खिळे, अतिवापरामुळे घासून गुळगुळीत होण्याच्या अवस्थेत आहेत. त्यांचा वापर करताना ती काळजीपूर्वक तपासून घ्यावी लागतात. त्यांचे आवाज वेगवेगळे असले तरी, अवतार जवळपास सारखाच आहे, आणि मानसिकताही. त्यांच्या मनात एक शल्य डाचते आहे. वर्णाक्षरांच्या खिळ्यांपासून आपल्याला वेगळे ठेवले जाते, आपल्याला दुय्यम वागणूक दिली जाते, ही भावना त्यांना दुःखी करते आहे. विरामचिन्हे ही त्यांचे वाक्यातील स्थान, अचूकता आणि उद्देश यासाठी ओळखली जातात. मात्र त्यांच्या या

प्रतिमेला धक्का देणारे वर्तन जगाकडून घडत असते. अर्थात, जुळाऱ्याच्या पेटीत एकमेकांच्या सहवासात राहिल्यामुळे, त्यांचे परस्पर-संबंध सौहार्दपूर्ण आहेत. त्याआधारे, आपल्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी, ती एक सभा बोलावतात. मात्र बैठकीदरम्यान, ही विरामचिन्हे आपापल्या परीने जे काही सुचवतात, ते त्यांच्या वैयक्तिक भूमिकेला साजेसे असते. आता प्रत्येक विरामचिन्ह आपलेच घोडे पुढे दामटत आहे म्हटल्यावर, असा प्रस्ताव पुढे येता की, आपल्या सर्वांकडे एक कुटुंब म्हणून पाहिले जावे. जसे की, 'ए स्कूल ऑफ फिश', 'ए प्राइड ऑफ लायन्स', 'पार्लिमेंट ऑफ आऊल्स्', वगैरे. इथेही, प्रत्येक विरामचिन्ह आपलेच म्हणणे स्वीकारावे असा आग्रह धरते. शेवटी माणसांच्या सभेप्रमाणे, विरामचिन्हांची सभाही कोणत्याही निर्णयाप्रत न येता गुंडाळली जाते.

इंग्रजीमध्ये विरामचिन्हांवर काही रंजक पुस्तके उपलब्ध आहेत जी बव्हंशी, शैक्षणिक (academic) स्वरूपाची आहेत. मात्र, विरामचिन्हांची वैशिष्ट्ये अशा अनोख्या ढंगात कथारूपाने सादर करण्याची लेखिका यियुन ली (Yiyun Li) यांची कल्पना, त्यांच्या सर्जनशीलतेचे प्रतीक आहे. मी वर म्हटल्याप्रमाणे, भाषा समृद्ध होत जाते ती अशी.

इति पूर्णविराम.

**(आगामी ग्रंथातील विभाग : पाच मराठी भाषा आणि विरामचिन्हे यातील मजकूर)**

**अरुण नेरुरकर हे सेवानिवृत्त बँक अधिकारी, नावाजलेले भाषा अभ्यासक, भाषांतरकार आहेत. त्यांची 'थांग अथांगाचा', 'कवडश्यांचे जग', 'त्रयस्थ', (अल्बेर काम्यूच्या द आऊटसायडरचे भाषांतर), 'शब्दप्रभू मोल्सवर्थ' आदी पुस्तके प्रकाशित आहेत. संपर्क : ९८३३३ ९३००२**

## टिप् फुले टिप्

'टिप फुले टिप, टिप फुले टिप' दूरवरून आवाज आला केशवसुतांचा असावा. फुलांची पखरण रानोमाळ पसरली आहे, ती ज्ञानफुले आहेत ती टिप. टिपण या शब्दाचा आगळा अर्थ आज लागला. त्यातील एक जास्त आकर्षक वाटले ते टिपले. 'जैवविज्ञानातील कोणतीही गोष्ट उत्क्रांतीच्या प्रकाशात बघितल्या खेरीज अर्थपूर्ण वाटत नाही' ही संकल्पना Theodosius Dobzhansky (१९००-१९७५) या रशियन-अमेरिकन उत्क्रांतीवादी जैव वैज्ञाननिकाने मांडली, १९६४ साली एका व्याख्यानात. १९७३ साली अमेरिकन बायोलॉजी टिचर या पत्रिकेत ही संकल्पना व्यापकतेने स्पष्ट करणारा निबंध प्रकाशित झाला. आधुनिक जैवविज्ञानातील ही सगळ्यात व्हायरल झालेली संकल्पना आहे.

सजीवाचे जीवन अतिशय गुंतागुतीचे असते. त्याच्या शरीराच्या ठेवणी पासून त्याच्या वर्तनापर्यंत सर्व काही उत्क्रांत झालेले असते. या उत्क्रांतीच्या शर्यतीत काही तगून जातात, तर काही मागे पडतात. माणसाच्या प्रजातीमध्ये सुद्धा हा फरक दिसून येतो. आजचे आदिवासी बांधव या शर्यतीत मागे पडत आहेत का?

माणूस लाखो वर्षे शिकार करीत, फळे, कंदमुळे वेचीत जगत होता. दहा-बारा हजार वर्षापूर्वी माणूस शेती करू लागला. उत्क्रांतीच्या नजरेने पाहिल्यास शिकार करीत फळे कंदमुळे वेचीत, जगण्याची जीवन शैली आणि शेती करण्याची जीवन शैली याच्या संधिकालावर आदिवासी उभा आहे. भुई नांगरण्याची सुरुवात यांनी केली. प्रथमावस्थेतील, आदि, बुजरी, तृणधान्ये भुईतून यांनी वर काढली.

आज आदिवासींची मुलेबाळे कुपोषित आहेत, प्रौढ आदिवासीही कुपोषित आहे. आदिवासीची सरासरी अपेक्षित आयुर्मर्यादा नागरी भारतीयापेक्षा चार वर्षांनी कमी आहे. उत्क्रांतीच्या नैसर्गिक निवडीने-नॅचरल सिलेक्शनने आदिवासींकडे दुर्लक्ष केलेले दिसते. असे का, कसे आणि कधी घडले हे उत्क्रांतीच्या प्रकाशात तपासले पाहिजे आणि या त्रुटी समाजाने भरून काढल्या पाहिजेत.

**- टिपक**

(टिपणाचा संदर्भ : उपजत स्त्रीवादाचे आदिस्थान, सुमित्रा वसावे, आमंत्रित संपादकीय, समतावादी मुक्त संवाद पत्रिका, मार्च २०२६)

# घरंदाज लयकारीचा आर्त नजराणा



गणेश मनोहर कुलकर्णी

सुरानुबंध



*अब्दुल करीम खाँसाहेब*



*के.एल. सैगल*



*चित्रा आणि जगजित सिंग*



*किशोरी अमोणकर*



*पं. भीमसेन जोशी*

पिया बिन आवत नाहीं चैन हे गाणं सैगलही गातात आणि अब्दुल करीम खाँसाहेबही गातात. अब्दुल करीम खाँसाहेब हे किराणा घराण्याचे अध्वर्यू. सैगल कोणीतरी सांगितलेली चाल गातात. 'बाबुल मोरा'सारखी सैगलची ठुमरी आणि त्या काळी इतरांनी गायलेली तीच ठुमरी यांत तुम्हाला म्हणावा, असा फरक आढळून येत नाही. तंत्रज्ञान त्यांना एकत्र आणतं. नव्हे, साडेतीन मिनिटांची मर्यादा दोघांना खूप जवळ आणत राहते...

पूर्वीच्या काळात पाश्चात्त्य देशांमध्ये संगीत विकलं जाऊ शकत असे, छापलंही जात असे. बेथोवेन (१७७०-१८२७), मोत्झार्ट (१७५६-१७९१), बाख (१६८५ ते १७५०) यांनी संगीत लिहिलं, की प्रकाशक ते छापून प्रकाशित करत असे. छापील प्रती विकल्या, वाटल्या जात असत. अशा तऱ्हेनं ते विखुरलं जायचं. लोक ते विकत घेत असत आणि घरी जाऊन वाजवत असत. संगीत विकणं शक्य होतं. ओझावा सारखा जपानचा प्रसिद्ध म्युझिक कंडक्टर म्हणतो, की ज्यावेळी त्याच्याकडे संगीत ऐकण्यासाठी लागणारी साधने घेण्याची ऐपत नव्हती, तेव्हा तो चक्क या अशा तऱ्हेच्या छापील नोटेशन वाचूनच त्या संगीताचा आनंद घ्यायचा. ओझावा आणि जपानी प्रसिद्ध लेखक मुराकामी यांच्या संवादाचं एक अप्रतिम पुस्तक (Absolutely Music-ॲब्सोल्युटली म्युझिक) आहे. आपल्याकडे असंच 'रंगभास्कर' नावाचं पुस्तक भास्कर चंदावरकर यांच्या संवादातून तयार झालं आहे. अर्थात ते अनेकांच्या बरोबर केलेल्या संवादातून आणि वेळी-अवेळी दिलेल्या व्याख्यानातून सिद्ध झाले आहे.

'ॲब्सोल्युटली म्युझिक' या पुस्तकात मुराकामी एके ठिकाणी म्हणतात, की माझं लेखन प्रसिद्ध होण्याच्या मागे माझ्या शब्दांना असलेली अंतर्गत लयच कारणीभूत आहे. मी लिहिताना माझ्या शब्दांतून उमटत असलेल्या नादावरच माझं लक्षं केंद्रित असतं. आपल्या भैरप्पांनी 'मंद्र'सारखी संगीत विषयावर बृहद् कादंबरी लिहिताना रीतसर संगीताची शिकवणी लावली होती, असे ऐकिवात आहे. गाणं शिकून मैफली वगैरे गाजवण्यापेक्षा संगीतावर लिहिताना त्यातला अचूकपणा साधता यावा, हीच त्यांची अपेक्षा असणार.

**राग गहाण**

पण, आपल्याकडे एखाद्या नरसी भगत किंवा बाबूखान यांची आठवण काढली जाते, तर त्यांनी राग गहाण टाकले होते, असं म्हणतात. नरसी भगतला पैसे हवे होते. तेव्हा त्याने एक राग कोणाकडे तरी गहाण टाकून पैसे घेतले आणि ते परत करेपर्यंत तो राग गाणार नाही, असं सांगितलं. मग प्रत्यक्ष देवालाच हा राग ऐकायचा होता. देवानेच पैसे देऊन हा राग सोडवला, अशी दंतकथा त्याला जोडून आहे. बाबूखान नावाचे एक इंदोरचे बीनवादक खूप दारू प्यायचे. ते आपली बीन नेहमी दलालाकडे गहाण टाकायचे. एखादा कार्यक्रम आला, की जो बिदागी देणारा असेल त्याला सांगायचे की, त्या दलालाकडे पैसे देऊन बीन सोडवून आण, मग मी ती वाजवतो. असं त्या काळात इतपतच व्यापारीपण होतं. राजांच्या दरबारात जे मोठे, बुजुर्ग कलाकार असायचे, ते दरबारात यायचे-जायचे. पण गायची सक्ती त्यांच्यावर अजिबात नसे. नायक या माणसाने कधीही संगीताचा धंदा करायचा नाही, अशी त्याला अट असायची. त्याशिवाय त्याला नायकत्व मिळायचं नाही. गायक-वादक जे असायचे, त्यांना एकदा जमीन दिलेली असायची. तनखा म्हणून वर्षाला किंवा महिन्याला देणारे लोक ते मिरासी, धाडी म्हणजे खालच्या स्तरावरची माणसं समजली जायची. राजस्थानी लोकगायकांना वर्षाला बलुतं मिळायचं, अन्नधान्य-शिधा वगैरे. दरबारी गवयांनी मात्र शिधा वगैरे घ्यायचा नाही, अशा अटी होत्या.

**सर्वव्यापी स्वर्गीय लयकारी**

तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे संगीताच्या प्रसारात निश्चितच फरक झाला. उदाहरणार्थ, बारुआंनी तयार केलेल्या देवदास (१९३६)मधील जी गाणी आहेत, त्यांपैकी के.एल.सैगलनी (१९०४ ते १९४६) गायलेली 'दुखके दिन अब बीतत नाहीं' वगैरे जी गाणी आहेत, त्या गाण्यांमध्ये आणि त्या काळात दिलेल्या शास्त्रीय संगीताच्या ध्वनिमुद्रिकांमध्ये तुम्हाला फरक कमी दिसेल. 'पिया बिन आवत नाहीं चैन' हे गाणं सैगलही गातात आणि अब्दुल करीम खाँसाहेबही गातात. सैगल कोणीतरी सांगितलेली चाल गातात. 'बाबुल मोरा'सारखी सैगलची ठुमरी आणि त्या काळी इतरांनी गायलेली तीच ठुमरी यांत तुम्हाला म्हणावा, असा फरक आढळून येणार नाही. तंत्रज्ञान त्यांना एकत्र आणतं. नव्हे, साडेतीन मिनिटांची मर्यादा दोघांना खूप जवळ आणत राहते.

अब्दुल करीम खाँसाहेब हे किराणा घराण्याचे अध्वर्यू. खाँसाहेब सुरूवातीला रेकॉर्डिंग करूच द्यायचे नाहीत. त्यांना भीती वाटायची की, समोरचा माइक आणि त्याला जोडलेल्या वायर आपला आवाज खाऊन टाकतील, नष्ट करून टाकतील. जे कमवायला त्यांनी आयुष्यभर कष्ट घेतले आहेत.

दिल्लीतील प्रसिद्ध गायिका शैला धर या इंदिरा गांधींचे सचिव पी.एन.धर यांच्या पत्नी आणि किराणा घराण्याच्या गायिका. यांच्या मातुल घराण्यात एक उस्ताद किंवा पंडित नित्यनेमाने गाणं शिकवायला घरी यायचे. यांना वयाच्या योग्य टप्प्यावर मोठमोठ्या दिग्गज गायक वादकांच्या सहवासाने गाण्याकडे बघण्याची एक समजदार दृष्टी मिळाली.

यांच्या वडिलांनी म्हणजे माथूर यांनी उस्ताद बडे गुलाम अली खाँसाहेबांचं गाणं रेडिओवर व्हावं म्हणून बऱ्याच लटपटी खटपटी

केल्या, तेव्हा कुठे फार मुश्किलीने ते रेकॉर्डिंगला तयार झाले. खाँसाहेबांचं गाणं व्हावं म्हणून संपूर्ण घर शाकाहारी असतानाही त्यांना मांसाहारी जेवण देण्याची व्यवस्था केली गेली. खाँसाहेब म्हणायचे, माझ्या प्रत्येक सुराला कबाबचा गंध आहे. यांच्या घरी तमाम दिग्गज गायक, वादक मुक्कामाला असायचे. बऱ्याच उत्तम कलाकारांचा सहवास सुरूवातीला लाभल्याने गाण्याकडे बघण्याची माझी दृष्टीच बदलली असं या शैला धर त्यांच्या 'Raga'n Josh' या पुस्तकात म्हणतात.

प्रसिद्ध सारंगी वादक बुंदु खाँ तर त्यांच्या घरचे असल्यासारखेच वावरले. त्यांची तितकीच कदर ठेवण्याची घरातल्या सर्वांनाच सूचना दिलेल्या होत्या. दर रविवारी ते दिवसभर येऊन सारंगी वाजवायचे, घरातील जो गाणं शिकायला तयार असेल त्याला गाणं शिकवायचे, कुणीच नसलं तर रियाज करत बसायचे. एकदा अचानक घरच्या लक्षात आलं, की खाँसाहेब कुठे दिसत नाहीत. घरचे सगळेच शोधायला लागले, कुठेच सापडेनात. इतक्यात यांच्या वडिलांना अलवार असे सारंगीचे सूर बागेतून ऐकू यायला लागले. हे सगळे त्या दिशेने गेले, तर डोळे मिटून खाँसाहेब आपल्या छातीवर सारंगी ठेवून बहार राग मंदपणे छेडत बसलेले. जमिनीवर हलकी मंद सुवासिक निळ्या जांभळ्या रंगाची, गोड वाटाण्याची (लॅथिरस ओडोरेटस) फुले पसरलेली. खाँसाहेबांना या तंद्रीतून बाहेर कसे आणावे, याच विवंचनेत पाच-दहा मिनिटे गेली. अचानक खाँसाहेबांना जाणवलं, की भोवताली कुणीतरी आलंय, त्यांनी डोळे उघडले, तर पायाशी बरीच मंडळी गोळा झालेली. हे म्हणाले, काय झाले, तुम्ही इतकी गर्दी करून का उभे आहात. अरे, वसंताचे आगमन झालेय ना, म्हणून फुलांसमोर मी माझी सेवा रुजू करतोय.

कलावंत किती संवेदनशील असतात, याचं यापेक्षा दुसरं कुठलंही उदाहरण नसेल. म्हणजे या परिवाराशी बुंदु खाँसाहेबांचे आत्मीय संबंध जुळले होते. फाळणीच्या काळात सगळेच उलटे पालटे होऊन गेले. यांच्या परिवारातील हयात मंडळी पाकिस्तानात निघून गेली, हे एकटे पडत गेले. दरम्यान यांनाही आपल्या परिवाराकडे परतण्याची ओढ लागली. लेखिकेच्या वडिलांनी सरकार दरबारी वजन खर्च करून यांना परत पाठविण्याची व्यवस्था केली. यांना जाताना आपला ट्रान्झिस्टर सोबत घेऊन जायचा होता, एका विशेष परवानगी अंतर्गत त्यांना नेऊ दिला गेला. यथावकाश त्यांचे तिथेच देहावसान झाले.

एक- दोन ओळींचे पत्र अनेक वर्षांनी तेही बऱ्याच काळाने लेखिकेच्या वडिलांना मिळाले होते. पहिल्या ओळीत त्यांनी केलेल्या मदतीचा अगदी प्रेमपूर्वक उल्लेख केला होता, दुसऱ्या ओळीत चक्क मी माझा 'मालकंस' तुला सोपवत आहे, असा उल्लेख केला होता आणि पुढे मालकंसचे सगळे नोटेशन लिहून पाठवलेले होते. वडिलांचे डोळे कधी भरून आले तेच कळले नाहीः आयुष्यभर जीवापाड जपलेली बंदिश, रियाजाच्या तपस्येने सिध्द केलेला राग, ज्यानं आपल्या समग्र जगण्यालाच तोलून धरलेलं आहे, तो रागच कुणाला तरी भेट म्हणून द्यायचा, ही कल्पनाच अद्भुत आहे.

वसंत ऋतूशी पिवळ्या रंगाचं अतुट नातं जुळलेलं आहे, या काळात निसर्गाचा नकळत पिवळ्या फुलांचाच फुलोरा फुललेला असतो. उस्ताद विलायतखान लहानपणी आपल्या वडिलांचं वादन ऐकता ऐकता तिथल्या सोफ्यावरच झोपून गेले. उठल्यावर अब्बांना म्हणाले, 'मैं निंद मे पिले रंग मे खो गया था,' अब्बा म्हणाले, 'बेटा वह रंग नहीं थे, तुमने तो साक्षात बसंत के दर्शन कर लिये हैं...'

**सुरांची आर्तता**

या सगळ्या दिग्गज गायकांना तबकडीमध्ये बंदिस्त करण्याचे त्या काळात अतोनात प्रयत्न केले गेले, ही मंडळी स्वतंत्र, स्वतःचं गाणं गायचे, मात्र सैगल कोणीतरी सांगितलेली चाल गातात. नवीन येणारे सगळे गायक सुरूवातीला सैगलच्या दर्दभऱ्या सुरांनी इतके भारावून गेलेले, की सगळे तसंच गाणं गायचा प्रयत्न करायचे. सैगलने गझल गाताना भावविष्कार महत्त्वाचा मानला आणि ठुमरी चक्क भावगीतासारखी गायली. १९३३ नंतर सैगल पृष्ठभागावर आलेले. लाहोरमध्ये १९३७ साली सैगलने गायलेल्या एका अप्रतिम मैफलीचे वर्णन प्राण नेव्हील या लेखकाने त्यांच्या 'लाहोर' पुस्तकात केले आहे. सैगल यांनी पर्शियन, उर्दू, बंगाली, हिंदी आणि पंजाबी या भाषेतली गाणीही गायली आहेत. त्या काळातील फैय्याज खान, अब्दुल करीम खाँ, पंडित ओंकारनाथ ठाकूर यांसारख्या दिग्गज शास्त्रीय गायकांनी कुंदनलाल सैगल यांच्या प्रतिभेचे कौतुक केले होते, कारण सैगल यांनी कोणतीही औपचारिक तालीम न घेता संगीतातील बारकावे आत्मसात केले होते. सैगल यांनी संगीताचे कोणतेही पद्धतशीर शिक्षण घेतले नव्हते; त्यांनी केवळ ऐकून आणि सरावाने ही कला आत्मसात केली होती. लहानपणी आईबरोबर सैगल सलमान युसुफ नावाच्या सूफी अवलियाकडे नित्यनेमाने जायचे. गाणं हा त्यांचा छंद होता. काही दिवस सैगलने रेल्वेत



*नवाब वाजिद अली शाहने लखनौ आणि आप्तांचा विरह सहन न होऊन 'बाबुल मोरा' ही बंदिश रचली... या बंदिशीला दिग्गजांनी अमरत्व मिळवून दिले...*

टाइमकिपरची नोकरीही केली होती, हा दुवा माझ्यापर्यंत येऊन जुळणारा. आर.सी. बोराल, तिमिर बरन आणि पंकज मल्लिक यांसारख्या महान संगीतकारांनी त्यांच्या आवाजातील खोली आणि आवाजाचा पल्ला (range) पाहून आश्चर्य व्यक्त केले होते.

सोलापुरातील विजापूर रस्त्यावर झोपडपट्टीत राहणाऱ्या मल्लाप्पा अंकलगी हे सैगलचे प्रचंड चाहते, त्या झोपडीवजा चाळीतली त्यांची भिंत त्याही काळात जुन्या रेकॉर्डनी व्यापली होती. सैगलला याची देही याची डोळा बघितल्याचा मनस्वी आनंद त्यांच्या चेहऱ्यावर झळकत असायचा. स्मरणशक्ती शेवटपर्यंत तल्लख, पाचसहा फुटांवरूनही ते नेमकी रेकॉर्ड ओळखायचे. सैगलच्या 'बाबुल मोरा'ने नेहमीच हळवे होणाऱ्या, संपूर्ण अभावात जगणाऱ्या मल्लपांच्या व्यासंगाने रेकॉर्ड कलेक्ट करणारी सोलापुरातील राळेरासकर वगैरे मंडळी दिपून गेलेली. आपल्याकडच्या अनेक दुर्मिळ ध्वनिमुद्रिका त्यांनी त्यांच्या संस्थेसाठी दिल्या. एकदा मल्लप्पा म्हणूनही गेले, साहेब घरापर्यंत नळ आणून द्या आणि या सगळ्या रेकॉर्डस् घेऊन जा, पण ही करूणा या मंडळींच्या आत झिरपलीच नाही, ही व्यथा राळेरासकरांनी स्वतःच नोंदवलेली आहे.

तर सांगत हे होतो, दिल्लीतील अशोक चोप्रा नावाचा अवलिया या 'बाबुल मोरा'च्या प्रेमातच पडला ही बंदिश १८५७च्या बंडानंतर लखनौचा नबाब वजिद अली शाह याला इंग्रजांनी लखनौहून दूर करून कलकत्त्याला नेऊन नजर कैदेत ठेवले, तेव्हा आपल्या प्रियजनांच्या विरहात रचलेली आहे. याची पहिली दखल हिंदी चित्रपटात कुंदनलाल सैगलच्या आवाजात, रायचंद बोरालच्या संगीताने घेतली होती (स्ट्रीट सिंगर-१९३८). त्यावेळी सैगलने ते रस्त्यावर चालतच गायले होते. कारण पार्श्वसंगीतात आधुनिक तंत्रज्ञान अजून विकसित व्हायचे होते. त्यावेळी सैगलचाही उतरता काळ होता, दारूचं व्यसन प्रचंड प्रमाणात वाढलेलं, त्यामुळे त्यावेळी त्या गाण्यात सैगलचं अवघं दुःख उतरलेलं होतं.

हीच बंदिश नंतर अनेक शास्त्रीय गायकांनी मैफलीच्या अखेरीस भैरवी रागात घ्यायला सुरुवात केली. पंडित भीमसेन जोशींनी त्याला एक वेगळंच वलय प्राप्त करून दिलं. त्यानंतर किशोरीताईंनी तर कमालच करून ठेवली आहे, जगजित-चित्राने ते चित्रपटात गायल्याने या ठुमरीचे दिवसच पालटले. दिल्लीतील अशोक चोप्रानी ही ठुमरी कुणी कुणी गायली, याच शोध घ्यायला सुरुवात केली, तर २५ एक जणांची नावं सापडली. प्रत्येकाचं रेकॉर्डिंग जमवलं, त्यावर तांत्रिक सोपस्कार करून त्याची एक सी.डी. तयार केली. ही सी.डी.माझ्या संग्रहात आहे! यात पं भीमसेन, किशोरीताई, सैगलपासून सगळे २५ जण आहेत. सैगल सुरूवातीला आणि शेवटी आहे. मी विचारलं असं का? ते म्हणाले, मी सैगलप्रेमीच आहे व त्यांनी गायलेल्या गाण्यापासूनच माझ्या या उपक्रमाला सुरुवात झाली होती. गेली कैक वर्षे मी हे काम करत होतो. गाणं उपलब्ध होतं, पण ते सी.डी.वर येण्यासाठी लागणाऱ्या तांत्रिक अडचणी खूप होत्या.

यादरम्यान मी तलत मेहमूद यांच्या संपर्कात होतो. त्यांना हे सगळं दाखवून मी विचारलं की तुमच्या मते, यात सर्वात उत्तम कुणी गायलं असावं, तर ते माझ्या मनातलंच म्हणाले, 'अरे नैहर तो सैगल की ही तो छुटी थी' त्यामुळे त्यांच्या आवाजात जो दर्द, जी करूणा आहे, ती कुणाच्यात नाही!

**(क्रमशः)**


**गणेश मनोहर कुलकर्णी प्रसिद्ध ललितलेखक, कला आस्वादक आहेत. त्यांच्या 'रूळानुबंध' या लेख संग्रहाला अलीकडेच राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.**
**संपर्क : ९८१९९५७८५२**

# कोलाहलाच्या तुकड्यांचा कोलाज



डॉ. नेहा सावंत

काव्यगत संवाद




*कवी वर्जेश सोलंकी*

**स**न २००२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'वर्जेश ईश्वरलाल सोलंकीच्या कविता' या संग्रहाने काव्यप्रांतात वर्जेश सोलंकी या नावाची अमीट मुद्रा उमटवली. ततपप, वेरविखेर यासारखे काव्यसंग्रह तसेच पेरूगन मुरूगन (कादंबरिका), हुसेनभाय और गणपतभाय व्हाया अमेरिका (कथासंग्रह), दीड दमडीना (आत्मपर लेखन) असे वैविध्यपूर्ण लेखन त्याने अल्पावधीत प्रकाशित केलं. सध्या गुजराती भाषेतील नामवंत कवींच्या गुजराती कविता मराठीत अनुवादित करण्याचे भरीव काम करीत आहे. हा त्याचा साहित्यिक प्रवास थक्क करणारा असला तरी त्याचा मूळ पिंड हा कवीचाच आहे, हे नाकारता येत नाही...

**१९९०**-९१ चा काळ. मुंबई महानगरातील जोगेश्वरीसारख्या छोट्या उपनगरातून मी विरारमधील आगाशी या गावात स्थायिक व्हायला गेले. तेव्हा तिथलं वातावरण निसर्गसंपन्न होतं, पण वाळू माफियांचा हैदोस, टँकर पाणी माफियांच्या दहशतीचं वातावरण होतं. त्याच्या विरोधात हरित वसई सुरक्षेसाठी फादर फ्रान्सिस दिब्रिटो, विवेक पंडित यासारख्या मंडळींनी चळवळ उभारली होती. तर, दुसरीकडे संपूर्ण विश्वात जागतिकीकरणाचा विळखा पडत होता. निसर्गसंपन्न वसई विरारला सांस्कृतिक आणि साहित्यिकदृष्ट्या अधिक संपन्न करण्यासाठी फादर फ्रान्सिस दिब्रिटो 'सुवार्ता' या नियतकालिकाचे संपादक या भूमिकेतून वेगवेगळे उपक्रम राबवत होते. मीही नुकतीच लिहायला लागले होते, कथालेखन, काव्यलेखन स्पर्धेतून भाग घेत होते. अशा वेळी फादर फ्रान्सिस दिब्रिटोंनी एका नवोदित कवीची ओळख करून दिली. जन्माने गुजराती असलेला, नुकतेच महाविद्यालयीन शिक्षण संपवून पोटापाण्याच्या सोयीसाठी मुंबईत नोकरीसाठी धडपड करीत होता. वरकरणी लाजराबुजरा, कावराबावरा वाटणारा, पण आपल्यातल्या कवीला वेगळ्याच अनुभूतीतून घडवणारा. कळत-नकळत त्याच्याशी स्नेहबंध जुळले गेले. त्याच्या कितीतरी कवितांची पारायण माझ्या घरी होत होती. आपल्या आगळ्या वेगळ्या काव्यशैलीतून तो लक्ष वेधून घेत होता. तो म्हणजे, कविमित्र वर्जेश सोलंकी.

महानगरीय जाणीव, आत्मशोध, नवे तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरण यामुळे झालेली संभ्रमित अवस्था, भांबावलेपण, माणसाचे वस्तुवत जगणे ही त्याच्या कवितेची काही आशयसूत्रे सांगता येतात. कवी वसंत आबाजी डहाके, विलास सारंग, सतीश काळसेकर, अरुण कोलटकर यांच्या प्रभावातून त्याची कविता घडत होती, घडता घडता तो स्वतःची वेगळी वाटही शोधत होता. समकालीन घडामोडींचे पडसाद त्याच्या कवितेतून उमटत होते. पुढे त्याची कविता अधिक विकसित होत गेली. आधुनिकतावाद आणि उत्तर आधुनिकतावादाच्या काही खाणाखुणाही त्याच्या कवितेत डोकावू लागल्या. हे त्याच्या कवी म्हणून प्रगल्भतेकडे होणाऱ्या वाटचालीचं द्योतक होतं. एकीकडे आपण कितीही म्हणत असलो, की भारतात अजून पुरेसा, पुरता आधुनिकतावाद आलेला नाही. सामाजिक आणि संस्कृतिक, सार्वत्रिक जगण्यात जरी उत्तर आधुनिकतावादी जाणिवा दिसत नसल्या, तरी एखाद्याच्या व्यक्तिगत जाणिवेत आणि नेणिवेत उत्तर आधुनिकतावादी विचार काही अंशी रुजलेले असू शकतात, ते त्याच्या अभिव्यक्तीतून उमटू शकतात, हे नाकारता येत नाहीत. म्हणूनच 'काहीच प्रिंट हीत नसलेल्या दिवसांतून' या त्याच्या दीर्घ कवितेवर प्रकाशझोत टाकणार आहे.

**आत्मलक्ष्यी ते समष्टीलक्ष्यी**

कवितेची सुरूवातच काहीशी नैराश्य जाणीव करून देणारी आहे. आयुष्यात काहीच घडत नाहीये, काळाचा, जात धर्माचा कसलाच संदर्भ जोडता येत नाहीये, हे कवीच्या आत्मलक्ष्यी मनोगतातून व्यक्त होत आहे. आपल्या अस्तित्वाविषयी तो संभ्रमित झालेला आहे, ही संभ्रमावस्था पूर्ण कवितेलाच व्यापून उरलेली आहे. हे अस्तित्वाचे प्रश्न तो आजच्या काळातील कॉर्पोरेट क्षेत्रात, बँकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कोड ऑफ कंडक्ट, बारकोड, स्कॅन लेबल इ. शब्दप्रतिमांमधून अधोरेखित करतोय. इतकेच नाही, तर आपली अगतिकता, लाचारी, निरर्थकता नाकाबंदी, उतरवलेली नथ, मारली गेलीय या लैंगिक प्रतिमांमधून व्यक्त झालेली दिसते. दिलेल्या चौकटीतील आखीव बेतीव जगणं निरर्थकपणे, निरूद्देश जगणं अधोरेखित करणाऱ्या आध्यात्मिक, ऐतिहासिक, दैनंदिन जीवनातील अनेक वस्तूंची जंत्री कवी देतो. उदा.-वॉशिंग मशीन, डिओड्रंट, परफ्यूम, शॅम्पू , स्क्रॅब टोनर, लोशनबाम इ. चंगळवादात गुरफटत जाणाऱ्या जीवनाच्या प्रतिमांची यादीच नोंदवत जातो. महानगरीय जीवनातील विस्कळीत वास्तव किंवा विखुरलेले वर्तमानाचे संदर्भ सांगण्यासाठी तशीच विस्कळीत शब्दशैली योजलेली दिसते.

*हीच तुझी खरीखोटी तुझी डाळरोटी*
*हीच तुझी दारू पान गुटका चुना कात तंबाखू*
*हीच तुझी पुण्याई विटेवरची विठाई*
*हेच तुझं अन्न तुझं कदान्न*
*हाच तुझा परवरदिगार चहाची वाफ सिगार चारमिनार*
*हाच तुझा अफु गांजा हेरॉईन वोडका*
*भांग नवसागर हलाहल अमृत*
*हीच तुझी ज्वाला थंडाई हाथ की सफाई कानखुजली गांडखुजली*

**संपूर्ण कविता वाचण्यासाठी पुढील लिंकवर क्लिक करा.**
**https://heyzine.com/flip-book/18783c1d8b.html**

सर्वसामान्य माणसाची महानगरातली जीवनशैली व्यक्त केली आहे. त्या जीवनात काहीच आनंद, उत्साह नाही. व्यसनांच्या विळख्यात गुरफटलेली तरूणपिढी, निरूद्देश जगणारी माणसं कवी टिपत जातो. इतकंच नाही तर रेडिओ, दूरदर्शन, चित्रपटक्षेत्र, साहित्यक्षेत्र या सगळ्यांचे उल्लेख तो करतो, पण कुठेच काही घडत नाहीये, कंटाळवाणेपण तो नोंदवत राहतो.

*मज्जा मज्जा ज्याम मज्जा मज्जा ज्याम मज्जा मज्जा*
*जोशी मन्या दिवटे हेमंत वाघ सलील बांदेकर प्रवीण*
*काळे मंगेश काळे अरुण वसईकर नसलेला गणेश*
*अभिधानंतर खेळबिळ दर्शनविर्शन वेधशब्दवेध*
*चित्रे कोलटकर गुर्जर डहाके सारंग ओक मन्या परब तुळशी*
*ढसाळ नेमाडे देशीवाण देशी वॉर देशी माल देशी बार*
*परंपरा नवता सौदर्यवाद कलावाद उत्तरआधुनिकता चौथी नवता*
*तूही कंची यत्ता?*

वरील ओळींमधून, मर्ढेकर परंपरेतील दुसऱ्या, तिसऱ्या पिढीचा उल्लेख करून काव्यक्षेत्राचा मागोवा घेतो, पण शेवटी नामदेव ढसाळांच्या काव्यसंग्रहाचा उल्लेख मात्र स्वत:लाच प्रश्न विचारून, या पिढ्यांमध्ये तुझी यत्ता कोणती आहे, तुझं स्थान काय आहे असा संभ्रम व्यक्त करतो.

साहित्य, संगीत, कला, राजकारण, व्यावहारिक जीवन इ. पण कोणत्याच क्षेत्रात त्याला संगती लावता येत नाही, सगळे विखुरलेले तुकडे त्याला जाणवत राहतात. नव्हे, अशा विखुरलेल्या तुकड्या तुकड्यांनीच माणूस जगतोय ही अस्वस्थता तो व्यक्त करतो. जागतिकीकरणाच्या रेट्यात आपण गुरफटत चालल्याची जाणीव वर्जेशला अस्वस्थ करते. पण त्या अस्वस्थतेविषयी तो कोणतीही भूमिका घेत नाही. किंवा व्यवस्थेला नकारही देत नाही. कोणत्याही गोष्टीची चिकित्सा करण्याची, विशिष्ट पवित्रा घेण्याची जोखीम तो पत्करत नसला तरीही, आडपडदा न ठेवता केवळ वस्तुस्थिती मांडत राहण्याचे धैर्य तो राखून असतो.

**एकतर्फी जगण्याचा वेध**

महानगरीय जीवनात चंगळवाद, भौतिकसुखाची आस किती प्रमाणात वाढली आहे, पण ते जीवन नाकारताही येत नाही. मुंबई महानगरातले पाण्याचे प्रश्न, जेवणाचे प्रश्न, अपुरी जागा, त्या जागेत हरवलेलं प्रणय भावनेतील स्वातंत्र्य आणि आनंदही हरवलेला या साऱ्या गोष्टी सर्वसामान्य माणूस नेहमीच अनुभवत असतो. एकूणच आजच्या काळातलं जगणं हे कृत्रिम आणि यांत्रिक होत चालल्याची जाणीव वर्जेशच्या कवितेतून व्यक्त होते. जीवनातल्या कोणत्याच प्रसंगात किंवा अनुभवात उत्तेजकता राहिलेली नाही. सगळं जगणंच वरवरचं कृत्रिम होत चाललेलं आहे. दैनंदिन जीवनातल्या घडामोडी असतील किंवा अगदी प्रणय भावनेसारखी तरल भावनाही असेल पण त्यातही उत्स्फूर्तता राहिलेली नाही; तर हे सारं जगणं एकतर्फी किंवा एकेरी झालेलं आहे त्याविषयीचा त्रागा तो पुढील शब्दांत व्यक्त करतो–

*हीच तुझी सोसायटी तुझं कासमोपॉलीटीन वर्ल्ड*
*उचल बादली मार कल्टी भर पाणी ऊठ रात्री*
*आवर जेवण मिन्टात गुंडाळ लुंगीतल्या लुंगीत सेक्स सेकन्दात*
*पाद जोरात दे ढेकर शतपावली करताकरता*
*अजमाव जगाची हालचाल तानापिहिनीपाजा*

*जागतिकीकरणाचा प्रभाव सर्वच क्षेत्रावर पडत चालला आहे, त्यातून ग्राहक संस्कृती वाढीला लागली आहे. आणि माणूसही आता वस्तुवत होत चालला आहे, याची जाणीवही तो पुढील शब्दात करून देतो–*

*नवा रिंगटोन नवी स्कीम नवा पॅकेज*
*नवं माध्यम नवी क्रान्ती नवी लाइफस्टाईल*
*शॉपर शॉप डॉमिनोज पिझ्झा मॅकडोनाल्ड*
*विजय सेल्स नवा मॉल चायना बजार*

जागतिकीकरणामुळे केवळ महानगरातच नव्हे तर वैश्विक पातळीवरही उलथापालथ होतेय, युद्धाचे पडसाद उमटत चालले आहेत याचीही जाणीव कवी करून देतो.

जागतिकीकणातील नव्या तंत्रज्ञानामुळे सुबत्ता आली आर्थिक सामाजिक सांस्कृतिक विकास होऊ लागला परंतु त्याच बरोबर आपल्या ज्या जुन्या परंपरा आहेत, जी जुनी मूल्ये आहेत, ती नाहीशी होतील की काय, त्या साऱ्याचा विनाश होईल की काय, ही भीती देखील निर्माण झाली. मूल्य ऱ्हास, संवेदनशून्यता प्रत्ययाला येऊ लागली. हा ऱ्हास आपण टाळू शकत नाही किंवा यातून आपल्याला सुटताही येणार नाही, अशा नव्या आणि जुन्याच्या संघर्षात तरुण पिढी घुसमटू लागली. एक प्रकारचे दुभंगलेपण अस्थिरता निर्माण झाली, त्यातून ही पिढी अस्वस्थ होऊ लागली म्हणूनच हे सतत बदलत

राहणारे जीवन अस्थिर स्वरूपाचे तुकड्या तुकड्यांनी, विरोधाभासाने बनलेले आहे, अशी जाणीव वर्जेश सोलंकी प्रमाणेच हेमंत दिवटे, मन्या जोशी, सचिन केतकर यांच्या कवितेत प्रकर्षाने व्यक्त झालेली दिसते.

*इस्लामिक आक्रमकता अमेरिकेची दादागिरी पाकिस्तानच्या उंगल्या*

*ओला सुका दुष्काळ नद्यांना आलेला पूर*

*वाहून गेलेली खेडी शेतं माणसं जनावरं*

*ऑनलाईन बघ इराकचा सुपडा साफ होताना*

*ऑनलाईन बघ अतिरेक्यांचा हैदोस संसदेवर हल्ला*

*लोकशाही देश असलेल्या राष्ट्रपतींचं प्रजासत्ताक दिनी असलेलं*

*टिपिकल बुलेटप्रूफ भाषण ऑनलाईन बघ*

वरील ओळी वाचल्यावर महाराष्ट्रात, देशात, जगात जे काही चाललंय त्यापासून कवी अनभिज्ञ नाही, हे आकळते. पण या साऱ्यावर तो कोणतीच प्रतिक्रिया नोंदवित नाही. काहीसा तटस्थ, त्रयस्थ राहून साऱ्या घटितांचे कोरडेपणाने निवेदन करीत जातो. म्हणूनच या कवितेवर उत्तर आधुनिकतावादाचा काहीसा प्रभाव आहे, असे जाणवत राहते.

**उत्तर आधुनिकवादी जाणिवांचा पट**

आधुनिकता आणि उत्तर आधुनिकता या पाश्चात्य संस्कृतीच्या दोन महत्त्वपूर्ण अवस्था आहेत, असे मानले जाते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पहिल्या महायुद्धाच्या आसपास आधुनिकतावादाचा प्रभाव सर्वच क्षेत्रावर झालेला होता. आधुनिकतावाद ही औद्योगिकीकरण, लोकशाही, शासन व्यवस्था, व्यक्तिवाद व मानवी विवेक यांना केंद्रस्थानी ठेवणारी चळवळ होती; परंतु १९६० च्या दरम्यान आधुनिकता वादामध्ये असणारे अंतर्विरोध स्पष्ट होऊ लागले, उदाहरणार्थ; मानवी स्वातंत्र्य मुक्तीच्या नावाखाली हुकूमशाही दडपशाही यावर प्रतिक्रिया म्हणून उत्तर आधुनिकतावाद निर्माण झाला. वर्जेशच्या या कवितेत या विचारांची झलक प्रत्ययाला येते. आपण कुणाच्या तरी हातातले बाहुले आहोत, आपले अगदी रोजच्या जगण्यातले साधे साधे व्यवहारही कुणाच्या तरी आज्ञेवर अवलंबून आहेत, आपण गुलाम आहोत, ही अस्वस्थ करणारी जाणीव तो व्यक्त करताना म्हणतो–

*डाऊनलोड कर बॉसनी भोसडलेलं भोसडता भोसडता*

*पोटात मळमळून आल्याची जाणीव डाऊनलोड कर*

*इरेझ कर पेस्ट कर संडासात बस पकडून नळ*

*हळूहळू ऐक श्वासाची लय वरखाली खालीवर होत गेलेली*

*हगता हगता रिसीव्ह कर आलेला कॉल*

*Solanki, boss is calling u, where r u now?*

*contact immediately*

*मॅगी टू मिनिटसारखं घेतो आपण आवरते.*

*नोकरी सलामत तो संडास पचासबार, बडबडत*

*उभे राहतो पुन्हा नळाच्याच आधारानेच*

*(सोलंकी तेरा कुछ खरा नहीं)*

*पकड साल्या ग्यारा नंबरची बस हो रफादफा*

*या काहीच प्रिंट होत नसलेल्या दिवसांतून*

१९६०च्या दरम्यान भांडवलशाहीचे स्वरूप बदलत गेले त्यातून भोगवादी चंगळवादी व ग्राहकवादी वृत्ती बळावत गेली या साऱ्याचा परिपाक म्हणजेच जागतिकीकरणानंतर बळावत गेलेला उत्तर आधुनिकतावादी विचार. यांचा प्रभाव आणि परिणाम मराठी साहित्यावरही होत होता, विशेषतः काही मराठी कवींच्या कवितांवर. वर्जेश सोलंकीची कविता ही याच प्रभावातली दिसून येते.

'काहीच प्रिंट होत नसलेल्या दिवसांतून' या कवितेवर केवळ उत्तर आधुनिकतावादाचाच प्रभाव जाणवतो असे नाही, तर अस्तित्ववादी जाणीवही व्यक्त झालेली दिसते. आशय, अभिव्यक्ती, आविष्कृती अशा अनेक अर्थाने ही कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली दिसते.

**कवितेचा दुस्तर घाट**

या कवितेला एकच एक असे केंद्र नाही, त्यामुळे ही कविता अनेककेंद्री अन् बहुआवाजी आहे. कवितेत एकच एक आशयसूत्र नसल्यामुळे सहाजिकच तिची रचना दीर्घ झालेली दिसते. यात रचनेचेही वैविध्य दिसून येते. कधी ती स्वगतासारखी होते, तर कधी ती एफएम चॅनलवरील हिंदी निवेदनासारखी, तर कधी वृत्तपत्रातील बातमी सारखी, कधी केवळ जंत्रीरूप धारण करते. तर कधी एकूणच मानवी जीवन कसे तुकड्या तुकड्यात विखुरलेले आहे, याची कवी जाणीव करून देतो. या विखुरलेपणाच्या अनंत छटा कवितेत जागोजागी दिसून येतात, अशा विचारांच्या मालिकेमुळेच कवितेला दीर्घत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. वर्तमानाचे, वर्तमानकालातील घटितांचे विविध संदर्भ ही कविता देते,

यादृष्टीने ती वास्तववादी कविता ठरते.

वरवर पाहता या कवितेतील एका ओळीचा दुसऱ्या ओळीशी काही संबंध आहे असे वाटत नाही. या ओळींमध्ये आजच्या वर्तमानाचे तुकडेच विखुरलेले दिसतात. आजच्या वर्तमानातील परस्पर विरोधी किंवा विसंगत, वैविध्यपूर्ण घटितांच्या जंत्रीच वर्जेश देतोय, असे वाटते, पण तेच या कवितेचे वैशिष्ट्य आहे. या घटितांना, या जंत्रीला अंत नाही. निरुद्देश आणि असंगतीपूर्ण अशी विविध संदर्भांची यादी वाढतच जाणारी आहे, म्हणूनच कवितेला स्वाभाविकपणे दीर्घत्व प्राप्त झालेले दिसते.

**मुक्त काव्यशैली**

गद्यप्राय मुक्तशैली हा या कवितेचा विशेष म्हणता येईल. स्वतःशीच आंतरिक संवाद साधल्यासारखी त्याची कविता साकारते, त्यामुळे वाचकाच्या मनाला ती सहज भिडते, ही कविता वाचताना विशेषत्वाने प्रकर्षाला येते, की हा कवी केवळ प्रश्नचिन्ह वगळता कोणत्याही विरामचिन्हांचा वापर करीत नाही. मनात उमटणारे प्रश्नच त्याला अधोरेखित करावेसे वाटतात. कवीला भंजाळून टाकणाऱ्या विचारांची दाटी आणि त्यांचा वेग दाखविण्यासाठी तर ही विरामचिन्हे टाळली नसावित ना? असा प्रश्न मनात येतो. आणि त्याच्या सूचकतेचं कौतुक वाटतं.

*हीच तुझी मातीवाळूपाषाणखडकरेतीकोळसापाणी*

असं म्हणताना माती, वाळू पाणी इ. घटकांतील निरर्थकता, अर्थशून्यता व्यक्त करण्यासाठी तो सलग एकरेषीय स्वल्प विरामाचाही वापर न करता रचना करतो.

*सटसटासटफटफटाफटखटखटाखटपटपटापट*

*फोर टू का वन वन टू का फोर*

या निरर्थक नादानकारी शब्दरचनेवर वसंत आबाजी डहाके यांच्या 'योगभ्रष्ट' कवितेतील काव्यशैलीचा प्रभाव दिसून येतो. शिवाय उत्तर आधुनिकतावादी दृष्टीतून रूपहीनतेचा गौरव करण्याची वृत्ती दिसून येते.

*व्हाइट ॲण्ड ब्लॅक*
*ब्लॅक*
*ब्लॅक*
*ब्लॅक*
*ब्लॅन्क*
*बॅन्क*

महानगरीय जीवनातील विस्कळीत वास्तव किंवा विखुरलेले वर्तमानाचे संदर्भ सांगण्यासाठी तशीच विस्कळीत शब्दशैली योजना केलेली दिसते, म्हणूनच अनेकदा एका शब्दाचा दुसऱ्या शब्दाशी किंवा एका संदर्भाचा दुसऱ्या संदर्भात तसा संबंध असलेला दिसत नाही. उदाहरणार्थ;

*काळाकाळाकाळा पडदा पडदा काळाकाळाकाळा*

*स्क्रीन काळी काळा कावळा काळी शाई काळी मुळाक्षरं*

*काळी माती काळी घागर काळी संध्याकाळ काळा माणूस*

*काळे पाणी काळी आणीबाणी काळे दिवस काळा अंधार*

*काळी रेघ काळी हॉटसीट काळे प्रश्न काळी बँक काळा चेक*

वरील शब्दप्रयोग तो करतो, त्यावेळेला अर्थाअर्थी एकमेकांचा काही संबंध नसला तरी हे सगळे शब्द आजच्या जीवनाचे निदर्शक आहेत, हेच सूचित होते. शिवाय वरील ओळींवर वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेचा थेट प्रभाव जाणवतो. उदाहरणार्थ डहाक्यांची विशेषणे ही कविता पाहता येईल. उदा.–

*मी हजार काळी कमळे, काळ्यादेवाला वाहिली.*

*काळा दिवस मावळला?*

**काव्यभाषेचे वैविध्यपूर्ण प्रयोग**

वर्जेशच्या या कवितेचे खास वैशिष्ट्य म्हणजे, वर्जेशने केलेले भाषेचे वैविध्यपूर्ण प्रयोग. संगणकीय भाषा, एसएमएसची भाषा, बंबैय्या टपोरी बोली, जाहिरातींची भाषा, बंबैया हिंदी भाषा, वृत्तपत्रीय भाषा, एफएम रेडिओवरील भाषा इ. या भाषेतील शब्दांची योजना पाहता, ते केवळ कवितेतील शब्द नसून त्या शब्द प्रतिमा म्हणूनच आलेल्या दिसतात. या शब्दप्रतिमांमधून समकालीन महानगरीय जीवनातले माणसाचे यंत्रवत, वस्तुवत विस्कळीत जगणेच सूचित करतात. या वैविध्यपूर्ण प्रतिमांमुळे कवितेतील आशय अधिक व्यामिश्र झालेला दिसतो.

**महानगरीय बोली**

वर्जेशची कविता महानगरीय जीवनातील अनुभव व्यक्त करणारी असल्यामुळे, त्या अनुभवाला साजेशी अशी महानगरीय बोलीचे उपयोजन करतो. म्हणजेच बंबैया

बोलीतील, हिंदी इंग्रजी मिश्रित शब्द तो सहजपणे कवितेत रिचवतो. जागतिकीकरणानंतर मराठी भाषेवर जो परिणाम झाला त्याचेच प्रत्यंतर वर्जेशच्या कवितेतून वारंवार जाणवते. उदाहरणार्थ; कॉर्पोरेट क्षेत्रातील भाषा किंवा आधुनिक तंत्रज्ञानाची भाषा, माहिती तंत्रज्ञान व संगणकीय वापरातले शब्द तो आपल्या अभिव्यक्तीसाठी अनेकदा प्रतिमांच्या रूपातून वापरताना दिसतो. महानगरीय जीवन व्यक्त करताना महानगरीय तरुणाईची हिंदी मिश्रित बोली वापरतो.

उदा.

*पोलम पोल पतली गली हटा सावन की घटा बाबाजी का घंटा*

याच बरोबरीने आधुनिक लैंगिक अपशब्द, ग्राम्यतादर्शक (अपशब्द) ही सहजतेने योजतो. अर्थातच निष्क्रिय, व्यसनाधीन झालेल्या, वाममार्गाकडे झुकलेल्या तरुणाईला उद्देशून शाब्दिक प्रतिमा योजलेल्या दिसतात.

उदा. करू पांडू, लिंबू चुख्या, पीठमळ्या, भोंगा

फाईट, गांडखुजली इत्यादी

या कवितेचे विशेष महत्त्व म्हणजे, २००९ मध्ये ततपप या संग्रहात छापून आली तेव्हाची परिस्थिती आणि आजची २०२६ या काळातली परिस्थिती बदललेली नाही. चंगळवाद, ग्राहकवाद, भोगवाद, जागतिक युद्ध या आणि अशा कितीतरी आवर्तात आपण भोवंडत आहोतच, ही सणसणीत जाणीव ही कविता करून देते. म्हणूनच कालसापेक्षतेच्या, कालनिरपेक्षतेच्या सीमा ओलांडून समकालीन किंबहुना सार्वकालिक होऊन जाते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

एकंदरीत कवितेतील आशय व त्याला साजेशी अभिव्यक्ती, महानगरीय जीवनाचे, वैश्विक जीवनाचे भान देणारी शब्दकळा व भाषाभिव्यक्ती यामुळे ही कविता समकाळाचे समग्र दर्शन घडविण्यात यशस्वी झालेली दिसते.

**संदर्भ**


**१. सोलंकी वर्जेश – ततपप, प्रकाशक–हेमंत दिवटे, अभिधानंतर आणि पोएट्रीवाला, कांदिवली – पूर्व.**

**२. मालशे मिलिंद, जोशी अशोक – आधुनिक समीक्षा – सिद्धांत, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, मौज प्रकाशन गृह, मुंबई**


**३. अभिधानंतर दिवाळी २००६.**



**डॉ. नेहा सावंत अंधेरी–मुंबई येथील भवन्स महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी कुपारी बोलीतील साहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएच.डी. मिळवली असून, लेखन, शब्दांकन, संपादन, अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन आदी क्षेत्रात त्या सक्रिय राहिल्या आहेत.**

**संपर्क** : nehasawant603@gmail.com







**कुणबी, गाव आणि वेळीप यांची वास्तविकता**
प्रतापसिंह वेळीप काणकर
किंमत २५०/-




**काळीज उसवलं**
उदय नरसिंह म्हांबरो
अनुवाद : पौर्णिमा केरकर
किंमत २००/-




**आरशातल्या आरशात**
डॉ. सुधीर देवरे
किंमत २२५/-




**दक्षिणायन**
किशोर अर्जुन
किंमत : २५०/-




**नामदेव साळुबाई ढसाळ**
मोतीराम कटारे
किंमत २२५/-




**यांगोन यात्रा**
डॉ. मिलिंद जोशी
किंमत २००/-

सहित

**आपली प्रत आजच नोंदवा**
७०३० ९९००८१
९९६० ३७४७३९


@SAHITPRAKASHAN

# एका योजनेचं इतिवृत्त



अनुवाद : सुमती जोशी

**मूळ कथा: नलिनाक्ष भट्टाचार्य** **बंग नाद**



**लघुकथेची खुमारी काही औरच असते. त्यातही लघुकथेची मूळ भाषा बंगाली असेल, तर ती कथा बंगालच्या मातीचा आणि त्या मातीत फुलणाऱ्या मानवी नातेसंबंधांचा गंध घेऊनच अवतरते. त्यात त्या नातेसंबंधातून आलेली लय असते, नादही असतो. ही लय आणि हा नाद कधी वाचकाला धक्का देतो, कधी अंतर्मुख करतो, तर कधी बुचकाळ्यातही पाडतो. बंगाली भाषेचे सौंदर्य यात असतेच, पण त्या त्या लेखक-लेखिकेची दृष्टी वाचकांचे भानही विस्तारते. अशाच काही निवडक कथांचा हा भावानुवाद...**

**१५** ऑगस्टच्या सकाळी पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून जाहीर केलं. पुढच्या महिन्यापासून आदिवासींना सहजतेने धान्य उपलब्ध व्हावं म्हणून ते एक नवीन योजना सुरु करणार होते.

दुसऱ्या दिवशी कृषी भवनात या योजनेच्या संदर्भात एक उच्चस्तरीय मिटिंग झाली. त्यात खाद्य सचिवांनी आकडेमोड करून दाखवून दिलं– सरकारी गुदामात जे धान्य आहे, त्यातून लाखो आदिवासींना सतत स्वस्तात गहू–तांदूळ वाटणं शक्य होणार नाही. खाद्यमंत्र्यांनी सचिवाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत नियम जाहीर केला. पुढच्या महिन्यापासून राज्य सरकार प्रत्येक आदिवासी कुटुंबाला दहा किलो तांदूळ आणि वीस किलो गहू यांचं वाटप करेल. फूड कॉर्पोरेशनच्या गुदामांमधून स्वस्त धान्य विक्री करणाऱ्या दुकानांकडे सुयोग्य किमतीत धान्य पाठवले जाईल आणि त्या दुकानांमधून आदिवासी दोन रुपये किलो, या दराने तांदूळ आणि गहू खरेदी करू शकतील.

या योजनेसाठी राखून ठेवलेलं धान्य काळा बाजार करणाऱ्यांच्या हाती जाऊ नये, म्हणून खाद्यमंत्र्यांनी एक निर्णय घेतला. प्रत्येक आदिवासीला तीन महिन्यांच्या आत स्वत:चं ओळखपत्र सादर करावं लागेल. कित्येक लाख लॅमिनेटेड ओळखपत्र तयार करायचं जबरदस्त काँट्रॅक्ट अर्थातच खाद्यमंत्र्यांच्या मेहुण्याला मिळालं. जावईबापूंच्या कृपाशीर्वादामुळे बँकेतून बिनव्याजी कर्ज आणि जपानहून पोलारॉइड कॅमेऱ्याचे लायसेन्स मिळवायला मेहुण्यांना कोणतीही तोशीस पडली नाही. ओळखपत्रावर आदिवासींचा फोटो लावण्यासाठीच हा विदेशी महागडा कॅमेरा आवश्यक होता.

विशाल खाद्यमंत्र्यांचा कारकून नथुराम याला या नवीन योजनेचा किंचितही लाभ झाला नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून फक्त आदेश आला. आठ कलमी विशिष्ट निर्देश नोंदवून नवीन फाइल्स तयार करा. त्यात प्रत्येक आदिवासीला दिलेल्या धान्याच्या नोंदी करून दर महिन्याला त्या फाइल्स खाद्य मंत्रालयाकडे पाठवा.

बघता बघता चार महिने उलटून गेले. परंतु अगदी मोजक्या राज्यांकडून नथुरामकडे उत्तरं आली. आपल्यावर सोपवलेली जबाबदारी पार पडावी, म्हणून नथुरामने टेलिग्राम पाठवले, पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. तेव्हा नथुरामने त्याच्या फाइलीत नोंद केली. पंतप्रधानांनी जाहीर केलेली योजना यशस्वी व्हावी म्हणून प्रत्येक राज्याच्या खाद्य सचिवांना दिल्लीत बोलावून घेऊन एक सभा आयोजित करावी. नथुरामचे वरिष्ठ अधिकारी मिस्टर वर्मा. त्यांनी ती फाइल खाली पाठवून दिली आणि त्यांच्या हाताखालच्या कर्मचाऱ्याला आठवण करून दिली. अर्थमंत्रालयाच्या आदेशानुसार मिटिंग, कॉन्फरन्स शक्य होईल तितक्या कमी करणं आवश्यक आहे.

**दोन**

जवळजवळ सहा महिन्यांनी पंतप्रधानांनी अचानक आदिवासी पुष्टीकरण योजनेची पुन्हा एकदा घोषणा केली. पंतप्रधानांच्या ऑफिसमधून अवचित बातमी आली, ते पुढच्या महिन्यात आदिवासींची वस्ती असलेल्या पूर्वेकडच्या प्रदेशात फेरफटका मारायला जाणार होते आणि म्हणूनच त्यांची योजना त्या भागात कितपत यशस्वी झालीय, हे त्यांना आजमावायचं होतं. नथुरामने फाइल उघडून पाहिली, तेव्हा पूर्व प्रदेशातून आदिवासींना धान्य वाटप केल्याची कोणतीही आकडेवारी त्याला आढळली नाही. त्यामुळे या विषयाची चर्चा करण्यासाठी खाद्य सचिवाच्या ऑफिसमध्ये एक अत्यावश्यक मिटिंग बोलावली गेली. मिटिंगमध्ये एकमताने ठराव पास झाला, तीन सदस्यांच्या एका समितीने पूर्व प्रदेशात जाऊन सगळी आकडेवारी गोळा करून पंतप्रधानांची योजना सफल होतेय का, ते बघावं. सात दिवसांनी या समितीचे सदस्य परत आले आणि त्यांनी तीस पानी रिपोर्ट सादर केला. तो रिपोर्ट अंगावर काटा आणणारा होता. त्या रिपोर्टवरून स्पष्ट झालं, मुंडा, ओराओ इत्यादी आदिवासींना पंतप्रधानांच्या खाद्य योजनेचा काहीही लाभ झाला नव्हता, कारण रेशनच्या दुकानांचे मालक, जिल्हा खाद्य ऑफिसातले अधिकारी आणि गहू–तांदूळ या धान्यांचे व्यापारी यांच्या संगनमताने आदिवासींसाठी राखून ठेवलेले तांदूळ, गहू खुल्या बाजारात जास्त दराने विकले जात होते.

आदिवासींचे स्थानिक नेते होते. आदिवासी त्यांना 'महातो' या नावाने संबोधत. तेसुद्धा या षड्यंत्रात सामील झाले होते. 'अळीमिळी गुपचिळी' राखल्याची बक्षिसी म्हणून षड्यंत्र करणारांकडून त्यांनाही गहू–तांदूळ मिळाले. सगळ्यात गंमतीचा भाग म्हणजे, खाद्यमंत्र्यांचा मेहुणा सहा महिन्यांच्या मुदतीत आदिवासींना परिचयपत्र देऊ शकला नाही, कारण अजूनही जपानहून पोलरॉइड कॅमेरा भारतापर्यंत पोचला नव्हता.

मिस्टर वर्मा यांना बोलावून घेऊन खाद्य सचिव म्हणाले, 'पंतप्रधानांना हा भयावह रिपोर्ट दाखवता येणार नाही. पूर्व प्रदेशाच्या खाद्य सचिवाशी मी आत्ताच फोनवर बोलून घेतो. पंतप्रधान तिथे पोचायच्या आधी या परिस्थितीत आमूलाग्र बदल

होणं अत्यावश्यक आहे.'

मिस्टर वर्मा विचारू लागले, 'सर, हा भयावह रिपोर्ट कुठे ठेवू?'

खाद्य सचिव म्हणाले, 'तो ताबडतोब जाळून टाक. वर्तमानपत्राच्या वार्ताहरांना याचा सुगावा लागला, तर आणखी एक घोटाळा निर्माण होईल. येत्या वर्षी निवडणुका आहेत, हे आपल्याला विसरून चालणार नाही.'

वरिष्ठांच्या आदेशानुसार नथुरामने बेसमेंटमध्ये जाऊन स्वत:च्या हातांनी तीस पानी रिपोर्टचे तुकडे तुकडे करून आग लावून दिली.

त्यानंतर हार्वर्डमधून परत आलेल्या योजना मंत्रालयातल्या एका तज्ज्ञांकडून रातोरात एक नवीन रिपोर्ट लिहून घेऊन, तो दिल्लीला पंतप्रधानांच्या ऑफिसमध्ये पाठवला गेला. भरपूर माहिती, आकडेवारी, रेखाचित्रे इत्यादींनी परिपूर्ण असलेल्या या रिपोर्टसाठी प्रास्ताविक लिहिलं खाद्यमंत्र्यांनी. हा चुकीचा रिपोर्ट वाचून पूर्व प्रदेशातल्या आदिवासींना पंतप्रधानांच्या नवीन योजनेमुळे पौष्टिक आहार मिळतोय आणि ते स्वास्थ्यपूर्ण जीवन जगतायत, हे नथुरामला समजलं. याची कारणमीमांसा करताना सप्तम पंचवार्षिक योजनेनुसार ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी सरकारने ज्या सर्व योजना सुरू केल्या आहेत त्यातल्या बऱ्याचशा योजना सफल झाल्यामुळे आदिवासींच्या क्रयशक्तीत बरीच वाढ झाली आहे आणि त्यामुळेच त्यांना गहू खरेदी करता येतोय. सुंदर आणि दणकट रेक्झीनच्या बांधणीतली ही रुपकथा पंतप्रधानांच्या ऑफिसमध्ये पाठवायच्या वेळी नथुरामला आठवलं, त्या जाळून टाकलेल्या रिपोर्टच्या शेवटी आदिवासींच्या लहान लहान मुलाखती छापल्या होत्या. परिचयपत्र मिळालं नसल्यामुळे त्यांनी जिल्हा अधिकाऱ्यांकडे तक्रार का नोंदवली नाही, या प्रश्नाला बहुतेक आदिवासींनी एकच उत्तर दिलं होतं- 'परिचयपत्र घेऊन आम्ही करणार काय? सरकारने दिलेला गहू-तांदूळ खरेदी करायला आमच्याकडे पैसा आहे कुठे?'

**तीन**

पंतप्रधानांच्या पूर्वनियोजित भेटीमुळे पूर्वप्रदेशात अभूतपूर्व जनजागृती झाली. मुख्यमंत्री एका लॉटरी घोटाळ्यात अडकल्यामुळे आणि हरिजनांच्या गावी पोलिसांकडून अत्याचार करवून घेतल्यामुळे तिथले मुख्यमंत्री पंतप्रधानांच्या रोषाला पात्र ठरले होते. आता आपली प्रतिमा उंचावण्यासाठी आणि आगामी निवडणुकीत स्वत:ला नेता म्हणून पुनर्स्थापित करण्यासाठी पंतप्रधानांना खूश करणं आवश्यक होतं. त्यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. आदिवासींच्या समस्या जाणून घेण्यासाठी ते हेलिकॉप्टरमधून आदिवासींच्या प्रदेशात दोनदा चक्कर मारून आले. प्रत्येक ठिकाणी त्यांना एकच तक्रार ऐकू आली : 'आमच्याकडे नोकरी नाही, जमीन नाही, अन्न खरेदी करायला पैसा नाही.' आदिवासींच्या हातात चटकन चार पैसे मिळावेत म्हणून मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरून पीडब्ल्यूडीने अतिशय मोठ्या संख्येने त्यांना रोजगार देऊ केला. पंतप्रधानांच्या स्वागतासाठी रस्त्यांच्या वळणावर फुलांची तोरणं तयार करून लावणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे, वाटेतला चिखल उचलून स्वच्छता करणे, सरकारी इमारतींना चुना फासणे, गावागावात ट्युबवेल्स तयार करणे आणि शेवटी पंतप्रधानांच्या भाषणासाठी एक विशाल मंचाची उभारणी करणं यासारखी कामं त्यांच्याकडून करवून घेतली गेली.

पंतप्रधानांच्या अपेक्षित भेटीमुळे खाद्यमंत्र्याचा मेहुणाही भानावर आला. सगळ्या आदिवासींना रातोरात रंगीत फोटो व चेन बसवलेलं कोरं करकरीत परिचयपत्र मिळालं. गळ्यात परिचयपत्र, हातात पीडब्ल्यूडीकडून मिळालेला काळा पैसा. काही आदिवासी दारूच्या दुकानाच्या दिशेने धावले, तर काही रेशन दुकानाकडे जायला निघाले. जिल्हा प्रशासनाच्या कडक देखरेखीखाली पोलीस चौकी बसवून रात्रंदिवस गहूतांदुळाचं वाटप करण्यात आलं. शेवटी अशी परिस्थिती झाली, की फूड कॉर्पोरेशनचे उच्चपदस्थ अधिकारी यांनी मुख्यमंत्र्यांकडे गुपचूप तार पाठवली. त्यात नमूद केलं होतं-'आदिवासींसाठी राखून ठेवलेले अर्धवट सडलेले गहू-तांदूळ आता संपत आले आहेत, हे वाटप चालू ठेवायचं असलं, तर दुसऱ्या राज्यातून धान्य उधारीवर आणावं लागेल किंवा खरेदी करावं लागेल.' पंतप्रधान येण्याच्या मुहूर्तावर आलेल्या या बातमीमुळे साहजिकच मुख्यमंत्री विचलित झाले. शेवटी नाईलाजाने त्यांनी शेजारच्या राज्याकडून चढ्या किमतीत धान्य खरेदी करून पंतप्रधानांच्या योजनेत खंड पडू दिला नाही.

पूर्वेकडच्या प्रदेशातून नथुरामकडे यावेळी जी कागदपत्रं आली, त्यावरून 'खाद्यमंत्र्यांच्या कोट्यातून आदिवासींना दुप्पट धान्याचं वाटप केलं गेलं होतं' हे वास्तव समजलं. या बाबतीत राज्य सरकारला सावध करा, असा प्रस्ताव असलेली फाइल नथुरामने ताबडतोब मिस्टर वर्मा यांच्याकडे पाठवली. ती फाइल पुढील निर्देशासह परत आली : पंतप्रधानांच्या पूर्व प्रदेशाचा दौरा संपल्यावर याविषयी विचारविनिमय केला जाईल.

**चार**

दुर्भाग्य असं की शेवटपर्यंत आदिवासींच्या विभागाला भेट द्यायला पंतप्रधानांना सवड मिळाली नाही, कारण आवश्यक कामांसाठी त्यांना दोन दिवसाच्या दौऱ्यात तीन शहरांना भेटी द्याव्या लागल्या होत्या. कुठे सरकारी हॉस्पिटलचं उद्घाटन, कुठे जल–विद्युत प्रकल्पाची कोनशीला बसवण्याचा कार्यक्रम तर एखाद्या विश्वविद्यालयात पदवीदान समारंभात भाषण. असं असलं तरीही दौरा संपताना एका विशाल मंचावर उभं राहून तासभर त्यांनी जे भाषण केलं, त्यात त्यांनी विमानतळावरून इथे येताना रेशन दुकानासमोर अगणित आदिवासींची रांग बघितल्याचा उल्लेख केला. पूर्वेकडच्या प्रदेशात त्यांच्या योजनेचं अभूतपूर्व साफल्य पाहून ते खूश झाले होते. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या विशेष योगदानासाठी त्यांनी त्यांची वारेमाप स्तुती केली. मुख्यमंत्र्यांची प्रशंसा ऐकून ज्या पन्नास हजार लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला, त्यातले बहुतांश लोक माणशी दहा रुपये देऊन आजूबाजूच्या गावातून भाड्याने आणलेले प्रेक्षक होते!

दौरा संपवून पंतप्रधान आपल्या लवाजम्यासह विमानात बसून राजधानीत परतले. त्यानंतर या नाटकावर ज्या प्रकारे पडदा पडला त्यात अँटी क्लायमॅक्सचा सूर अंतर्भूत होता. पंतप्रधानांचं विमान आकाशात झेप घ्यायच्या आधीच योग्य किमतीत धान्य विक्री करणाऱ्या दुकानाचं शटर खाली खेचण्यात आलं. जे पोलीस इतका वेळ आदिवासींना धान्यवाटप करण्यासाठी मदत करत होते, ते दंडुका हाती घेऊन आदिवासींना हाकलवून देऊ लागले. पीडब्ल्यूडीच्या कर्मचाऱ्यांनी ट्युबवेल्स बंद करून टाकल्या कारण त्या काँट्रॅक्टरकडून एका आठवड्यापुरत्या भाड्याने घेतल्या होत्या. रस्त्यावरच्या उनाड मुलांनी स्वागतासाठी बांधलेली कमान तोडली. बांबू आणि बॅनर्स घेऊन ती मुलं पळून गेली. इतकंच नाही तर त्यांनी झेंडासुद्धा सोडला नाही, कारण जोड लावून त्यापासून अंडरवेअर आणि बनियन तयार करणं शक्य होतं. पंतप्रधानांच्या भाषणासाठी तयार केलेला विशाल मंच तोडण्यासाठी कुदळ फावडी घेऊन ती हजर झाली. परंतु पोलिसांनी त्यांना पळवून लावलं. त्या मंचाच्या विटा आणि लाकडं वापरून त्यांना म्युनिसिपालिटीच्या चेअरमनच्या घरी सकाळच्या वेळी त्यांना भेटायला येणाऱ्या लोकांसाठी एक नवीन शौचालय तयार करायचं होतं.

पंतप्रधानांच्या पूर्वेकडच्या दौऱ्यानंतर नथुरामच्या फाइलमध्ये पूर्वेकडून कागदपत्र येणं अवचित बंद झालं. इतर राज्यांकडूनही आदिवासींना गहू–तांदूळ यांचं वाटप केल्याची एकही बातमी आली नाही. वर्तमानपत्रामार्फत नथुरामला समजलं, पंतप्रधान आपल्या सहकाऱ्यांसह उत्तर पूर्वेकडच्या प्रदेशातल्या पूरग्रस्तांच्या मदतीसाठी गेले आहेत. त्यामुळे गहू–तांदूळ बोटीवर चढवून तिकडे पाठवण्यात आले होते. आदिवासींसाठी तयार केलेल्या पंतप्रधानाच्या योजनेचा आता पुरता बोजवारा उडालाय, हे नथुरामच्या लक्षात आलं.

**पाच**

बघताबघता एक वर्ष सरलं. १५ ऑगस्टला सकाळी इतर अनेकांप्रमाणे नथुरामने ट्रांझिस्टर चालू केला. कारण यंदा निवडणुकांचं वर्ष होतं. त्यामुळे पंतप्रधानांच्या भाषणात अनेक आशादायक मुद्दे असण्याची शक्यता होती.

'सत्तर लाख ग्रामीण युवकांना ग्रामीण भागात लघुउद्योग सुरु करण्यासाठी भांडवल म्हणून बँकेतून प्रत्येकी वीस हजार रुपये देण्यात येतील.' पंतप्रधानांनी टाळ्यांच्या प्रचंड गजरात घोषणा केली. नाथुरामने नि:श्वास टाकून एक विडी शिलगावली. यंदा श्रम मंत्रालयाच्या एखाद्या नथुरामची फाइल उघडायची पाळी होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी नथुरामने आदिवासींच्या खाद्य–वितरणाची भलीमोठी फाइल मिस्टर वर्मा यांच्या टेबलावर ठेवली. मिस्टर वर्मा रिफीलच्या टोकाने कान कोरत होते. सकाळच्या वेळी ही अशुभ फाइल पाहिल्यावर त्यांचं पित्त खवळलं. त्यांनी रागारागाने विचारलं, 'ही फाइल इथे कशासाठी आणलीय?'

नथुराम विचारू लागला, 'ही फाइल आता कुठे ठेवू, सर?'

मिस्टर वर्मा ओरडले, 'ठेव माझ्या डोक्यावर.'

मग डोकं शांत झाल्यावर म्हणाले, 'ही फाइल सध्या तरी रेकॉर्ड रूममध्ये पाठवून दे. जेव्हा रेकॉर्ड रूममधला हिचा कालावधी संपेल, तेव्हा इतर भंगाराबरोबर हिलाही जाळून टाक.'

**नलिनाक्ष भट्टाचार्य यांच्या 'गल्पसंग्रह' या पुस्तकातून. नलिनाक्ष भट्टाचार्य (२.४.१९४९) कोलकाता. विज्ञानात पदवी. केंद्र सरकारच्या विविध विभागात नोकरी. वास्तव्य दिल्लीत. इंग्रजीत कथा–कादंबऱ्या लेखन.**

**अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

ईमेल : sumatijoshi154@gmail.com

# आयुर्वेदिक औषध : औषध की अन्नद्रव्य?



डॉ. श्रीराम सावरीकर

आयु:रंग



**लो**कांना औषध घेतल्याशिवाय आजाराची चिकित्सा झाल्याचे समाधान मिळतच नाही. त्यामुळे आयुर्वेदिक डॉक्टरने औषधाविना चिकित्सा केलेली लोकांच्या पचनी पडत नाही. आयुर्वेदिक डॉक्टरने ॲलोपॅथिक औषधाला पर्यायी आयुर्वेदिक औषधच द्यावे, अशी लोकांची अपेक्षा असते. म्हणूनच आयुर्वेदिक औषधांचा बाजार सतत गरम असतो. त्यांतच जसे ॲलोपॅथिक औषध घेण्यासाठी औषधाच्या दुकानात जावे लागते, तसेच त्यासाठी डॉक्टरच्या चिठ्ठीचीही आवश्यकता असते. तसे आयुर्वेदिक औषधांच्या बाबतीत असत नाही. जाहिरातीच्या माध्यमातून आयुर्वेदिक औषधी उद्योजकांनी समाजात प्रसिद्ध केलेली अनेक आयुर्वेदिक औषधे किराणा दुकानातही सहज मिळू शकतात. त्यातच आता फूड सप्लिमेन्ट्स म्हणजेच पूरक अन्न द्रव्ये किंवा न्युट्रास्युटिकल्सच्या नावाने आयुर्वेदिक औषधे देशात आणि विदेशात अनेक डिपार्टमेन्टल स्टोअर्सच्या शेल्फवर विराजमान असलेली आढळून येत आहेत. हे पाहून आयुर्वेदिक औषधे औषध आहेत, की पूरक अन्न द्रव्ये, असा प्रश्न आता निर्माण होऊ लागला आहे. याच प्रश्नाचा ऊहापोह प्रस्तुत लेखात घेण्यात येत आहे...

आयुर्वेदिक औषधांना कायदेशीररित्या औषधांचा दर्जा भारतामध्ये औषध व प्रसाधन अधिनियम १९४० अन्वये आयुर्वेदिक औषधांना कायदेशीररित्या औषध म्हणून मान्यता आहे. या अधिनियमांतील प्रकरण ४ (अ) हे आयुर्वेदिक, सिद्ध व युनानी औषधांसाठीच समर्पित करण्यात आले आहे. त्यांत आयुर्वेदिक औषधांची व्याख्याही निर्धारित करण्यात आली आहे. असे असले तरी भारत, श्रीलंका आणि दक्षिणपूर्व आशियातील निवडक देश वगळता सर्व जगभरात या औषधांना औषध म्हणून मान्यता नाही. अनेक देशामध्ये ही औषधे फूड सप्लिमेन्ट्स या नावाखाली ग्रोसरी स्टोअर्समधून आणि ऑन लाइन मार्केटमधून सर्रास विकली जात आहेत. भारतातही कायदेशीर मान्यता असूनही आयुर्वेद व्यावसायिक वैद्यवर्ग वगळता समाजाच्या आणि अगदी शासकीय अधिकाऱ्यांच्या नजरेमध्ये सुद्धा या औषधांना ॲलोपॅथिक औषधासारखे औषध म्हणून सामान्यतः स्वीकारले जात नाही.

**नियंत्रण औषध नियंत्रकांचे की अन्न नियंत्रकांचे?**

भारत सरकारने कायदेशीररित्या आयुर्वेदातील अनेक औषधी वनस्पतींचा समावेश फूड सप्लिमेन्ट किंवा न्युट्रास्युटिकल्समध्ये केला आहे. फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड ऑथॉरिटी ऑफ इंडियाने (एफएसएसएआय) आयुर्वेदिक आहार उत्पादने नियम २०२२ प्रसिद्ध करून त्यांत आयुर्वेद ग्रंथात उल्लेखित आहार पदार्थांना अन्नद्रव्यामध्ये 'आयुर्वेदिक आहार उत्पादने' या नावाने स्वतंत्र वर्गीकृत केले आहे. वास्तविक हे आहार पदार्थ सामान्य आहार पदार्थामध्ये समाविष्ट होतेच. त्यामुळे त्यांना वेगळे वर्गीकृत करण्याची आवश्यकता नव्हती. पण केवळ उद्योजकांचे हित साधण्यासाठी त्यांचा 'आयुर्वेदिक आहार पदार्थ' असा स्वतंत्र वर्ग केला असल्याचे दिसते. यामुळे नुकसान झाले, ते आयुर्वेदिक औषधांचे. कारण 'आयुर्वेदिक आहार' या वर्गात केवळ संबंधित पदार्थच नव्हे, तर त्यांत वापरले गेलेले प्रत्येक वनस्पती द्रव्य केवळ औषधी न राहता कायद्याने ते आहार द्रव्य वा पूरक आहारद्रव्य होऊन गेले आहे. त्यामुळे ही औषधी द्रव्ये आता एकाच वेळी औषध म्हणून औषध नियंत्रकांच्या आणि अन्नद्रव्य म्हणून अन्न नियंत्रकांच्या नियंत्रणाखाली गेली आहेत.

**आयुर्वेदिक औषध 'एफएमसीजी'चा स्रोत?**

अन्नद्रव्यांचे दर्जा निर्धारक निकष हे औषधी द्रव्यांच्या दर्जा निकषांच्या तुलनेत खूपच मवाळ असतात. त्यांचा उत्पादन खर्चही कमी असतो. त्यांच्या विक्रीसाठी उत्पादकाला डॉक्टरची शिफारस लागत नाही– सिने तारे आणि चलनी खेळाडूंचा वापर करून टीव्ही आणि भल्यामोठे डोळे दिपवणारे जाहिरात फलक यांचा वापर करून आपले उत्पादन उद्योजक लोकांच्या गळी उतरवत असतात. त्यामुळे बहुसंख्य आयुर्वेदिक औषधी उद्योजक आता औषधी उत्पादने सोडून पूरक अन्न द्रव्ये उत्पादनाकडे वळत आहेत. उद्योग जगत आज आयुर्वेदाकडे फास्ट मुव्हिंग कन्झ्युमर गुड्स (एफएमसीजी) म्हणजे, जलद विकल्या जाणाऱ्या ग्राहकापयोगी उत्पादनांचा प्रमुख स्रोत म्हणून बघत आहे. परिणामी दैनंदिन वापरातील मसाले, आयुर्वेदातील वात, पित्त, कफ यासारख्या पारिभाषिक संज्ञांची वा समाजात सुपरिचित तुळस, अश्वगंधा, शतावरी इ. सारख्या औषधी वनस्पतींची लेबले लावलेली सामान्यांना भुलवणारी चहासारखी पेये, दुधांत वा अन्य पेयांत मिसळून सेवन करण्यायोग्य विविध ऊर्जावर्धक प्रथिनयुक्त वा तत्सम मिश्रणे, कुठली तरी औषधी वनस्पती नाममात्र मिसळलेली केशतेल, साबण, फेस क्रीम्स, लोशन्स, शाम्पू इत्यादि विविध सौंदर्य प्रसाधने अशा उत्पादनांनी जगभरातील मार्केट्स आज दुथडी भरून वाहताना दिसताहेत.

ही सर्व उत्पादने त्यात वनस्पती मिश्रित असल्याचा फायदा घेऊन जाहिरातींच्या माध्यमातून ती आयुर्वेदिक औषध म्हणून लोकांच्या मनात बिंबवून विकली जात आहेत. त्यामुळे काही मध्यमवर्गीय व उच्चभ्रू घरातील महिन्याच्या किराणा सामानाच्या यादीत ही पूरक अन्नद्रव्ये सर्रासपणे दिसून येऊ लागली आहेत. या उत्पादनावरील लेबलमध्ये आयुर्वेदिक औषधी वनस्पतींची नावे पाहून आयुर्वेदिक औषधांना साइड इफेक्ट्स नसतात, तसेच ती शरीरास हानीकारकही नसतात अशा दृढ गैरसमजुतीमुळे, ते घेतल्यास त्यामुळे फायदा नाही तरी काही नुकसान होणार नाही, असे गृहीत धरून सामान्य लोक ही उत्पादने कोणत्याही योग्य वैद्यकीय सल्ल्याशिवाय दीर्घकाल सेवन करीत असल्याचे दिसून येत आहे.

या अशा गैरसमजुतीमुळे आणि गैरवापराच्या परिणामी आयुर्वेदिक औषध सेवनाशी संबंधित अनेक समस्या निर्माण होऊन समाजातील जाणकार वर्गामध्ये केवळ आयुर्वेदिक औषधांनाच नव्हे, तर एकूणच आयुर्वेदाला नकारात्मक प्रसिद्धी प्राप्त होत आहे. त्यातूनच आयुर्वेद हे छद्मविज्ञान आहे. आयुर्वेदिक औषधांमुळे यकृत आणि मूत्रपिंडादि अवयवांना

हानी पोचते. यासारखे गैरसमज वेगाने पसरू लागले आहेत.

**आयुर्वेदिक औषधांच्या विक्रीसाठी परवाना आवश्यक नाही!**

सामान्य लोकामध्ये आयुर्वेदिक औषधांच्या वापरासंबंधी गैरसमज पसरविण्यास आणि त्यांना नकारात्मक प्रसिद्धी मिळण्यास संबंधित उत्पादनांचे उत्पादक प्रामुख्याने कारणीभूत आहेत. कारण अशा गैरसमजुतीवरच त्यांच्या उत्पादनांची विक्री अवलंबून असते. या उत्पादकांची सरकार दरबारी कार्यरत लॉबी अशा उत्पादनांच्या निर्मितीवर व विक्रीवर नियंत्रण आणण्याचे सर्व प्रयत्न मुळात सुरूच होऊ देत नाही. सुरू झालेच तर ते पद्धतशीरपणे उधळून लावत असते. आयुर्वेदिक औषधे उत्पादनांसाठी परवाना लागत असला तरी त्यांच्या विक्रीसाठी कुठलाच परवाना लागत नाही. एखादा अशिक्षित फेरीवालाही कुठेही बसून वा फिरत्या गाडीमधून आयुर्वेदिक औषधांची विक्री करू शकतो. म्हणूनच आयुर्वेदिक औषधे फेरीवाला, भुसार मालाच्या दुकानापासून ते ऑनलाइन खरेदीद्वारे देशात परदेशात डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय सहजपणे कुठेही मिळू शकतात.

वस्तुतः आयुर्वेदिक औषध विक्री करण्यासाठी विक्रेत्याकडे किमान मॅट्रिक उत्तीर्णतेची शैक्षणिक पात्रता असावी एवढी अट लागू करावी, असे सरकारला सुचत नाही, हे अत्यंत आश्चर्य आहे. औषध व अन्नद्रव्य यातील फरक औषध त्याच्या कार्यशक्तीने तर अन्नद्रव्य त्याच्या रसाने कार्य करते, असे आयुर्वेद सांगतो. ही गोष्ट खरी आहे, की आहारातील अनेक अन्नद्रव्ये उदा. धने, जिरे, सुंठ, मिरे, हिंग, मोहरी यासारख्या नित्य वापरल्या जाणाऱ्या अनेक वनस्पती आयुर्वेद चिकित्सेमध्ये औषध म्हणून मोठ्या प्रमाणात वापरल्या जात असतात. पण म्हणून त्या कशाही वापरल्या तरी त्यांनी कांही शारीरिक हानी होत नाही असे, समजणे हे अज्ञानाचे लक्षण आहे.

येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की वर उल्लेख केलेले पदार्थ दैनंदिन वापरामध्ये नेहमीच कुठल्या तरी अन्न पदार्थामध्ये म्हणजे भाजी, चटणी, कढी, आमटी इत्यादिंना चविष्ट बनविण्यासाठी त्यात मिसळून वापरले जात असतात. आहारामध्ये ते एकटे सहसा सेवन केले जात नाहीत. म्हणजे नुसती सुंठ किंवा नुसता हिंग किंवा कुठलाही मसाल्याचा पदार्थ एकटा स्वतंत्रपणे सेवन केला जात नाही. याउलट यातील अनेक पदार्थ आयुर्वेद चिकित्सेमध्ये औषध म्हणून एकटे स्वतंत्रपणे कशातही न मिसळता मोठ्या प्रमाणांत वापरले जात असतात. अन्न पदार्थात उपरोक्त द्रव्ये चवीसाठी मिसळली जात असतात. तर औषधात ती त्यांच्या औषधी कार्यासाठी वापरली जात असतात. त्यामुळेच जेव्हा जेव्हा हा पदार्थ औषध म्हणून वापरला जातो, तेव्हा तेव्हा त्याचे प्रमाण आहारामध्ये वापरल्या जाणाऱ्या त्याच्या नित्याच्या प्रमाणापेक्षा कितीतरी अधिक असते. उदा; आहारातील पदार्थामध्ये सुंठ चिमूट भर म्हणजे १००-२०० मि. ग्रॅ. वा अधिकात अधिक ५०० मि. ग्रॅ. प्रमाणात मिसळली जाते. असे सुंठ मिसळणे हा पाककृतीचा भाग आहे. त्यासाठी कुठल्याही वैद्यकीय वा आहारतज्ज्ञांच्या सल्ल्याची आवश्यकता नसते. तसेच असा सुंठ मिसळलेला पदार्थ कुणीही सेवन करू शकतो. हीच सुंठ आयुर्वेद चिकित्सेमध्ये १० ग्रॅ.पर्यंत तीही कशातही न मिसळता एकेरी वापरली जाऊ शकते. पण इतक्या मोठ्या प्रमाणात ती वापरण्याचा सल्ला रूग्णाची तपासणी करून आवश्यकतेनुसार देण्याची पात्रता केवळ वैद्यच बाळगत असतो. असे औषध घेताना चूक होऊन ते सेवन करणाऱ्याच्या शरीरास अपायकारक नक्कीच ठरू शकते. पण त्यावेळी त्या चुकीची जबाबदारी वैद्याची ठरेल. नित्य वापरातील काही वनस्पती उदा. लवंग, वेलची, सुपारी, बडिसोप इत्यादि अल्प प्रमाणात एकेरी सेवन केली जात असतात. हेही पदार्थ अधिक प्रमाणात सेवन केले, तर ते शरीरास हानीकारक ठरतातच. म्हणूनच मसाल्याचे वा नित्याच्या आहारातील कोणताही पदार्थ मग ती वनस्पती असो वा अन्य काही, तो पदार्थ औषध म्हणून केवळ तज्ज्ञ वैद्याच्या सल्ल्याने सेवन केला, तरच तो हानीकारक न ठरता रोगनाशक ठरू शकतो, याची खूणगाठ प्रत्येकाने मनाशी बांधून ठेवणे अत्यावश्यक आहे.

**आयुर्वेदिक औषधांना साइड इफेक्ट्स नाहीत?**

औषध म्हटले, की दुष्परिणाम हा त्याचा स्थायी अंगभूत भाव आहे. मग ते औषध ॲलोपॅथी, होमिओपॅथी वा आयुर्वेदिक कोणतेही असो, त्याने काही फरक पडत नाही. कोणत्याही औषधाचा अयोग्य पद्धतीने वापर हा नेहमीच हानीकारक ठरत असतो. म्हणूनच औषध मग ते कुठलेही असो ते योग्य जागी वा योग्य प्रमाणात वापरले तरच फायदेशीर ठरते, अन्यथा त्याचा दुष्परिणाम होणारच होणार हे निश्चित. आयुर्वेदिक औषधासहित कोणतेही औषध डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेणे सर्वथा अयोग्य आहे. आयुर्वेदिक औषधांना



*आयुर्वेदिक औषधी उत्पादनांनी व्यापार आणि बाजार गजबजणे ही अर्थकारणाच्या अंगाने मोठी घटना मानली गेली असली तरीही, कोणीही यावे आणि सेवन करावे ही बाब अनारोग्यकारी ठरते...*

साइड इफेक्ट्स नाहीत. ती शरीरास हानी करत नाहीत, असे मानणे अज्ञानमूलक आहे. या गैरसमजामुळे आयुर्वेदिक औषधे वैद्याच्या सल्ल्याशिवाय ते दीर्घकालपर्यंत सेवन केल्यामुळे शरीरावरील घातक परिणाम झाल्याची अनेक प्रकरणे घडत आहेत. गंभीर दुष्परिणामांना आयुर्वेदिक औषध नव्हे, तर त्याचा स्वैर गैरवापर हे कारण आहे. दुष्परिणामास औषध नव्हे, तर त्याचे सेवन केले जाणारे प्रमाण, कारणीभूत असते असे फार्माकॉलाजी म्हणजे औषधी गुणधर्मशास्त्र सांगते.

त्यामुळे कोणतेही औषध मग ते आयुर्वेदिक असो वा ॲलोपॅथिक दुष्परिणाम हा त्याचा अंगभूत गुण आहे. तरीही या वैज्ञानिक तथ्याकडे डोळेझाक करून आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त रिसर्च जर्नल्समध्ये ख्यातनाम तज्ज्ञ संशोधक आपल्या संशोधन लेखामध्ये रूग्णाच्या यकृत, मूत्रपिंडादि अवयवामध्ये झालेल्या बिघाडांना तो रूग्ण घेत असलेल्या आयुर्वेदिक औषधांनाच जबाबदार धरत असतात, असे निर्दशनास येत आहे.

वास्तविक दुष्परिणामास औषधाला जबाबदार धरण्यापूर्वी संबंधित औषध त्या रूग्णाने घेणे योग्य होते का? ते निर्देशित प्रमाणापेक्षा आणि कालावधीपेक्षा अधिक घेतले होते का? तो रूग्ण तज्ज्ञ वैद्याच्या निगराणीखाली होता का? याची शहानिशा होणे आवश्यक असते. पण रूग्णावर झालेल्या घातक परिणामास आयुर्वेदिक औषध जबाबदार असल्याचे निष्कर्ष काढणाऱ्या संशोधन लेखातील सर्वच प्रकरणामध्ये उपरोल्लेखित सर्वच बाबींचे नियमितपणे उल्लंघन झाल्याचे दिसून येते. यातील अनेक विशेषतः परदेशस्थ रूग्ण आयुर्वेदिक औषधांना फूड सप्लिमेन्ट्स अथवा घरगुती उपचार समजून ग्रोसरी स्टोअर्स अथवा ऑनलाइन मार्केट मधून विकत घेऊन स्वतःच्या मनानेच आवश्यकतेपेक्षा अधिक प्रमाणामध्ये तेही दीर्घकालपर्यंत सेवन करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा स्वैराचाराचे त्यांच्या शरीरावर घातक परिणाम झाले तर त्यात आश्चर्य ते काय?

**आयुर्वेदिक औषधे आणि हेवी/टॉक्सिक मेटल्सचा बागुलबुवा**

समाजातील तथाकथित सुशिक्षित वर्गामध्ये आयुर्वेदिक औषधामध्ये हेवी/टॉक्सिक मेटल्स असल्यामुळे ती शरीरास घातक असल्याचा समज दृढ झालेला आहे. हा समजही असाच अज्ञानमूलक आहे. आयुर्वेदिक औषधे प्राणिज, वनस्पतीज व खनिज अशा तिन्ही प्रकारच्या द्रव्यांपासून बनवली जात असतात. काही औषधे पूर्णतः वनस्पतीज वा पूर्णतः प्राणिज द्रव्यांची असतात. अशा औषधांमध्ये कोणतेही टॉक्सिक मेटल्स शरीरास घातक ठरतील, इतक्या प्रमाणात असू नयेत याची काळजी औषधी उत्पादकांनी घेणे अपेक्षित आहे. तिसऱ्या प्रकारची औषधे ही खनिज द्रव्यापासूनच म्हणजे अनेकदा हेवी मेटल्स पासूनच तयार केलेली असतात. त्यांच्या घातक परिणामांची तज्ज्ञ वैद्यास चांगली जाण असते. त्यामुळे तो अशी औषधे अत्यंत काळजीपूर्वक रूग्णांना देत असतो. या प्रकारच्या औषधांचा वापर वैद्याच्या सल्ल्याने आणि त्याच्या निगराणीखालीच करावयाचा असतो. अशा औषधांची ढोबळ तुलना शरीरास अत्यंत घातक असूनही कॅन्सर रूग्णांना नियमितपणे दिल्या जाणाऱ्या ॲलोपॅथिक औषधांशी करता येईल.

**(पूर्वार्ध)**

**डॉ. श्रीराम सावरीकर हे एम. डी. (आयु), पीएच. डी. असून, आयुर्वेद प्राध्यापक तसेच गुजरात आयुर्वेद विद्यापीठाचे माजी कुलगुरू, भारत सरकारचे माजी आयुर्वेद सल्लागार आणि भारत सरकारच्या आयुर्वेद फार्माकोपिया समितीचे माजी अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची रसचंडांशु – हिन्दी टीका, शारंगधर संहिता – इंग्रजी टीका – तीन खंड, अर्वाचीन आयुर्वेदायन, आयुर्वेद – फाउंडेशन ऑफ हेल्दी लाइफ, इंग्रजी, वैद्यकीय सांख्यिकी शास्त्र– हिंदी आदी साहित्य प्रकाशित झाले आहे. संपर्क :** sssavrikar@gmail.com

## मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशनचा

# तळागाळातील गरजूंना मदतीचा हात





जिल्हा परिषद शाळा घोडपापड शाळेतील विद्यार्थ्यांना युनिफॉर्म वाटप.



बोअरवेल भूमीपूजन सोहळा.



फौंडेशनच्या सौजन्याने अंबीसत्ते हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ता. वाडा, जि. पालघटर यांना साऊंड सिस्टीम व क्रीडा साहित्य पुरविले.




फौंडेशनच्या वतीने तालुक्यातील पाच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.



जिल्हा परिषद शाळा घोडपापड येथील शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी नवीन बोअरवेल लोकार्पण समारंभ.



फौंडेशनच्या वतीने वर्षभर पुरेल एवढी वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल, चित्रकला साहित्य. स्कूल बॅग व रेनकोट वाटप.

* संत गाडगेबाबा ट्रस्ट या संस्थेतील गरजूंना अल्पोपहार व दोन्ही वेळचे जेवण मोफत देण्यात आले.
* मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशन आणि जीवन विद्यामिशन, मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी संस्कार वर्ग व अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर, तसेच व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन वेगवेगळ्या ठिकाणी केले जाते.

**– मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशन**

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
PRGI NO-MAHMAR/2023/86554

